म. ग्रं सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ५८७
REFBK-0022001
REFBK-0022001

९५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

11 JUN 1978
27 AUG 1978
17 OCT 1979
17 MAR 1982
11 MAY 1983
5 MAY 1985
5 MAY 1985
5 MAY 1985

10 JUN 1987

(कृ.मा.प.)

वि. क्र.
५८८

22009
१६/१२/७८
मु. प्रकाश

विश्वसंशोधन माला :

# आफ्रिकेचा शोध

५१९२५
22009

REFBK-0022001
REFBK-0022001

सरिता प्रकाशन

'वरदा' सेनापती बापट मार्ग, पुणे-१६.

प्रकाशक :

सौ. मंदाकिनी भावे
सरिता प्रकाशन
३९७/१ 'वरदा', सेनापती बापट मार्ग,
पुणे ४११०१६.

प्रथमावृत्ति : दीपावली नोव्हेंबर १९७७.

© ह. अ. भावे

किंमत चौदा रुपये

मुखपृष्ठ : अनंत सालकर

मुद्रक:

सौ. आशा प्र. बापट
स्मिता मुद्रणालय,
१२९८, शुक्रवार पेठ, पुणे २.

# प्रस्तावना

आफ्रिका खंडाविषयी लोकांच्या मनामध्ये अनेक समज गैरसमज आहेत. आफ्रिकेत आजही निग्रोंच्या रानटी जमाती राहतात असे काहींना वाटते, तर आफ्रिकेचा शोध धाडसी युरोपियन संशोधकांनी लावला असा काहींचा समज असतो. युरोपियनांच्या शोधापूर्वी आफ्रिकेत प्रगत संस्कृती नांदत होती व त्यांची संघटित राज्ये होती, हे अनेकांना माहिती नाही.

आफ्रिका खंडाचा शोध घेण्याचे काम गेली दोन हजार वर्षे चालू आहे. जुन्या आफ्रिकन संस्कृतीची अनेक रूपे आजही उत्खननातून सापडताहेत. आफ्रिका हे एक प्रचंड खंड आहे. आफ्रिकेचा भूगोल ज्ञात झाला असला तरी इतिहास अजून अज्ञात आहे. जो इतिहास ज्ञात आहे त्याच्या पार्श्व-भूमीवर व भौगोलिक परिस्थितीचा विचार करून आफ्रिकेची कथा या पुस्तकात मांडली आहे.

एका दृष्टीने ही कथा अपूर्व आहे. शतकानुशतके आफ्रिकेतल्या मानव-जातीवर जुलूमजबरदस्ती झाली. कोटी–कोटी लोकांना गुलाम म्हणून पकडून नेण्यात आले. मैलच्या मैल मुलुख उद्ध्वस्त करण्यात आला. आफ्रिकन मानवजात लिहिण्याची कला माहीत नसल्यामुळे, आधुनिक शस्त्रे नसल्यामुळे, अज्ञानांधकारात चाचपडत राहिली.

आता मात्र विसाव्या शतकात आफ्रिकन खंडाने अश्मयुगातून अवकाश-युगाकडे झेप घेतली आहे. अशी उंच उडी घेताना तेथील मानव समाजात प्रचंड खळबळ माजली आहे. इडि अमीनसारखे युगांडाचे हुकूमशहा एकीकडे जेट विमाने वापरतात व दुसरीकडे अश्मयुगीन कायद्याप्रमाणे सहकाऱ्यांचे शिरच्छेदही करतात.

अशी ही आफ्रिकेची अपूर्व कहाणी या लहानशा पुस्तकात कथन करण्याचा प्रयत्न केला आहे. संपूर्ण कहाणी सांगायला अशी अनेक पुस्तके लागतील. आफ्रिकेच्या भौगोलिक व ऐतिहासिक घडणीतून कोणते प्रश्न त्या मानव समाजापुढे उभे आहेत याचे चित्रण या पुस्तकात वाचायला सापडेल.

वरदा, सेनापती बापट मार्ग,
पुणे १६.
दि. १५–१०–१९७७

ह अ. भावे

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १. ख्रिश्चन धर्माच्या उदयापूर्वी | ५ |
| २. आफ्रिका व आशिया यांचे प्राचीन संबंध | ११ |
| ३. युरोपियन जागृतीच्या काळापूर्वीची आफ्रिकेतील साम्राज्ये | ३१ |
| ४. पोर्तुगीजांचे सागरी शोध आणि वसाहतीचा प्रारंभ | ४२ |
| ५. आफ्रिका व अमेरिका येथील गुलामांचा व्यापार | ६१ |
| ६. एकोणिसाव्या शतकातील आधुनिक संशोधन | ७८ |
| ७. मध्य आफ्रिकेतील मिशनरी | ९७ |
| ८. नाईलचे गूढ व स्टॅनलेचे प्रवास | ११४ |
| ९. विसाव्या शतकातील आफ्रिका | १३९ |

प्रकरण पहिले

## ख्रिश्चन धर्माच्या उदयापूर्वी

शंभर वर्षांपूर्वीपर्यंत आफ्रिकाखंडाचा बहुतांश अंतर्भाग अज्ञात होता. या विस्तीर्ण प्रदेशाचा नकाशाही तयार झालेला नव्हता आणि जो या अज्ञात प्रदेशातील रहस्य शोधायला जाई, त्याच्यापुढे हजारो संकटे वाढून ठेवलेली असत. या खंडाला काळे खंड (Darkest Africa) म्हणत ते उगीच नव्हे ! विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत आफ्रिका खंडाच्या संशोधनाचे काम चालूच होते.

त्यातल्या त्यात कर्कवृत्त आणि मकरवृत्त यामध्ये आफ्रिका खंडाचा जो भाग येतो त्याचे संशोधन झालेले नव्हते तरी पोर्तुगीजांनी केप-ऑफ-गुड होप-आशांचे भूशिर–आफ्रिकेचे दक्षिण टोक याला पंधराव्या शतकातच वळसा घातला होता व हिंदुस्थानचा मार्ग शोधला होता. तरीही सर्व वसाहती एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत किनाऱ्याकिनाऱ्याने झाल्या होत्या. खंडाच्या अंतर्भागात वसाहती स्थापण्याचे प्रयत्न फारसे झाले नव्हते. आणि जे झाले होते ते अयशस्वी व दुर्दैवी ठरले होते. अंतर्भागात संशोधन करण्यामध्ये शतकानुशतके अनेक अडचणी होत्या. त्या दूर होण्यासारख्या नव्हत्या. उत्तरेकडे प्रचंड सहारा वाळवंट पसरले होते. सहाराच्या दक्षिणेकडे विषुववृत्तीय प्रदेशात समुद्रकिनाऱ्याच्या

# अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १. ख्रिश्चन धर्माच्या उदयापूर्वी | ५ |
| २. आफ्रिका व आशिया यांचे प्राचीन संबंध | ११ |
| ३. युरोपियन जागृतीच्या काळापूर्वीची आफ्रिकेतील साम्राज्ये | ३१ |
| ४. पोर्तुगीजांचे सागरी शोध आणि वसाहतीचा प्रारंभ | ४२ |
| ५. आफ्रिका व अमेरिका येथील गुलामांचा व्यापार | ६१ |
| ६. एकोणिसाव्या शतकातील आधुनिक संशोधन | ७८ |
| ७. मध्य आफ्रिकेतील मिशनरी | ९७ |
| ८. नाईलचे गूढ व स्टॅनलेचे प्रवास | ११४ |
| ९. विसाव्या शतकातील आफ्रिका | १३९ |

प्रकरण पहिले

# ख्रिश्चन धर्माच्या उदयापूर्वी

शंभर वर्षांपूर्वीपर्यंत आफ्रिकाखंडाचा बहुतांश अंतर्भाग अज्ञात होता. या विस्तीर्ण प्रदेशाचा नकाशाही तयार झालेला नव्हता आणि जो या अज्ञात प्रदेशातील रहस्य शोधायला जाई, त्याच्या-पुढे हजारो संकटे वाढून ठेवलेली असत. या खंडाला काळे खंड (Darkest Africa) म्हणत ते उगीच नव्हे ! विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत आफ्रिका खंडाच्या संशोधनाचे काम चालूच होते.

त्यातल्या त्यात कर्कवृत्त आणि मकरवृत्त यामध्ये आफ्रिका खंडाचा जो भाग येतो त्याचे संशोधन झालेले नव्हते तरी पोर्तुगीजांनी केप-ऑफ-गुड होप-आशांचे भूशिर–आफ्रिकेचे दक्षिण टोक याला पंधराव्या शतकातच वळसा घातला होता व हिंदुस्थानचा मार्ग शोधला होता. तरीही सर्व वसाहती एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत किनाऱ्याकिनाऱ्याने झाल्या होत्या. खंडाच्या अंतर्भागात वसाहती स्थापण्याचे प्रयत्न फारसे झाले नव्हते. आणि जे झाले होते ते अयशस्वी व दुर्दैवी ठरले होते. अंतर्भागात संशोधन करण्यामध्ये शतकानुशतके अनेक अडचणी होत्या. त्या दूर होण्यासारख्या नव्हत्या. उत्तरेकडे प्रचंड सहारा वाळवंट पसरले होते. सहाराच्या दक्षिणेकडे विषुववृत्तीय प्रदेशात समुद्रकिनाऱ्याच्या

काठाने हवामान दमट व रोगट होते. अंतर्भागाच्या पठारांत अनेक नद्या होत्या, पण त्यातील धबधब्यामुळे त्यातून बोटीतून जाणे शक्य नव्हते. शिवाय अंतर्भागात राहणाऱ्या वन्यजमाती परकी प्रवाशांवर विश्वास ठेवण्यास तयार नसत. त्यांना त्या गुलाम पकडणाऱ्या टोळ्यांपैकीच समजत. आफ्रिकेत गुलाम पकडण्याचं काम इतिहासपूर्व काळापासून चालू होते.

अंतर्भागात संशोधन करणे फारच बिकट होते आणि त्यातून मिळणार काय होते ? द्रव्यलाभ तर अजिबात नव्हता. त्यामुळे आफ्रिकेच्या अंतर्भागातील संशोधनाकडे शेकडो वर्षे कुणीच लक्ष दिले नव्हते. अगदी दक्षिणेच्या टोकाला मात्र थोड्याफार युरोपियन वसाहती झाल्या. तिथेही इंग्लिश आणि बोअर लोकांचे १८३५ साली जे भांडण व युद्ध झाले, त्यामुळे वसाहती करण्यास चालना मिळाली व वसाहत करायला लोक जास्त आत घुसले.

हे सर्व विवेचन आफ्रिकेच्या बाहेरच्या लोकांच्या दृष्टीने झाले. आफ्रिकेच्या विस्तीर्ण अज्ञात प्रदेशात त्यांची स्वतःची अशी संस्कृती विकसित झाली होती. त्या संस्कृतीला बाह्य जगाचा परीचय नसेल, पण आपल्या परीने तेही लोक सुसंस्कृत होते. आफ्रिकेत सर्वत्र रानटीपणा नव्हता. तेथील काही जमाती उत्तम प्रकारे शेती करत, गुरे पाळत, कच्चे लोखंड व तांबे खाणीतून काढून भट्ट्या लावून लोखंड व तांबेही तयार करत. पश्चिम आफ्रिकेत हजार वर्षांपूर्वी मोठी मोठी साम्राज्ये होती. अजूनही झिम्बाब्वे येथील उद्ध्वस्त अवशेष जुन्या प्राचीन वैभवाची साक्ष देत उभे आहेत. आपण लिव्हिंग्स्टनला व्हिक्टोरिया धबधबा शोधून काढल्याचे श्रेय देतो. पण आफ्रिकेतल्या लोकांना तो धबधबा माहीत होता. तेच लोक लिव्हिंग्स्टनला तेथे घेऊन गेले.

आफ्रिकन आणि युरोपियन यांच्या मिश्रवंशाच्या दोन लोकांनी प्रथम आफ्रिकाखंड ओलांडले.

इजिप्शिअन लोकांनी नाईल नदीच्या काठाने संशोधन करण्यास इ. स. पूर्वी तीन हजार वर्षांपूर्वी सुरुवात केली. त्यांच्या टोळ्या दक्षिणेकडे काळ्या कातडीच्या न्युबिअन लोकांच्या प्रदेशात जात असत आणि परत येताना शिसवीचे लाकूड, हस्तीदंत आणि गुलाम आणत असत. इजिप्तच्या मेंफिस या प्राचीन राजधानीत त्याला चांगली मागणी असे. इ. स. पूर्वी २७५० सनासाली नाईल नदीवरून दक्षिणेकडे माल आणण्यासाठी जहाजे गेल्याचे नोंदलेले आहे. नीलनाईल नदीच्या प्रवाहातून ही जहाजे अबिसिनियाकडे जात असत. इजिप्शियन राजाने तेथून हत्ती पकडून आणून युद्धासाठी वापरल्याचे उल्लेख आहेत.

इ. स. पूर्वी १३०० वर्षांपासून पुढे चारशे वर्षं इजिप्तमधील फारोहांचे साम्राज्य कळसाला पोचले होते. त्या वेळी आफ्रिकेच्या अंतर्भागामध्ये अनेक मोहिमा काढण्यात आल्या होत्या. इजिप्त व अबिसिनियन लोकांनी नंतर हल्ले केले. त्यामुळे न्युबीयन जमातीला दक्षिणेकडे पळावे लागले. आजच्या खार्टूमपर्यंत त्यांची सरहद्द भिडलेली होती.

प्राचीनकाळी फोनिशियन लोक धाडसी खलाशी म्हणून प्रसिद्ध होते. आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर भूमध्य समुद्राच्या काठावर त्यांनी कार्थेज हे शहर वसवले होते. तेथून ते लांबलांबचा प्रवास करत. ते उत्तर ब्रिटनपर्यंत जात. अटलांटिक महासागरातील मदिरा बेटापर्यंत त्यांची जहाजे जात असत. फोनिशियनांच्या एका प्रचंड सफरीच्या मोहीमेची हकीगत उपलब्ध आहे. इ. स. पूर्वी ४५० या वर्षी ही सागरी मोहीम वखारी आणि वसाहती स्थापण्या-

साठी काढली होती. त्यांचा नेता हन्नो होता. एकंदर साठ जहाजे या मोहिमेत होती. प्रत्येक जहाजावर पन्नास वल्ही व शिडे बसवलेली असत. एकंदर तीस हजार माणसे या मोहिमेत सामील झाली होती. हन्नोच्या या काफिल्याने मोरोक्कोच्या किनाऱ्यावर सहा ठिकाणी मुक्काम केला, आणि ठाणी स्थापन केली. नंतर ते सेनेगालच्याही दक्षिणेस गेले. किनाऱ्याने त्यांना अनेक नद्यांच्या मुखाचे त्रिभुज प्रदेश दिसले. त्यांना एक आग ओकणारा पर्वत दिसला. तो बहुधा ज्वालामुखी असावा. कॅमेरूनच्या किनाऱ्यावरील सध्या निद्रिस्त असलेला ज्वालामुखी त्यांना दिसला असावा. अन्नसाठा संपल्यामुळे हन्नोला परत वळावे लागले. तो दक्षिणेकडे कुठपर्यंत गेला होता हे निश्चित सांगता येणार नाही. पण तो विषुववृत्ताच्या जवळ पोहचला होता हे नक्की.

फोनिशियन लोकांचा व्यापार न्युबियन या भटक्या टोळ्यांच्या उंटांच्या काफिल्याशी चालू असे. या भटक्या टोळ्यांचे उंटांचे काफिले सहारा वाळवंट ओलांडून जात आणि दक्षिणेकडून हस्तिदंत, सोने आणि रानटी पशू बरोबर आणत. फोनिशियनांच्या सर्कशीला लागणारे सिंह सुद्धा ते पकडून आणत असत.

फोनिशियनांनी पश्चिम आफ्रिकेतच सागर सफरी काढल्या असे नाही. कार्थेजची स्थापना होण्यापूर्वी तांबडचा समुद्रातून जहाजे बाहेर काढून ते आफ्रिकेच्या पूर्वकिनाऱ्याने जात असत. इ. सनापूर्वी सहाशे वर्षं नेक्कचो या इजिप्शियन राजाने फोनिशियन जहाजांचा एक ताफा आफ्रिका खंडाला प्रदक्षिणा घालण्यासाठी पाठवला होता. सुप्रसिद्ध इतिहासकार हिरोडोटस त्या वेळी इजिप्तमध्ये गेला होता. त्याच्या म्हणण्याप्रमाणे जहाजांचा हा ताफा संपूर्ण आफ्रिकाखंडाला वळसा मारून तीन वर्षांनी परत आला. वाटेत

त्यांनी दोनदा मुक्काम केला. आणि पिके पेरून धान्य पुरवठा करून घेतला. शेवटी ते जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीतून भूमध्य समुद्रात परत आले. कदाचित ही हकीगत खरी नसेलही, पण हिरोडोटसने एक उल्लेख केला आहे त्यावरून अशा प्रवासाची शक्यता नाकारता येणार नाही. फोनिशियनानी सांगितले की, आफ्रिकेभोवती फेरी मारताना सूर्याने आपला मार्ग बदलला. व तो जास्त उत्तरेकडे निघून गेला. यावरून असे सिद्ध होते की, नेक्‌चोचे हे संशोधक खलाशी विषुववृत्ताच्या दक्षिणेला खूपच अंतरावर गेले असणार.

फोनिशियनांनंतर ग्रीक लोकांचा राबता या भागात सुरू झाला. अलेक्झांड्रिया या बंदरातील खलाशांच्या इ. स. १५० मधील नोंदवहीमध्ये झांजिबारच्या किनारपट्टीपर्यंतचे वर्णन आहे. पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावर ग्रीक व रोमन नाणी सापडली आहेत. ग्रीकांनी केलेल्या प्रवासाचे ते पुरावे आहेत.

सहारा वाळवंटाबद्दल ग्रीकांना आणि रोमनांना फारसे प्रेम नव्हते. हिरोडोटसने सहाराचे वर्णन केले आहे. तो म्हणतो, ‘हा उजाड, वैराण व वाळवंटी प्रदेश आहे. तेथे कुठलेही प्राणी नाहीत आणि तेथे पाऊसही पडत नाही.’ लिबियामध्ये त्याकाळी जर्मनाईडस नावाची सामर्थ्यवान जमात राहात होती. ते चार चाकाच्या युद्धरथातून प्रवास करत. आणि गुहेत राहणाऱ्या आफ्रिकनांची शिकार करत. रोमन लोकांनी उत्तर आफ्रिका जिंकून घेईपर्यंत उत्तर आफ्रिकेच्या या भागात काहीच संशोधन झाले. नव्हते. सन ७० साली रोमन लोकांनी दोन संशोधन-मोहीमा काढल्याचे उल्लेख आहेत. ‘सेप्टीमस फ्लॅकस’ हा संशोधक जेर्मा येथून निघाला आणि ५०० मैल प्रवास करून इथोपियन लोकांच्या

भूमीत पोहचला या प्रवासाला त्याला तीन महिने लागले. ज्युलिअस मर्टेनस आणखी पुढे आगीस्वांबा नावाच्या प्रदेशात गेला. तेथे त्याला गेंडयांचे कळप दिसले. ही ठिकाणे म्हणजे चाड सरोवर व नायगरनदी होती, हे आता निश्चित करता आले आहे. आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर रोमन साम्राज्याचे जे जुने अवशेष आहेत त्यांच्या प्रचंडपणावरून आफ्रिकेच्या अंतर्भागाशी किती मोठया प्रमाणावर व्यापार चालत असावा याची कल्पना करता येते.

उत्तर आफ्रिकेच्या आणखी पूर्वेकडे रोमन राज्यपाल पेट्रोनियस याने नपाटा या प्राचीन राजधानीवर हल्ला केला होता. रोमन सम्राट नीरो याच्या कारकिर्दीत रोमन लोक खूपच दक्षिणेकडे लष्करी मोहीमा काढत होते. सेनेकाने नाईलनदीच्या दक्षिणेकडील दलदलीचे वर्णन केले आहे. तेथील दलदलीमधून एका बारक्या होडग्यातून एकच मनुष्य जाऊ शकतो असे त्याने वर्णन केले आहे. हे वर्णन खार्टूमच्या दक्षिणेकडील सूद दलदलीचे असावे.

या काळामध्ये रोमन लोक सहारा आणि त्यापलीकडे मोहिमा काढत होते त्याच वेळी नायगर नदीजवळ एक आफ्रिकन संस्कृती उदयाला येत होती. ती नॉक संस्कृती या नावाने प्रसिद्ध आहे. त्या संस्कृतील लोक उत्तमपैकी पुतळे तयार करत असत. त्यातील काही पुतळे सापडले आहेत. ही संस्कृती इ. स, २०० पर्यंत उर्जितावस्थेत होती. त्यांचा रोमन लोकांशी कदाचित संबंध आला असेल.


□

प्रकरण दुसरे

# आफ्रिका व आशिया यांचे प्राचीन संबंध

दक्षिण ऱ्होडेशियामधील झिम्बाव्वे येथे दगडाच्या प्रचंड भिंती सन ११०० मध्ये बांधल्या असाव्यात. त्या वेळी तेथे राहणाऱ्या लोकांची संस्कृती उच्च दर्जाची असावी आणि कलाकौशल्यात ते पुढारलेले असावेत. कोरीव कामाचे नमुने व सोन्याचे दागिने तेथे सापडले आहेत. तरीही त्यांची संस्कृती कशा प्रकारची असावी हे रहस्यच राहिले आहे. झिम्बाव्वे येथील संस्कृतीबद्दलचा अत्यंत मौल्यवान पुरावा 'एंशन्ट रुईन' कंपनीने सोने शोधताना इ. स. १८०० मध्ये नष्ट करून टाकला.

झिम्बाव्वे येथील संस्कृतीबद्दल बऱ्याच कविकल्पना केल्या जातात. कुणी म्हणतात की राजा सालोमनच्या सोन्याच्या खाणी येथेच होत्या. कुणी म्हणतात की, पुराणातील ओफिर राजाचे साम्राज्य येथेच होते. अलीकडच्या काळापर्यंत शास्त्रज्ञ असे समजत होते की कोणत्यातरी परकी जमातीने येथे आक्रमण केले, साम्राज्य स्थापले आणि काळाच्या ओघात ते साम्राज्य नष्ट झाले. पण येथील बांधकामे करणारे लोक आफ्रिकनच होते. फक्त त्यांनी बाहेरून संस्कृतीपासून स्फूर्ती घेतली होती. तेथे आफ्रिकनांचे एक साम्राज्यही स्थापन झाले होते.




**इंडोनेशिया बेटावरील लोक आफ्रिकेत १००० वर्षांपूर्वीच पोचले होते !**

इ. स. १००० मध्ये आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर परकियांची वर्दळ सुरू झाली. त्यापूर्वीच अरब व्यापारी या भागात व्यापार करू लागले होते. पूर्व किनाऱ्यावरच्या मादागास्कर बेटामध्ये इंडोनेशियातील लोक याच काळात पोहचले असावेत. मादागास्कर बेटातील मलगासे लोकांची भाषा व संस्कृती यांचे साम्य इंडोनेशियन संस्कृतीशी आहे असे आजही आढळेल. इंडोनेशियातील हे लोक हिंदीमहासागरातील ८००० किलोमीटरचा प्रवास करून का आले असावेत याची कारणे अज्ञात आहेत. परंतु पूर्व आफ्रिका व जावाबेट यामध्ये व्यापार होत असे याबद्दल पुरावे उपलब्ध

आहेत. ‘ पूर्वेकडील आश्चर्ये ’ ( Marvels of East. ) या पुस्तकांत इंडोनेशियन लोकांनी हस्तिदंत, चित्त्याची कातडी आणि गुलाम पळविण्यासाठी घातलेल्या छाप्यांचे उल्लेख आहेत. आफ्रिकेसंबंधी आपले ज्ञान फारच तुटपुंजे आहे. जुने ग्रंथ आणि पुराणवस्तू-शास्त्रज्ञांची उत्खनने यातून जी काय माहिती मिळेल तेवढीच. अजून खूप संशोधन करायला वाव आहे. उदाहरणार्थ, भारत व आशियांत सापडणाऱ्या केळी आणि ऊस या वनस्पती आफ्रिकेत कोणत्या मार्गाने पोचल्या असाव्यात हे जर शोधून काढले तर जुन्या घडामोडींवर बराच प्रकाश पडेल.

आफ्रिकेचा पूर्वकिनारा दाखवणारा एक चिनी नकाशा सापडला आहे. त्या नकाशात किनारपट्टीवर नारळाची झाडे आणि मशिदी दाखवल्या आहेत. अंतर्भागात उंच पर्वत दाखवले आहेत. या नकाशात बऱ्याच चुका आहेत. त्यात मादागास्कर येथे सापडणारा पेन्ग हा पुराणात उल्लेखलेला प्रंचड पक्षी चोचीमध्ये उंट पकडून नेताना दाखवला आहे.

सुमारे हजार वर्षांपूर्वी आफ्रिकेच्या अंतर्भागातील लोक हिंदुस्थानात तयार झालेल्या मण्यांच्या माळा वापरत असत, असे आढळले आहे. समुद्रकिनाऱ्यापासून खूप आत राहणारे लोक चलन म्हणून किनाऱ्यावर सापडणाऱ्या कवड्या वापरत असत. कारण किनारपट्टीशी त्यांचा व्यापार चालूच असे. कांगोमधील लुबा टोळीतील लोक खाणीतून तांबे काढीत असत आणि त्यांना क्रॉसचे आकार देऊन परदेशीही पाठवत असत. काही वेळा तांब्यांची तारही काढली जाई. तांब्याच्या व्यापाराचे केन्द्र इंगोम्बे इलेडे, ( गाईंचे निद्रास्थान ) येथे होते. हे ठिकाण झांबेजीच्या उत्तर किनाऱ्यावर समुद्रापासून ९६० किलोमिटर अंतरावर होते.

इंगोम्बे-इलेडे या व्यापार केंद्राची स्थापना इ. स. च्या सातव्या शतकात झाली होती. प्रथम तेथे हत्तींच्या शिकाऱ्यांचा जथा होता. पुढे त्याचे महत्त्व वाढत गेले. तेथे कापूस पिकवला जात असे आणि त्यापासून कापड विणले जात असे. तेथील राज्यकर्ते मरण पावल्यावर त्यांना त्यांच्या अलंकारांसह पुरत असत. एका थडग्यामध्ये मृताच्या कंबरेला बांधलेला तांब्याचा सुरा आढळून आला. तो कातडी म्यानात व्यवथित ठेवला होता.

या लहानशा वसाहतीचे राज्यकर्ते आफ्रिकन होते का दुसरे कोणी होते, याबद्दल काही पुरावा सापडत नाही. येथील थडग्यांत सोने सापडत असे म्हणून अनेक थडगी उकरली गेली. त्यांतील शरीरे लांब अवस्थेत ठेवलेली होती. त्या काळच्या आफ्रिकन पद्धतीप्रमाणे प्रेते पायाची घडी करूनच पुरत असत. यावरून असे म्हणता येईल की, येथील राज्यकर्ते आणि व्यापारीं आफ्रिकन नसून बाहेरच्या जगातून आलेले असावेत. या भागात अजून पुष्कळ उत्खनन होणे जरूरीचे आहे.

इंगोम्बे-इलेडे या जागेचा शोध अपघातानेच लागला. या शोधामुळे आफ्रिकेच्या अंतर्भागांत प्राचीनकाळी कशा प्रकारचे जीवन होते याची झलक समजू शकेल. १९६० मध्ये झाम्बेझी नदीवरील करींबा धरणाजवळ पाण्याच्या टाकीच्या पायाकरता मजूर खोदकाम करीत होते. तेव्हा त्यांना सोन्याचे दागिने घातलेला एक सांगाडा सापडला. तेथपासून उत्खनन केल्यानंतर इंगोम्बे-इलेडेची संस्कृती सापडली.

विषुववृत्तीय आफ्रिकेमध्ये व्यापाराचे रस्ते कोणते होते, याविषयी आज काहीच माहीत नाही. पण तेथील निर्यातीचा मुख्य माल हस्तिदंत होता. हस्तिदंताला हिंदुस्थानात अमाप मागणी

होती. आफ्रिकन हस्तिदंत मऊ असे व त्यावर नाजूक कोरीव काम करता येत असे. त्या मानाने भारतीय हस्तिदंत फारच कठीण असे. इ. स. पूर्वीच्या ग्रीक संस्कृतीच्या काळातही लोकांना हस्तिदंताचे फार आकर्षण होते. व्हिक्टोरिया सरोवराजवळ आफ्रिकेतील हत्तींचे सर्वांत मोठे कळप होते. त्यामुळेच की काय भुगोलज्ञ टॉलेमीला मध्य आफ्रिकेतील या प्रचंड सरोवराची माहिती होती.

इ. सनाच्या नवव्या शतकात एक चिनी अधिकारी तुआन चेंग शिह याने पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्याचे वर्णन लिहून ठेवले आहे. तेथील त्याने मालींदी बंदराचे वर्णन केले आहे आणि लोकांची राहणी कशी होती याचेही वर्णन केले आहे. मालींदीच्या दक्षिणेकडील मोंबासा बंदरही खूप प्राचीन आहे. तेथे उत्खननात हजार वर्षांपूर्वीची चिनी भांडी सापडली आहेत. प्राचीन काळच्या चीनमध्ये आफ्रिकन गुलाम असत आणि आफ्रिकेतील हस्तिदंत व सुगंधी वस्तू चीनमध्ये वापरली जात असत, याबद्दल लेखी पुरावा मिळाला आहे.

इ. स. १२२५ मध्ये परकीय व्यापाऱ्यांवर लक्ष ठेवणाऱ्या चिनी अधिकाऱ्याने झांजीबारचा उल्लेख केला आहे. चीनचा पूर्व आफ्रिकेशी संबंध नक्की केव्हा आला होता हे सांगता येत नाही. मात्र दुसऱ्या शतकानंतर सुमात्रा बेटातील लोक हिंदी महासागरातून जहाजातून येऊन व्यापार करीत असत. त्याचप्रमाणे शिडाची अरबी जहाजेही इंडोनेशियाकडे नियमित जात असत. हिंदी महासागरातून येणारा व्यापारी माल फारच हळू हळू पुढे जात असे. एका बंदरातून दुसऱ्या बंदरात जाता जाता शेवटच्या ग्राहकाकडे माल पोचायला कित्येकदा वर्षेच्या वर्षे लोटत ! पूर्व आफ्रिकेच्या

अंतर्भागातील स्वाहिली राज्यकर्त्यांना चीनीमातीच्या भांड्यांचे फार आकर्षण वाटत असे.

चीनच्या सम्राटाकडे त्यांचे मांडलिक नेहमीच नजराणा पाठवत असत. १५०० व्या शतकाच्या पूर्वार्धात कोणा एका मांडलीकाने मालीन्दीहून एक जिराफ पैदा करून तो पेकिंगला पाठवला होता. या विचित्र प्राण्याचे स्वागत पेकिंगच्या फेंग तेन प्रवेशद्वाराजवळ मोठ्या समारंभाने करण्यात आले. त्याची आठवण म्हणून चित्रे काढण्यात आली व कविताही करण्यात



जिराफ चीनमध्ये नेला त्या वेळी तेथे काढलेले त्याचे चित्र

आल्या ! मालींदीहून जो दूत जिराफ घेऊन आला होता त्याला चेंग हो या दर्यासारंगाबरोबर नौकांचा मोठा ताफा देऊन पाठविण्यात आले. अशा प्रकारे युरोपियनांना पूर्व आफ्रिकेविषयी जेव्हा काहीच माहिती नव्हती त्याकाळात चिनी लोकांनी तेथे भेट दिली होती.

इ. सनाच्या दुसऱ्या शतकापासून अरब पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्याने जलप्रवास करत होते. पूर्व आफ्रिकेच्या या किनाऱ्याला ' झेंजचे साम्राज्य ' असे नाव होते. त्यावरूनच पुढे झांजिबार असे नाव पडले असावे.

प्रेषित मंहमदाच्या मृत्यूनंतर सातव्या शतकात अरबी संस्कृतीचा खूपच प्रसार झाला. या काळात सोमालिया, केनिया व टांझानियाच्या किनाऱ्याने अरबांच्या वसाहती स्थापन झाल्या. सातव्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत म्हणजे पोर्तुगीज या भागात येईपर्यंत पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्याचे राज्यकर्ते फक्त अरबच होते. त्यांना प्रतिस्पर्धी नव्हता.

अरब मोसमी वाऱ्यांच्या अनुरोधाने प्रवास करीत. हे मोसमी-वारे नोव्हेम्बरपासून मार्चपर्यंत इशान्येकडून वाहात येत आणि मेपासून सप्टेम्बरपर्यंत उलट दिशेने म्हणजे नैऋत्येकडून वाहात असत. त्यांच्या शिडाच्या जहाजात ते कापड, मणी, लोखंड व इतर सामान आफ्रिकेच्या किनाऱ्याकडे नेत आणि तेथे त्याच्या बदली धातू, हस्तिदंत व गुलाम घेत असत. इ. सनाच्या नवव्या शतकात लिहिल्या गेलेल्या ' अरेबियन नाईटस ' मध्ये आफ्रिकन गुलामांचे उल्लेख आहेत. जहाजांचे अरबी मालक ' सोफाला ' या प्राचीन बंदरापर्यंत जात असत. हे बंदर ऱ्होडेशियातील झिंबाबवे पासून चारशे किलोमीटर अंतरावर आहे. कधी कधी ते

त्याहीपेक्षा दक्षिणेकडे जात असले पाहिजेत. कारण दक्षिण आफ्रिकेमधील प्राचीन गुहेमध्ये एका चित्रात एका माणसाचा पोषाख अरबाप्रमाणे दाखवला आहे.

अरब लोक किनारा सोडून आफ्रिकेच्या अंतर्भागात मात्र घुसले नाहीत. आफ्रिकन व्यापारी माल घेऊन समुद्र किनाऱ्याला येत. आणि त्यांच्याशीच अरबांचा व्यवहार होत असे. या किनाऱ्यावर अरबांच्या व्यापारामुळे लामू, मोंबासा, किलवा अशी अनेक शहरे उदयाला आली होती. अशी एक आख्यायिका आहे की, हुसेन बिन अली या व्यापाऱ्याने किलवा बेट इ. स. ८५० मध्ये विकत घेतले. किंमत म्हणून त्याने सर्व बेटाला वेढून टाकेल इतके कापड दिले ! किनाऱ्याच्या लगत असलेल्या टोळ्यांचे व अरबांचे नेहमी झगडे होत असत. परंतु तरीही त्या भागात इस्लामचा प्रसार झाला व तो धर्म या भागात चिरस्थायी झाला.

अरबांचा राज्यविस्तार व धर्मविस्तार चालला होता त्या काळात इस्लाम धर्म पश्चिम आफ्रिकेतही पोहचला होता. आशियातून आणलेल्या उंटांवर व घोड्यांवर बसून अरबांनी सहारा वाळवंट ओलांडले आणि ते नायगर नदीच्या समृद्ध प्रदेशात पोहचले. इ. १०५४ मध्ये या भागावर इस्लामाचा प्रचार करणाऱ्या बेरबर टोळ्यांनी हल्ला केला. तिम्बक्तू शहराची स्थापना याच काळात झाली. ‘ तिम्बक्तू ’ हे नाव एका गुलाम स्त्रीचे होते. अन्नसाठा राखण करायला तिला नायगर नदीच्या तीरावर नेमले होते. पुढे अनेक शतकानंतर तिम्बक्तू हे नाव आख्यायिका ठरणार होते व तिम्बक्तूच्या आकर्षणाने अनेक पाश्चात्त्य संशोधक आपले प्राण पणाला लावणार होते !

अरबांचा व्यापार वाढू लागला तेव्हा अरबी विद्वानही त्यांच्याबरोबर जाऊ लागले. ते लांबवरचा प्रवास करत आणि प्रवासातील सर्व हकीगती लिहून ठेवत. यांपैकी मसुदी हा एक विद्वान गृहस्थ होता. दहाव्या शतकाच्या सुरुवातीला तो बगदाद-मध्ये जन्मला त्याने आपल्या आयुष्याची वीस वर्षे सागरी सफरीत व संशोधनात घालवली. त्याचा प्रवास मुख्यतः हिंदी-महासागरात झाला.

मसुदी झांजिबारला गेला व तेथे सोन्याचा व्यापार कसा चालतो याचे वर्णन त्याने लिहून ठेवले. मसुदीचे अहवाल व सफ-रीचे वृत्तान्त अभ्यासपूर्ण व सखोल आहेत. तेव्हापासून म्हणजे दहाव्या शतकापासून मूर लोकांच्या भौगोलिक लिखाणाच्या परं-परेला सुरुवात झाली.

मसुदीनंतर 'इब्न हौकस' 'अल् बाकली' आणि 'अल् इदरिसी' यांचेही वृत्तान्त लिहिले गेले. 'अल् इदरिसी' बाराव्या शतकात स्पेनमध्ये राहात होता. त्याने चांदीत कोरलेला जगाचा नकाशा तयार केला होता. त्याच्या ज्ञानाला मर्यादा होत्या परंतु त्याने आफ्रिकेच्या अंतर्भागातील काही तपशील बरोबर दाखवले आहेत. टॉलेमीप्रमाणे त्यानेही हजार वर्षांपूर्वीच नाईल नदी चंद्र पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या विस्तीर्ण सरोवरातून उगम पाव-ताना दाखवली आहे. दुसरी एक मोठी नदी अटलांटिक महा-सागराला मिळताना दाखवली आहे. ही दुसरी नदी, नायगर नदीबद्दल त्याला जी माहिती होती त्या आधारे दाखवली असावी.

अरबांचे अनेक भौगोलिक वृत्तान्त काळाच्या ओघात नष्ट झाले. इब्न सैद याच्या १३ व्या शतकातील एका वृत्तान्तात

सुदानबद्दल खुलासेवार माहिती दिली होती. पण तो वृत्तान्त नष्ट झाला आहे.

सुदैवाने इब्नबतूत या प्रवाशाचा वृत्तान्त मात्र टिकून राहिला व उपलब्ध झाला आहे. त्याने इ. स. १३२५ पासून १३५५ पर्यंत एक लाख वीस हजार किलोमीटरचा प्रवास केला. त्याचा जन्म उत्तर आफ्रिकेत झाला होता, तो प्रवास करत करत चीनला आला होता. त्याने मक्केची यात्राही केली होती. त्याने आफ्रिकेत सध्याच्या टांझानियापासून सध्याचा नायजेरीयापर्यंत प्रवास केला होता. उत्तर गोलार्धात अरब किती लांबवर पसरले होते याची कल्पना इब्नबतूताच्या एका उल्लेखावरून येईल. पश्चिम आफ्रिकेच्या एका अंतर्भागात त्याला एक पोर्तुगालहून आलेला व्यापारी भेटला. या व्यापाऱ्याच्या भावाला इब्बनबतूत चीन-मधील फुकचौ येथे भेटला होता.

परकी व्यापारी आफ्रिकेच्या अंतर्भागात व्यापार वाढवू पाहात होते. त्याच वेळी आफ्रिकेमध्ये आफ्रिकन लोक जास्त चांगल्या सुपीक जमिनीच्या शोधात मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करू लागले होते. उदाहरणार्थ बांटू टोळ्या अनेक शतके सतत स्थलांतर करत होत्या. शेतकरी आपली गुरेढोरे घेऊन चांगल्या जमिनीच्या शोधात आणि धातूकाम करणारे कारागीर जास्त चांगल्या कच्च्या धातूसाठी सुदान आणि अिथोपिया येथून पश्चिम आफ्रिकेपर्यंत आणि दक्षिणेकडे केपपर्यंत स्थलांतर करत असत. त्यांची ही स्थलांतर मोहीम चालू असता मार्गात येणाऱ्या व अश्मयुगीन जीवन जगणाऱ्या शिकारी टोळ्यांना ते जिंकून घेत आणि अनेकदा त्यांचा समावेश आपल्या जमातीतही करून घेत असत. आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर, विशेषतः विषुववृत्तीय

आफ्रिकेमध्ये मोठमोठ्या दगडी इमारतींचे अवशेष आजही आढळतात. हे अवशेष राजवाडे, मशिदी आणि थडगी यांचे आहेत. हिंदी महासागराच्या किनाऱ्यावरील ही मुस्लीम शहरे सहाशे वर्षांपूर्वी भराभराटीस आली होती. या शहरातील राज्यकर्ते अरब होते. पण नागरिक आफ्रिकन आणि अरब असे मिश्र होते या मिश्रवंशास स्वाहिली म्हणत आणि अरबीपासून तयार झालेल्या मिश्रभाषेला स्वाहिली असेच नाव आहे. ही भाषा आजही पूर्व आफ्रिकेत बोलली जाते.

किवा येथील उद्ध्वस्त अवशेषांजवळ जी तांब्याची नाणी सापडली ती चवदाव्या शतकातील सुलेमान राजाची होती. याकाळातच इब्नबतूता या प्रवाशाने पूर्व आफ्रिकेला भेट दिली होती. त्याने लिहून ठेवले आहे–

'आम्ही मोंबासाला पोहोचलो. हे एक मोठे बेट आहे. येथे फळझाडे भरपूर आहेत, पण धान्य पिकत नाही. ते स्वाहिली लोकांच्याकडून आणावे लागते. येथील लोक धार्मिक आणि न्यायी आहेत. त्यांनी मोठमोठ्या मशिदी बांधल्या आहेत.' मोंबासाला काही दिवस राहून इब्नबतूता किवा येथे गेला. त्याबद्दल त्याने लिहिले आहे–

'येथील सर्व लोक काळे आहेत बहुतेकांच्या तोंडावर गोंदवलेले असते. मला एका व्यापाऱ्याने सांगितले की, सोफाला येथून पंधरा दिवसांच्या प्रवासावर आहे. व तेथे सोन्याची पूड मिळते.'

इब्नबतूताला बहुधा झिम्बाब्वे येथील खाणीतून सोने काढणाऱ्या व ते विकणाऱ्या व्यापाऱ्यांची माहिती द्यायची असावी. इब्नबतूताने किवा येथील लोकांचे अंतर्भागातील टोळ्यांशी कसे झगडे

होत असत तेही लिहिले आहे.


आफ्रिकेच्या शोधाचा इतिहास संपूर्णपणे सांगता येणार नाही. काही शतकांमध्ये काय घडले त्याचा हिशोबच लागत नाही! नाईल नदीच्या मुखाशी अलेक्झाँड्रिया बंदर आहे. इ. स. पूर्वी २०० वर्षांपासून तेथील ग्रंथालय समृध्द व प्रसिध्द होते. इ. स, ७४२ मध्ये खलीफा उमर याने हे समृध्द ग्रंथालय जाळून टाकले. त्याबरोबर त्या काळातील अनेक महत्त्वाची माहिती जळून खाक झाली.

एकोणविसाव्या शतकापर्यंत आफ्रिकेतील कोणत्याही जमातीस अथवा समाजास लिपीचा शोध लागला नव्हता. ज्या होत्या त्या सर्व बोलीभाषा होत्या. तोंडातोंडी चालत आलेल्या हकिगतीवरून काही जुनी माहिती समजते, पण त्याला शेवटी मर्यादा पडतात. दक्षिण आफ्रिकेच्या काही टोळयांमध्ये ज्या तोंडी हकिगती सांगितल्या जातात, त्यानुसार तेथला इतिहास तेराव्या शतकापर्यंत सांगता येतो. कांगोमधल्या कसाई जमातीचे लोक दोनशे वर्षांपूर्वी पोर्तुगीज नाविक कसे जात येत होते त्याचे वर्णन ते करू शकत होते. तरीही तोंडी हकिगती किती विश्वसनीय मानायच्या हा प्रश्न उरतोच. म्हणून आफ्रिकेचा बहुतेक इतिहास उत्खननातून मिळणाऱ्या साधनांमधूनच मिळवावा लागतो.

इजिप्तमध्ये पिरॅमिडस्‌मधील फारोहाच्या थडग्याचे जे उत्खनन झाले त्यामुळे खूपच माहिती मिळाली. आफ्रिका खंडात इतरत्र मात्र फारसे उत्खनन अजून झाले नाही. ज्या ठिकाणी प्राचीन अवशेष मोठ्या प्रमाणात सापडतील अशी खात्री आहे, त्या ठिकाणी मुळीच उत्खनन झाले नाही. उदाहरणार्थ, अंगोला, कांगो, पश्चिम किनारा आणि अरबस्तानासमोरचा आफ्रिकेचा प्रदेश

येथे अजिबात उत्खनन झाले नाही. उत्खनाला पैसा लागतो आणि असा पैसा वाया घालवणे आफ्रिकी राष्ट्रांना पसंत नसावे !

इजिप्ताच्या दक्षिणेकडे 'कुश' जमातीची आफ्रिकन संस्कृती नांदत होती. मध्य आफ्रिका आणि इजिप्त यांच्यामधील दुवा जोडण्याचे काम या 'कुश' संस्कृतीने केले होते. पण या संस्कृतीचा फारच थोडा अभ्यास झाला आहे. त्यांची लिखित भाषा होती. पण त्यांच्या लिपीचे कोडे अद्यापही उलगडलेले नाही. या संस्कृतीची मंदिरे, राजवाडे, थडगी यांचे उद्‌ध्वस्त अवशेष कुठे कुठे सापडतात. पण त्यांचा अभ्यास अद्यापही झाला नाही.



ख्रिस्तसनापूर्वीपासून सहारा वाळवंट ओलांडून अरब व्यापारी जात असत !

अलीकडे थोडयाच वर्षांपूर्वी नायजेरियामध्ये जुन्या नॉक संस्कृतीचा शोध लागला. परंतु उत्खननात जो पुरावा सापडला, तो अपुरा व तुटक आहे. आफ्रिकेमध्ये उत्खनन करण्यास योग्य असलेल्या जागांपैकी नव्याण्णव टक्के जागांचे संशोधन झालेले नाही. इतिहासकार प्लिनीने म्हटले आहे, 'आफ्रिकेबद्दल नेहमी नवी नवी माहिती मिळत असते. आफ्रिकेच्या पोटात किती आश्चर्ये दडली असतील कोणास ठाऊक!'

रोमन साम्राज्यापासून पंधराव्या शतकापर्यंत पश्चिम आफ्रिकेचा संबंध बाह्य जगाशी कोणाशी व कसा आला हे अरब वृत्तान्तावरून आणि किरकोळ उत्खननातूनच समजते. अन्य साधने नाहीत. घाना येथे सेनेगॉल आणि नायगर नदीच्या दुआबात एक साम्राज्य उदयाला आले होते. इ. स. ७३० मध्ये मोरोक्कोमधील अरबांनी या भागातील साम्राज्यावर एक लष्करी मोहीम काढली होती. या मोहिमेचा उद्देश तेथील सोन्याचा व्यापार ताब्यात घेण्याचा होता. हे सोने सेनेगॉल मधून येत असे. वाग्मारा येथील नदीत ते सोने सापडत असे. त्या काळात युरोपला सोन्याचा मुख्य पुरवठा येथूनच होत असे. मोरोक्कोतील अरबांनी केलेल्या हल्ल्याला घानाने यशस्वी तोंड दिले. पुढे घानाचे साम्राज्यही सामर्थ्यवान झाले. हे राज्य दोन लाखांची फौज उभी करू शकत होते. 'इब्न हकवाल' याने इ. स. ९५० मध्ये प्रत्यक्ष डोळयांनी पाहिलेली हकीगत लिहून ठेवली आहे. उत्तर आफ्रिका आणि घाना यामध्ये सुसंघटित व्यापार चालत असल्याचे त्याने नमूद केले आहे. प्रवास करता करता इब्न हकवालने नायगर नदी पाहिली. ही नाईल नदी असावी असे त्याला वाटले.

'कुम्बी सालेह' येथे थोडे उत्खनन झालें आहे. या उत्खननात

या जुन्या संस्कृतीतील भव्य घरे व वाडे सापडले आहेत. घानाचे प्राचीन काळचे राजे गोऱ्या कातडीचे होते अशा आख्यायिका तेथे सांगितल्या जातात. त्याचप्रमाणे तशाच कथा घानाहून पूर्वेकडे असलेल्या कानेम आणि बोर्नू या राज्यांविषयी सांगितल्या जातात. हे गोरे राज्यकर्ते सेरेनिकाचे ज्यू असावेत असेही कोणी कोणी सुचवतात.

घानाचे हे स्वतंत्र राज्य अनेकदा परकीय आक्रमणाला बळी पडले आणि त्याने पुन्हा पुन्हा आपले स्वातंत्र्य परत मिळवले. हे जुने साम्राज्य सातशे वर्षे टिकले होते. पश्चिम आफ्रिकेत १९५७ मध्ये जे पहिले राज्य स्वतंत्र झाले त्याने या जुन्या साम्राज्याचे घाना हे नाव धारण केले. परंतु या नव्या घाना राज्यालगतचा प्रदेश जुन्या घाना साम्राज्यापासून १६०० किलोमीटर लांब आहे !

इ. स. १३२४ मध्ये सहारा वाळवंट ओलांडून एक मोहीम पश्चिम आफ्रिकेतून गेली होती. माली प्रदेशाचा निग्रो राजा ‘मन्सा मुसा’ याने या मोहीमेचे नेतृत्व केले होते. घाना साम्राज्याला उतरती कळा लागल्यानंतर मालीचे राज्य पश्चिम आफ्रिकेत सर्वशक्तीमान झाले. ‘मान्सा मुसा मुसलमान झाला होता आणि त्याने मक्केची यात्रा करायचे ठरवले होते. त्याने सहारा वाळवंट ओलांडून जायचे ठरवले होते. त्याने बरोबर पाचशे गुलाम घेतले. प्रत्येक गुलामाजवळ सोन्याचा दंड देण्यात आला. शंभर उंट, कित्येक घोडेस्वार आणि मुसाच्या अनेक बायकाही ताफ्यात होत्या. यापूर्वी मालीचे राज्य लोकांना माहीत होते. मालीचे वकील उत्तर आफ्रिकेत व इजिप्तमध्ये होते व त्यांचा व्यापारही चालत असे.

परंतु जेव्हा 'मन्सा मुसा' कैरोला पोचला तेव्हा त्याच्या ऐश्वर्याने सर्वजण दिपून गेले. त्याने सोन्याच्या ज्या भेटी दिल्या, त्यामुळे सगळीकडे सोनेच सोने होऊन पुढची बारा वर्षे सोन्याचा भाव कमी झाला! त्या वेळचा इजिप्शियन अधिकारी 'अल् ओमीरी' याने लिहिलेल्या वृत्तान्तावरून ही माहिती मिळते.

आपल्या मक्केच्या यात्रेप्रसंगी मुसाने आपल्या नोकरीत विद्वान लोक घेतले व तो त्यांना घेऊनच मालीला परतला. यापैकी एक 'अल् सहेदी' होता. तो कवी व वास्तूशास्त्रज्ञ होता. भाजलेल्या विटांची घरे बांधण्याचे कसब त्यानेच पश्चिम आफ्रिकेला शिकवले. त्याचे बरोबर जे विद्वान आले, त्यांनी पाठशाळा काढल्या व ग्रंथालये स्थापली. या काळानंतरच तिम्बक्तू या शहराची कीर्ती विद्येचे स्थान म्हणून उत्तर आफ्रकेत पसरली.

मन्सा मुसा १३३२ मध्ये मृत्यू पावला. त्याचा पुतण्या 'मघान' गादीवर आला. पण त्याच्या कारकिर्दीत साम्राज्य खिळेखिळे झाले. पुढे देलेमानच्या कारकिर्दीत माली राज्याची पुन्हा भरभराट झाली. याच वेळी इ. स. १३५२ मध्ये इब्नबतूता या अरबी प्रवाशाने माली राजाला भेट दिली. तो लिहितो– 'या देशात पूर्ण सुरक्षितता आहे. प्रवासी किंवा नागरिक यांना चोर– लुटारूंचे मुळीच भय वाटत नाही.'

तेथील संपत्ती व दरबारी रितीरिवाज पाहून इब्नबतूता चकित होऊन गेला. ज्या वेळी राजा दरबारात प्रवेश करेल, त्या वेळी त्याचे मागोमाग शेकडो गुलाम व संगीतकार उभे असत. मोरोक्कोशी चालणाऱ्या मोठ्या व्यापारातून माली राज्याला हे वैभव प्राप्त झाले होते. उंटाच्या मार्गाच्या एका ताफ्यावर १२

हजार उंट वापरले जात असत.

इब्नबतूताच्या भेटीनंतर वीस वर्षांनी युरोपात पश्चिम आफ्रिकेचा पहिला नकाशा तयार करण्यात आला. त्या नकाशात 'एक काळा राजा' सिंहासनावर बसलेला दाखवला होता आणि त्याखाली लिहिले होते. या निग्रो राजाचे नाव मुसा माली आहे. तो गिनीच्या निग्रोंचा राजा आहे. त्याच्या देशात इतके सोने सापडते की, तो पृथ्वीवरील सर्वांत श्रीमंत राजा आहे.'

'गिनी देशातील सोन्याच्या प्रचंड साठ्याविषयी ऐकून हा सर्व व्यापार अरबांच्या हातातून घेण्याचा लोभ पोर्तूगीजांना होऊ लागला. या लोभामुळेच पोर्तूगीजांनी या प्रदेशात संशोधन-मोहिमा पंधराव्या शतकात सुरू केल्या.

इ. स. ७०० पासून १४०० पर्यंत आफ्रिकेच्या उत्तर भागात मुसलमान धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. निळ्या नाईलच्या पूर्वेकडे पर्वतांच्या प्रदेशात फक्त ख्रिश्चनधर्मियांचा एक टापू शिल्लक राहिला. या प्रदेशांचे प्राचीन नाव 'ॲक्झम' होते. येथील ख्रिश्चन लोक दक्षिण अरबस्तानातील सेवा येथून आले असावे. जुन्या ॲक्झम राज्याच्या राजधानीचे जे अवशेष सापडले आहेत, त्यात शंभरपेक्षा जास्त दगडी स्तंभ आहेत आणि त्यातील काही स्तंभ वीस मीटर उंच आहेत. येथे ख्रिश्चन धर्म चवथ्या शतकात रुजला. असे सांगतात की, तांबडच्या समुद्रावरील एका बंदरात 'एडिसियस' आणि 'फ्रुमेंटीयस' नावाची दोन रोमन मुले पकडण्यात आली होती. ती ख्रिश्चन होती. त्यांना पकडून ॲक्झमकडे नेण्यात आले. ते दोघे तरुण झाल्यावर त्यांना रोमला जाण्याला परवानगी देण्यात आली. त्यांपैकी 'फ्रुमेन्टीयस' ख्रिचन भिक्षू बनून ॲक्झमला परत आला आणि त्याने तेथील

राजाला ख्रिश्चन धर्माची दिक्षा दिली. अशातऱ्हेने ॲक्झम येथे ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाला.

ॲक्झम येथून इजिप्त व सोमालिया येथील व्यापाराचे चांगले नियंत्रण होत असे. येमेनचा व्यापारही ॲक्झमच्याच हातात होता. सहाव्या शतकातील एक ग्रीक प्रवासी अलेक्झांड्रीन याने ॲक्झम येथे गुरे आणि लोखंड यांचा सोन्याशी वस्तुविनिमय कसा होत असे याचे वर्णन लिहिले आहे. आठव्या शतकात अरबांनी या भागातील ख्रिश्चनांचा पराभव करून त्यांना मागे रेटले. अबिसिनियातील ख्रिश्चनांनी डोंगराचा आश्रय घेतला. त्यांचा इतर ख्रिश्चन जगाशी संबंध तुटला. मात्र या भागातील ख्रिश्चन जेरुसलेमच्या यात्रेला जातच असत. पुढच्या काळात आफ्रिकेच्या या भागात ख्रिश्चनधर्मीय होते. याची आठवणही युरोपखंडातील लोकांना झाली नाही.

इ स १२०० मध्ये नेगूस ललीबेला या सम्राटाच्या कारकिर्दीत इथोपियन राज्य पुन्हा सामर्थ्यवान बनले. या राजाने इजिप्तकडे वकील पाठविला होता. तेराव्या शतकाच्या शेवटी पूर्वेकडे जायचा मार्ग शोधत असलेल्या व्हेनिशियन व्यापाऱ्यांचा संबंध इथोपियाच्या या ख्रिश्चन राज्याशी आला. इ. स. १३३९ मध्ये इथोपियाच्या या ख्रिश्चन राज्याविषयी बरोच माहिती उपलब्ध झाली होती. यानंतर पन्नास वर्षांनी इटलीमधील फ्लॉरेन्स येथील कारागीर इथोपियात तुर्कांच्याबरोबर काम करू लागले होते चौदाव्या शतकाच्या शेवटी आसपासच्या मुस्लिम राज्याशी इथोपियाचे नेहमी युद्ध चालू होते. आता इथोपियाचा इजिप्तशी संबध येऊ लागला. इ स. १४४५ मध्ये इथोपियन धर्मगुरूंचा एक जथा इटलीतील फ्लॉरेन्स येथे पोचला. तेव्हापासून इथो-

पियाचे युरोपशी दळणवळण सुरू झाले.

तेराव्या शतकाच्या शेवटी युरोपमधील अंधकार युग संपून ज्ञानाची क्षितिजरेषा उजळू लागली होती. ख्रिश्चन धर्मयुद्धामुळे युरोपचा संपर्क बाहेरच्या जगाशी आला. शिवाय आशियाच्या मध्यभागात स्थापन झालेल्या मोंगल साम्राज्याचे वृत्तान्त युरोपमध्ये समजत होते. हिंदुस्थान, चीनकडे जायचा व्यापारी मार्ग अरबांनी अडवून धरला होता. या व्यापारात मसाल्याच्या पदार्थांचा व्यापार महत्त्वाचा होता. या सर्वांमुळे नवीन नवीन प्रवासी मोहिमा काढण्याची इच्छा युरोपात होऊ लागली.

अशा युरोपीय प्रवाशांपैकी मार्को पोलो हा सर्वांत प्रसिद्ध आहे. तो व्हेनिसच्या व्यापाऱ्याचा मुलगा होता. मार्को पोलो लहान असतानाच त्याचे वडील व काका चीनचा प्रवास भूमार्गाने करून आले होते. मार्को पोलो जेव्हा सतरा वर्षांचा होता तेव्हा त्याच्या वडिलांनी आणि काकांनी आपल्या दुसऱ्या प्रवासी मोहिमेत त्याला बरोबर घेतले. मार्को पोलो व्हेनिसला परतला तेव्हा त्याचे वय बेचाळीस वर्षांचे झाले होते. आणि तो कॅथे, (चीनचे प्राचीन नाव) सुमात्रा, सिलोन येथे प्रवास करून आला होता. तोपर्यंत कोणत्याही युरोपियनाने इतक्या दूरवर प्रवास केला नव्हता. शिवाय मार्को पोलोला स्मरणशक्तीची व लेखनाची देणगी होती. त्याने जे जे पाहिले ते ते सर्व तपशीलवार लिहून ठेवले. त्याच्या जिवंतपणी नाना देशांच्या अद्भूत कथा ऐकून लोक त्याला थापाड्या म्हणत असत व त्याची चेष्टा केली जाई. पण त्याने लिहिलेले पुस्तक मात्र त्याच्या मृत्यूनंतरही फार लोकप्रिय झाले. युरोपियनांना शेवटी समजले की, युरोपच्या बाहेरही त्यांच्याइतकाच सुधारलेला समाज आहे, आणि जगाचा विस्तार युरोपच्या पलीकडे

प्रचंड आहे. तरीही इटलीमधील पोप धर्मगुरू चीनमधील आणि इतर बेटांतील रानटी लोकांना ख्रिश्चनधर्माची दिक्षा देण्यासाठी धर्मगुरू पाठवतच राहिले !

परंतु चवदाव्या शतकात युरोपहून पूर्वेकडे जाणारा खुष्कीचा-मार्ग मुसलमानांनी आणि मोंगलानी बंद करून टाकला. हिंदुस्थान व चीन येथील वैभवाचे व तेथे मसाल्याच्या पदार्थांचे ओझरते दर्शन युरोपियनांना झाले होते. तेथील सोने आणि मसाल्याचे पदार्थ मिळविण्याच्या हेतूने युरोपियनांनी पूर्वेकडे जाणारा जलमार्ग शोधायला सुरुवात केली पोर्तुगीज आणि स्पॅनिश लोकांचा यात जास्त पुढाकार होता. या जलमार्गाच्या संशोधना-बरोबरच आफ्रिकाखंडाच्या पश्चिम किनारपट्टीचे संशोधन आपो-आपच सुरू झाले.

□

प्रकरण तिसरे

# युरोपियन जागृतीच्या काळापूर्वीची आफ्रिकेतील साम्राज्ये

युरोपियन साहसी जलप्रवास सुरू होण्यापूर्वी आफ्रिकन लोकांचे जीवन स्थिरावले होते. प्रगतीची पावले फारच मंद होती. लोकांचा दररोजचा नित्यक्रम ठरलेला व बांधीव असे. समाजातील प्रौढ पुरुष शिकारीसाठी, मासे मारायला व मध गोळा करायला जात. स्त्रिया व मुले वस्तीच्या जवळपास राहून गुरे व मेंढ्या राखत व जंगलातील फळे गोळा करत. वस्तीजवळची भूमी उजाड व वैराण झाली तर सर्व वस्ती तेथून उठून दुसऱ्या चांगल्या भागात स्थलांतर करत असे. कर्त्या पुरुषांना काही दिवस घर व झोपड्या बांधायच्या कामात खर्च करावे लागत. या जीवनक्रमात फारसा बदल होत नसे. तसे ते सुखी जीवन होते. अमर्यादित भूमी पसरली होती व लोकसंख्या विरळ होती.

आफ्रिकन लोकांचे मूलस्थान कोठे असावे याविषयी बरीचशी माहिती त्यांच्या विश्वोत्पत्तिविषयी असलेल्या लोककथांतून मिळते. शिवाय त्यांचे धार्मिक रितीरिवाज व मुलांचे खेळ यातूनही बरीच माहिती मिळू शकते. आफ्रिकन समाजावर जादूटोणा व भुतेखेते यांचा फार प्रभाव होता. अनेकदा नवीन जन्मलेल्या मुलाला मृत आप्ताचे नाव दिले जाई. त्या मृत आप्तानेच या

मुलाच्या रूपाने पुन्हा जन्म घेतला आहे असे मानत असत. ज्या घटनेची कारणे समजत नसत त्या घटना दैवी शक्तीमुळे होतात असे ते मानत.

ज्या भागात साम्राज्ये स्थापन झाली होती, तो भाग वगळून इतरत्र सर्व ठिकाणी खेडेगावातल्या लोकांना आपल्या क्षितिज-रेषेपलीकडे काय आहे व तेथे काय चालले आहे याची माहिती नसे ! एखाद्या वेळेस एखादा महत्त्वाकांक्षी टोळीप्रमुख दुसऱ्या टोळीकडे आपला प्रतिनिधी पाठवत असे. असे प्रतिनिधी कधी कधी खूप लांबचा प्रवास करत. ते परत आल्यावर त्यांनी जे पाहिले असेल त्याची नोंद टोळीच्या लोककथांत केली जाई. संध्या-काळच्या वेळी टोळीतील म्हातारी माणसे या कथा आपल्या पदरची मिठमिरची लावून लोकांना सांगत असत.

खेडेगावच्या वस्तीत किंवा टोळीत प्रत्येक व्यक्तीला टोळीचे (खेड्याचे) ठरलेले नीतिनियम कसोशीने पाळावे लागत. हे नियम मोडणाऱ्यांना कठोर शिक्षा होत असे. टोळीप्रमुख हा अशावेळी न्यायाधिशाचे काम करत असे. सर्वांत कठोर शिक्षा मृत्यूदंडाची किंवा हद्दपारीची असे. मृत्यूची शिक्षा झालेल्याला बहुधा नदीत बुडवून मारत असत. किरकोळ नियम भंग झाल्यास मण्यांच्या स्वरूपात दंड द्यावा लागे.

संगीत आणि नृत्य ही आफ्रिकन समाजाची नित्याची करम-णूक होती. ढोल, बासरी आणि हातातील पियानो किंवा तंतूवाद्य ही त्यांची आवडती वाद्ये होती. हातातील पियानो किंवा तंतूवाद्य बहुधा हिंदीमहासागराकडून प्राचीन काळी आले असावे.

आफ्रिकाखंडातील लोकांचे आपापसात दळणवळण होते. पश्चिम आफ्रिकेपासून दक्षिणेकडे ट्रॉन्सवालपर्यंत ठिकठिकाणी

असलेली सुदानी राज्ये या दळणवळणाचा पुरावा देऊ शकतील. प्राचीन इजिप्तमधील धर्म या सुदानी राज्यांनी स्वीकारला होता. या राज्यांमध्ये मुख्य सूत्र ईश्वरप्रणीत राजसत्तेचे असे. राजा हा प्रतिपरमेश्वर असून प्रजा व परमेश्वर यांच्यामधील मध्यस्थांचे काम तो करतो अशी ही कल्पना होती. मृत राजाकडून विद्यमान राजाला ईश्वरी सत्तेचे अधिकार प्राप्त होतात असे मानत. मृत राजांच्या थडग्याला त्यामुळे फार महत्त्व आलेले असे. या सर्व कल्पना प्राचीन इजिप्तच्या संस्कृतीशी मिळत्या जुळत्या होत्या.

इजिप्तच्या प्राचीन संस्कृतींशी हे साम्य केवळ योगायोगाने आले नव्हते. इजिप्तच्या दक्षिणेच्या कुशलोकांकडून या कल्पना शेकडो वर्षांपूर्वी संक्रमित झाल्या होत्या.

पश्चिम आफ्रिकेमधील इबो टोळीचे लोक विसाव्या शतकातही पंख असलेल्या सूर्यदेवाची गोल प्रतिमा शरीरावर गोंदून घेतात. ही प्रतिमा प्राचीन इजिप्तमध्ये प्रचारात होती. घाना राष्ट्रात आणि पूर्व आफ्रिकेत इजिप्तमधील फारोहांचा धर्म आणि संस्कृती यांचा आजही विद्यमान असलेला प्रभाव ओळखता येतो. कांगोमधील लुंडालूबा साम्राज्याची स्थापना इ. स. सातशेच्या सुमारास झाली होती. तेथेही राजा हा ईश्वरी अंश आहे या तत्त्वावरच राज्याची उभारणी झालेली असे. आजही लुंडाचा राजा ‘ मावाटा ’ याला तेथील लोक परमेश्वराचा प्रतिनिधी मानतात. झांबिया राष्ट्रातील ‘ लोझी ’ जमातीत अशी श्रद्धा आहे की, स्वर्गातील परमेश्वराने पृथ्वीला भेट दिली तेव्हा त्याने राजवंश निर्माण केला.

बाकीच्या आफ्रिका खंडावर इजिप्तच्या संस्कृतीचा प्रभाव अनेक क्षेत्रात पडला होता. बेनिन येथील अवशेषात पिरॅमिडस्-

मध्ये सापडणारी कला दिसून आली आहे. नायजेरियातील योरूबा जमातीचे लोक इजिप्तमधील नाईल नदीच्या परिसरातून स्थलांतर करून आलेले असावेत, असा काहींचा तर्क आहे. कारण त्या जमातीत इजिप्तमधील चालीरिती व कला आजही दिसून येतात.

अशा अनेक मिश्रणामुळे स्थानिक आफ्रिकन संस्कृती तयार झाली आहे. आद्य आफ्रिकन जमातींपैकी अनेक जमातींत मुलांवर आणि मुलींवर वयात येताना विशिष्ठ प्रकारचे संस्कार केले जातात. या संस्कारांना या सर्व जमातीत महत्त्व दिले जाते. मुलावर होणाऱ्या या संस्कारांमध्ये त्याच्या धैर्याची कसोटी लागते. आफ्रिकेत आणखी एक चाल आढळते. एखाद्या गुन्ह्यासाठी एखादी जमात भूदास म्हणून राबवण्यात येते. गुलामगिरीचा सौम्य प्रकारच म्हणा ना !

परंपरागत आफ्रिकन समाजात खाणीतून धातू काढता येणाऱ्यांना फार मान असे. प्राण्यांची शिकार करण्यासाठी व शत्रूंशी लढण्यासाठी हत्यारांची व शस्त्रांची आवश्यकता होती व त्यासाठी धातू मिळविण्याचे काम हे खाणकाम करणारे लोक करत. खाणकाम करणारा जर नसेल तर सर्व जमातीला दुष्काळाला तोंड द्यावे लागे किंवा लढाईत हरल्यामुळे गुलाम व्हावे लागे. त्यामुळे खाणीसंबधी, व खाणकाम करणाऱ्यांच्या कौशल्यासंबधीची माहिती गुप्त राखण्यात येई. खाणकाम सुरू करण्यापूर्वी टोळीप्रमुख आपल्या पूर्वजांची प्रार्थना करत असे. तो प्रार्थनेमध्ये आपल्या पूर्वजांना विनवी ' तुम्हीच तुमच्या मुलांसाठी या पर्वताचा अंतर्भाग उघडला आहे ! तुमच्या कृपेनेच आम्हाला तेथील खजिना मिळू दे. ' खाणकामाच्या पद्धती निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या होत्या. अनेक ठिकाणी ३० मीटर खोल-

पर्यंत विहीरी खणून त्यातून अशुद्ध धातू काढत असत. किंवा उघडया खडकावर शेकोटया पेटवत आणि त्या आगीने तेथे भेगा पडल्या म्हणजे तेथे खणून काढत व कच्चे खनिज लाकडाच्या किंवा सालीच्या बादल्यांमध्ये भरून नेत. खाणकामामधील कष्टाचे काम स्त्रिया व लहान मुलेमुली करत. अशुद्ध खनिज पाण्यात धुऊन टाकत आणि मग ते भट्टीकडे नेले जाई.

भट्टीतून धातू तयार करण्याचे कसब त्या त्या जमातीपुरते कसोशीने गुप्त राखले जाई. भट्टी पेटवण्यापूर्वी धार्मिक विधी केले जात. भट्टी पेटली असताना लोक भोवती जमत आणि प्रार्थना म्हणत व गात. कच्चा खनिजातून धातू तयार करण्याचे काम दैवते करतात असा त्यांचा समज असे.

विषुववृत्तीय आफ्रिकेत खाणीतील मातीपासून तांबे तयार करण्याची कला तीन हजार वर्षांपासून माहित होती. पण तो धातू मऊ असल्याने हत्यारे तयार करायला त्याचा उपयोग नव्हता. लोखंड तापवून व पुन्हा पुन्हा ठोकून त्याचे पोलाद कसे करावे ही कला आफ्रिका खंडात दोन हजार वर्षांपूर्वीही माहित होती. लोखंडाचे पोलाद बनवण्याचे ज्ञान इ. सनापूर्वी ७०० वर्ष इजिप्त मध्ये पोहचले व तेथून ते नायजेरियात व अन्य भागांत पसरले.

लोखंडाचा उपयोग अवजारे व हत्यारांसाठी होत होता. तांबे मुख्यत: दागिन्यांसाठी वापरले जात असे. पण आफ्रिकेमध्ये सोने मात्र निर्यातीसाठीच गाळले जात असे. तेथे मजुरांचा तोटा नव्हता. त्यामुळे सोन्याचा थोडासासुद्धा अंश असलेली माती वापरून व खूप शारीरिक कष्ट करून सोने मिळवत असत. सोन्याच्या निर्यातीमुळेच आफ्रिकेचा संबंध बाहेरच्या जगाशी आला. सोन्याच्या या निर्यातीचा पुरावा म्हणून झिम्बा

(ऱ्होडेशिया) येथील एका सोन्याच्या खाणीच्या विहीरीत रोमन सम्राट 'अन्टोनियस पायस' याच्या शिक्क्याचे नाणे सापडले आहे. तो इ. स. १३८ ते १६१ मध्ये होऊन गेला.

आफ्रिकेवर युरोपियन सत्तांचा प्रभाव पडण्यापूर्वी व आक्रमण होण्यापूर्वी काही आफ्रिकन जमातींनी शिस्तबद्ध व संघटित युद्धाची कला अवगत केली होती. त्यांचे सामर्थ्य व संपत्ती व्यापारापेक्षा युद्धामुळेच वाढत असे. पराक्रमी झुलू लोकांची जमात अशा संघटित युद्धासाठी प्रसिद्ध होती. परंतु पाश्चिमात्त्यांच्या बंदुकी व तोफांपुढे त्यांचा पराक्रम फिका पडला व शेवटी त्यांचे कंबरडे मोडले.

झुलू लोक कोठून आले हे निश्चित सांगता येत नाही. पण ते बहुधा कांगोमधून दक्षिण आफ्रिकेमध्ये चौदाव्या शतकांत आले असावे. ते तेथे येऊन नगुनी लोकांत सामील झाले. सोळाव्या शतकामध्ये सध्याच्या ऱ्होडोशिया प्रदेशात पोर्तुगीजांच्या एका तुकडीवर नगुनी फौजेने हल्ला केला होता. त्यात झुलू लोक प्रमुख होते. सैन्याची अर्धचंद्राकार रचना करून ते चढाई करत असत. अशा चढाईबद्दल झुलू लोक पुढे प्रसिद्ध झाले.

दक्षिण आफ्रिकेमध्ये नगुनी जमात त्यांचा युरोपियनांशी संबंध येण्यापूर्वी कित्येक शतके स्थायिक झाली होती. या जमातीत १८ व्या शतकात 'डिंगीवायो' हा टोळीप्रमुख खूप सामर्थ्यवान झाला होता. त्याने युरोपियन सैनिकांना कवायत कशी शिकवतात हे पाहिले होते व त्यानुसार त्यानेही आपल्या सैन्याच्या तुकड्या पाडून त्यांना कवायत शिकवली होती. त्याच्या मृत्यूनंतर 'शका' नावाचा झुलू प्रमुखपदी आला. शका ज्या वेळेला वैभवाच्या शिखरावर होता तेव्हा तो एक लाख सैन्य रणांगणात उभे करू



नगुनी जमातीचा प्रमुख ‘शका’

शकत असे. त्याने नगुनी जमातीतील लहान लहान टोळ्यांना एकत्र आणले. त्याच्या सैन्याने फार मोठा प्रदेश जिंकला व

उद्‌ध्वस्त केला. शका क्रौर्याबद्दल प्रसिद्ध होता. एखाद्या सैनिकाने किरकोळ शिस्तभंग केला तरी त्याला मृत्युदंड दिला जात असे. त्याचे न ऐकणाऱ्या नगुनी जमातीतील टोळ्यांना त्याने हद्दपार केले. इतर आफ्रिकन जमाती नगुनींना प्रतिकार करू शकल्या नाहीत. नगुनींच्या एका सैन्यतुकडीने व्हिक्टोरिया सरोवरापर्यंत मजल मारली. त्यांच्या दुसऱ्या एका टोळीने लिपोंपो पलीकडे मतबेले साम्राज्य स्थापले. तिसरा सैन्य विभाग झाम्बेझी नदी-पलीकडे पोचला.

शकाचा खून त्याच्याच सावत्र भावाने केला, आणि त्या सावत्रभावांपैकी एक 'दिनगान' झुलूंचा प्रमुख झाला. झुलू सैन्याने आसपासचे मुलूख उद्‌ध्वस्त व वैराण करून टाकले. गावेच्या गावे उजाड झाली. हे सैन्य आफ्रिकेत युरोपियनांशी गाठ पडेपर्यंत अजिंक्य होते. १९ व्या शतकामध्ये या झुलू सैन्याची ब्रिटिश सैन्याशी दक्षिण आफ्रिकेत भीषण लढाई झाली. आणि त्यात पराभव होऊन 'सेरेवायो' या टोळीप्रमुखाच्या आमदानीत झुलूंची सद्दी संपली. झुलूंच्या साम्राज्याचा उदय व अस्त हीच आफ्रिकन जमातीच्या वर्चस्वाची मर्यादा होती. लिहिणे, वाचणे नसल्यामुळे त्यांना स्थिर राज्यव्यवस्था स्थापता आली नाही आणि आधुनिक शस्त्रास्त्रे नसल्यामुळे युरोपियनांचे आक्रमण थोपविता आले नाही.

आफ्रिकेतील वन्य प्राणी संशोधकांच्या कुतूहलाचे विषय झाले आहेत व अनेकदा त्यांचा बराच त्रासही संशोधकांना सोसावा लागला. आफ्रिकेचे क्षेत्रफळ २ कोटी, ९८ लाख चौरस किलो-मीटर आहे. विस्ताराने हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे खंड आहे. या खंडात हजारो प्रकारचे प्राणी पूर्वीपासून वस्ती करून

आहेत. प्राचीनकाळच्या व मध्ययुगीन नकाशात तर आफ्रिका खंडाची नकाशातील जागा विचित्र व भयंकर प्राण्यांच्या चित्रांनी भरून टाकलेली असे !

आशिया आणि युरोपमध्ये हस्तिदंताला प्रचंड मागणी होती व त्यामानाने पुरवठा फारच कमी होता. तीन हजार वर्षांपासून हस्तिदंत मिळविण्यासाठी साहसी लोक आफ्रिका खंडात शिरू पाहात होते. हस्तिदंतासाठी हत्ती मोठ्या प्रमाणात मारले जाऊनही त्यांचा वंश अजूनही टिकून राहिला आहे. टॉलेमी आणि फोनिशियन यांनी युध्दात हत्ती वापरले होते. पण ते हिंदुस्थानातून आणलेल्या हत्तीपासून निपजले होते. पण नंतरच्या काळात सहारा वाळवंटाला लागून असलेल्या जंगलामधून आफ्रिकन हत्ती पकडले जाऊ लागले व पाळले जाऊ लागले. चित्त्याच्या कातड्यालाही पुष्कळ भाव असल्यामुळे चित्त्यांची शिकारही मोठ्या प्रमाणावर होत असे. आफ्रिकेच्या जंगलामधून सिंह पकडून इटलीमध्ये नेले जात व रोमन लोकांच्या सर्कशीत वापरले जात. रोमन साम्राज्याच्या काळी उत्तर आफ्रिकेत सिंहांची वस्ती होती. विशेषत: ॲटलास पर्वताजवळ ते सापडत. गेल्या शतकामधील व विसाव्या शतकाच्या सुरुवातीस युरोपियन शिकाऱ्यांनी प्रचंड संहार करून उत्तर आफ्रिकेतील सिंह नाहीसा केला.

नाईल नदीच्या उगमाकडच्या भागात हत्ती, पाणघोडे आणि रानम्हशी यांचे मोठे कळप नेहमीच होते. पूर्व आफ्रिकेच्या मैदानात हरणे आणि जिराफ यांचे हजारोंचे कळप आढळून येत. दक्षिणेकडील सॅव्हानाच्या सोळाशे किलोमीटरच्या पट्ट्यात वन्य प्राण्यांचा फार मोठा संहार झाला. मुख्यत: शिकारीसाठी आणि प्राणघातक त्सेत्से माशा नाहीशा करण्यासाठी हा संहार झाला. दक्षिण कांगो-

मध्ये एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला वन्य प्राण्यांचे शेकडो कळप होते. आता तेथे हे प्राणी क्वचित् दिसतात.

गोरीला माकडाचे नाव आणि वर्णन खिस्ती सनाच्या सुरुवातीच्या पूर्वीही लोकांना माहीत होते. पण हे माकड प्रत्यक्षात एका अमेरिकन मिशनऱ्याने १८४७ मध्ये प्रथम पाहिले व शोधून काढले. गोरीलाला जवळ असणारे दुसरे चिपांझी माकड मात्र आफ्रिका खंडात सर्वत्र पसरले आहे.

आफ्रिकेतील वन्य पशूंच्या जीवनावर युरोपियनांच्या संशोधन मोहीमांमुळे व बंदुकीच्या शोधामुळे फार वाईट परिणाम झाला. दक्षिण आफ्रिकेतील 'क्वेगा' नावाचे प्राणी नाहीसेच झाले! पांढरे गेंडे दुर्मिळ झाले. शिकारीमध्ये प्रचंड संहार होऊनही आफ्रिकेत नानाप्रकारचे प्राणी आणि मासे आपला वंश टिकवून आहेत. आफ्रिकेइतकी प्राणीजीवनातील विविधता इतरत्र पाहायला सापडत नाही.

पंधराव्या शतकामध्ये आफ्रिकेमध्ये अनेक वैभवसंपन्न साम्राज्ये नांदत होती. त्यापैकी एक राज्य मालीचे होते. मालीचा एक सम्राट 'मेन्सामुसा' मक्केच्या यात्रेला गेला होता हे मागे लिहिले आहेच. मालीचे साम्राज्य वैभवाच्या शिखरावर होते तेव्हा पूर्व-पश्चिम सोळाशे किलोमीटर पसरले होते व दक्षिणोत्तर रूंदी आठशे किलोमीटर होती. माली राज्याची कीर्ती अरबांच्या वृत्तान्तावरून युरोपपर्यंत गेली होती. इ. स. १४७० मध्ये इटली-मधील फ्लारेन्सचा व्यापारी 'बेनेडेक्टोदेई' तिंबक्तु येथे जाऊन राहिला होता व कापडाचा व्यापार करीत होता.

माली साम्राज्य व समुद्रकिनारा यामध्ये बेनिन येथे सुसंस्कृत व सुधारलेले लोक राहात होते. इ. स. १४७२ मध्ये पोर्तुगीज

संशोधक रू द सिग्वेरा बेनिन शहरात पोचला होता. ते शहर स्वच्छ होते व तेथील रस्ते रुंद होते.

आणखी दक्षिणेकडे कांगोचे राज्य होते. या राज्याचा विस्तार महाराष्ट्राएवढा होता. या राज्यात कुशल शेतकरी, विणकर, आणि भट्टयांतून लोखंड काढणारे लोक राहात असत.

आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर आणखी दक्षिणेकडे झिम्बाब्वे आणि खामी येथे मोठी साम्राज्ये होती. झिम्बाब्वे येथे इ.स. १३५० च्या सुमारास रोझवी घराणे राज्य करीत होते. किनाऱ्यावरील शहर सोफाला येथून या राज्याचा संबंध अरब व्यापारांशी येत असे. तेथेच जवळ 'मोनोमोटापा' हे खाणीसाठी प्रसिध्द असलेले ठिकाण होते. येथून कांगोपर्यंत झाम्बेझी नदीच्या काठाने व्यापार चालत होता. 'मोनोमोटापा' हे शहर खाणीमुळे भरभराटीला आले. तेथील लोक उत्तम विणकर आणि दगडाचे कोरीवकाम करणारे होते. इ. स. पंधराशेपर्यंत 'मोनोमोटापा' युरोपियन लोकाना माहीत नव्हते, पण नंतर तेथील संपत्तीबद्दल युरोपमध्ये अफाट अफवा पसरल्या. इ. स. सतराशेमधील एका ब्रिटिश नकाशात येथील साम्राज्य मध्य-आफ्रिकेपासून केप ऑफ गुड-होपपर्यंत पसरलेले दाखवले आहे.

आफ्रिकेच्या अंतर्भागात उदयाला आलेली ही राज्ये-साम्राज्ये कदाचित् आणखी प्रगत झाली असती. किंवा काळाच्या ओघात नष्टही झाली असती, पण आफ्रिकन लोकांचे भवितव्य आता त्यांच्या हातात राहिले नव्हते ! जिब्राल्टरच्या सामुद्रधुनी पलीकडे ज्या घटना होत होत्या, त्याचे दूरगामी परिणाम आफ्रिकेवर होणार होते.

□

प्रकरण चौथे

## पोर्तुगीजांचे सागरी शोध आणि वसाहतीचा प्रारंभ

पोर्तुगालचा राजपुत्र हेन्‍री ' नाविक हेन्‍री ' म्हणूनच प्रसिध्द होता. इ. स. १४१५ मध्ये त्याने ' सेटा (Ceuta)' स्वारीत भाग घेतला तेव्हा तो एकवीस वर्षांचा होता. ' सेटा ' हे जिब्राल्टरच्या जवळच्या आफ्रिकन मुख्य भूमिवरील किल्लेकोट असलेले बंदर होते. ते पोर्तुगीजांच्या ताब्यात आले. त्या वेळेपासूनच पोर्तुगीजांचा आफ्रिकेमध्ये प्रवेश झाला. अनेक शतके जिब्राल्टरची सामुद्रधुनी आणि स्पेन व पोर्तुगालचा दक्षिण भाग यावर अरबांचे अधिराज्य होते. आता जवळजवळ हजार वर्षांनंतर युरोपियनांचे पाऊल आफ्रिकन भूमीवर पडत होते. राजपुत्र हेन्‍री पोर्तुगालच्या राजाचा चवथा मुलगा होता. सेटा येथील विजयानंतर तो पोर्तुगालला परतला आणि त्याने साग्रेस येथे नाविक शिक्षणाची शाळा काढली. या शाळेत खलाशांना व नाविकांना शास्त्रशुद्ध शिक्षण मिळे आणि महासागरावरील लांबचे प्रवास आखले जात. हेन्‍रीला सहारा वाळवंटापलीकडून सोने कोठून येते त्याचा शोध लावायचा होता आणि जमल्यास हा सर्व व्यापार अरबांकडून हस्तगत करायचा होता. या मूर लोकांना (पोर्तुगीज अरबांना मूर म्हणत असत.) त्याला या भागातून हाकलून काढावयाचे होते. मूर लोक त्याचे धार्मिक शत्रू होते.

आफ्रिकन किनाऱ्याने सागरी प्रवास करण्याचे प्रयत्न पूर्वी झाले होते. हेन्रीपूर्वी शंभर वर्षे उगोलिनो व गोडीओ या नाविकांनी असा प्रयत्न केला होता व या प्रयत्नांत ते नष्ट झाले होते. राजपुत्र हेन्री सावधपणे व संथपणे काम करत होता. सुरुवातीचे त्याचे प्रवास थोड्याशा अंतरासाठी असत. ते प्रवास मोरोक्कोच्या किनाऱ्याने केले जात. तेथील किनारपट्टीची नाविकांना ओळख असे ! प्रत्येक प्रवासानंतर ताणलेल्या मेंढीच्या कातड्यावर प्रवासाचे नकाशे मेहनत घेऊन व काळजीपूर्वक काढत असत. तशा या मोहिमा फायदेशीर नव्हत्या. कधीमधी मूर लोकांची जहाजे पकडता येत व लुटता येत इतकेच काय ते. पण अनेकदा अन्न मिळविण्यासाठी नाविकांना मासेमारी करावी लागे.

दक्षिणेकडे प्रवास करायला पोर्तुगीज खलाशी नाखूष होते. फार दक्षिणेकडे गेल्यास सूर्याच्या उष्णतेमुळे समुद्र उकळेल असे त्यांना वाटे किंवा पृथ्वीच्या उलट्या बाजूला गेल्यामुळे आपल्या जहाजांना कधींच परत फिरता येणार नाही असे त्यांना वाटत असे. म्हणून सुरुवातीला अटलांटिक महासागरातील मदिरा बेटे (१४२० मध्ये शोध) व अझोर्स बेटे (सन १४२७ मध्ये शोध) ही सुरुवातीची फार मोठी धाडसे ठरली. सन १४३४ मध्ये गील एन्स या नाविकाने आपली जहाजे कॅनरी बेटाच्या विरुद्ध बाजूला असलेले ‘ केप बजदोर ’पर्यंत नेली. पुढची दहाबारा वर्षं पोर्तुगीज नाविक कॅनरी बेटाच्या आसपासच घोटाळत राहिले. तेथून ते आफ्रिकेच्या किनाऱ्यापर्यंत जात आणि येताना गुलाम पकडून आणत. सन १४४५ मध्ये कॅप्टन ‘ दिनाज दियाझ ’ या नावाचा एक नाविक केप वर्दूपर्यंत पोचला. त्याच वेळी पोर्तुगीज नाविकांनी प्रथमच विषुववृत्तीय प्रदेशातील जंगले पाहिली.

आजच्या जहाजांच्या मानाने पोर्तुगीजांची त्या वेळची जहाजे खेळण्यातील वाटतील. ती शंभरफूट (३० मीटर) लांब आणि वीस फूट (६ मीटर) रुंद असत. जहाजावर काही डझन खलाशी असत. हजार वर्षांपूर्वीची रोमन जहाजेही यापेक्षा मोठी असत. त्या रोमन जहाजातून चारशे चारशे खलाशीही असत. पोर्तुगीज जहाजे लहान असली तरी बळकट बांधणीची होती आणि त्यातून दूरवरचा प्रवास करणे शक्य होते. यामध्ये अन्न साठवायची व्यवस्था होती. व खवळलेल्या सागरावर ती टिकू शकत. पण खलाशांना फार लहान जागेत दाटीदाटीने राहावे लागे व त्यांचे जीवन कंटाळवाणे असे. लांबच्या प्रवासामध्ये पुष्कळसे खलाशी मृत्यू पावत. पंधराव्या शतकात तीन किंवा जास्त शिडे वापरण्यात येऊ लागली व शिडांचा आकारही मोठा झाला. वल्हयांमध्येही बरीच सुधारणा झाली त्या काळी ऑस्ट्रोलोबच्या शोधामुळे व खगोलशास्त्रातील प्रगतीमुळे नौकानयनाला खरे वरदान मिळाले. ऑस्ट्रोलोब या उपकरणामुळे ताऱ्यांचे वेध अचूक घेता येऊ लागले. आणि त्याच्या साहाय्याने जहाज विषुववृत्ताच्या दक्षिणेकडे किंवा उत्तरेकडे किती अंशावर आहे हे नक्की समजू लागले. परंतु रेखांशाबद्दल मात्र त्या वेळी नीट अंदाज करता येत नसे. अंक्षाश समजण्यासाठी सुद्धा तारे किंवा सूर्य यांचा वेध घेणे आवश्यक असल्यामुळे आकाशात मेघ दाटून आल्यानंतर खलाशांच्या तोंडाचे पाणी पळे व जहाजावर चिंतेचे वातावरण पसरे ! आकाशात ढग असले की ताऱ्यांचे वेध घेता येत नसत. आणि होकायंत्रावरच विसंबावे लागे. होकायंत्रसुद्धा चिनी लोकांनी कित्येक शतकांपूर्वी शोधले होते. आणि विविध शोधांच्या युगात दिशा साधनांचे तेच एकमेव भरवशाचे यंत्र होते.

चौदाव्या शतकात छपाईचा शोध लागला नव्हता. त्यामुळे किनारपट्टीची ठिकाणे व बंदरे यांचा तपशील दाखविणारे नकाशे कातडीवर कोरलेले असत. या नकाशाबद्दल खूप गुप्तता पाळण्यात येई आणि ते नेहमी पहाऱ्यात ठेवत. पण नंतरच्या थोड्याच काळात छपाईचा शोध लागला आणि बंदराचे व किनारपट्टीचे नकाशे सहज मिळू लागले.

आफ्रिकेचे संशोधन करण्यामध्ये पोर्तुगीजांच्यापुढे असंख्य अडचणी उभ्या होत्या. पण युरोपमधील एक नवीन शोध आफ्रिकेच्या संशोधनात व आफ्रिकन लोकांशी वागताना त्यांना खूपच उपयोगी पडणार होता. तो शोध म्हणजे बंदूक व दारुगोळा!

१४४५ पर्यंत पोर्तुगीजांचे सागरीप्रवास फारच हळूहळू चालू होते. पण १४४५ मध्ये 'दिनाज दियाझ' केप वर्दूपर्यंत जाऊन सुखरूप परत आला. तेव्हापासून या संशोधनाला वेग आला. केप वर्दू हे ठिकाण युरोपापासून पश्चिमेकडे जाण्याचे शेवटचे टोक बनले. त्याच्या पलीकडे धाडस करून ज्या नाविकांनी जहाजे हाकारली ते आफ्रिकेच्या किनाऱ्यापर्यंत पोचू शकले. 'आल्वारो फर्नांडिस' हा नाविक सध्याच्या सिआरा लिऑनच्या किनाऱ्यापर्यंत पोचला होता. त्याचा काका मदिरा बेटावरील पोर्तुगीजांच्या तळावरील मुख्य आधिकारी होता. फर्नान्डिसला आज्ञा दिल्या होत्या की जितके दूरवर जाता येईल तितके जावे व येताना नव्या नवलाईच्या वस्तू व लूट जमवून आणावी. प्रिन्स हेन्रीने संशोधकांना सांगितले होते की त्यांनी आफ्रिकन लोकांशी मित्रत्वाने वागावे आणि गुलाम पकडून आणू नयेत. फर्नांडिस आफ्रिकेच्या किनाऱ्यापर्यंत पोचला, पण बाणांच्या लढाईत त्याला जखम झाली. तेव्हा त्याला परत यावे लागले. त्याच्या या धाडसाबद्दल त्याला दोनशे सुवर्णमुद्रांचे बक्षीस देण्यात आले.

सन १४७२ पर्यंत पोर्तुगीज नाविक बेनीनच्या खाडीपर्यंत आणि 'फर्नांडो पो' बेटापर्यंत पोचले होते. याच सुमारास प्रिन्स हेन्री मृत्यू पावला. तेव्हा पोर्तुगीज राजाने पश्चिम आफ्रिकेचा किनारा फर्नांडो गोम्सला मक्त्याने दिला. तो राजाला दरवर्षी खंडणी देई व संशोधन पुढे चालवी. बायफ्राच्या उपसागराच्या दक्षिणेकडे सन १४७५ मध्ये नाविकांनी प्रथमच विषुववृत्त ओलांडले. सध्या घाना आणि नायजेरिया जेथे आहेत त्या प्रदेशातील श्रीमंत टोळीप्रमुखांशी व्यापार चालू झाला. युरोपातील माल देऊन त्याच्या बदली पोर्तुगीज व्यापारी हस्तिदंत व मिरी घेऊ लागले. या किनाऱ्यावरील एका बंदराला दक्षिण पोर्तुगालमधील लागोस या गावाचे नाव देण्यात आले. या गावातून बरेसचे नाविक येत असत. सध्याच्या घाना देशाच्या किनाऱ्यावर 'अल्-मिना' येथे १४८२ मध्ये किल्ला बांधण्यात आला. सरंक्षणासाठी आफ्रिकेच्या किनाऱ्याला धरून जे किल्ले पुढे बांधण्यात आले, त्यातील हा पहिला किल्ला होता. बाकीच्या युरोपियन सत्तांनी आफ्रिकेच्या आपल्या वर्चस्वात ढवळाढवळ करू नये म्हणून हे किल्ले बांधले होते.

सन १४८२ मध्येच दियागो काम हा नाविक दक्षिणेच्या सागरी मोहिमेवर निघाला तो सध्याच्या झैरे ( कांगो ) प्रदेशापर्यंत पोचला व तेथे त्याने आपल्या शोधाप्रित्यर्थ दगडाचा स्तंभ बांधून ठेवला. नंतर तो आणखी दक्षिणेकडे केप सांता मारियापर्यंत गेला. हे ठिकाण १३° दक्षिण अक्षांशावर आहे. आपल्या दुसऱ्या सफरीत दियागो काम आणखी दक्षिणेकडे २२° दक्षिण अंक्षाशावर पोहचला. तेथून तो पोर्तुगालकडे परत वळला. पण पोर्तुगालला पोहचण्यापूर्वीच तो मृत्यू पावला. आफ्रिकेच्या

शोधाच्या इतिहासात दियागो कामच्या या दोन मोहिमांना फार महत्त्व आहे. सागराच्या अज्ञात भागात तो २४०० किलोमीटर घुसला होता व आफ्रिकेचे दक्षिण टोक तेथून केवळ १६०० किलोमीटर राहिले होते. पुढील सागरी मोहीमांचा शुभारंभ दियागो कामनेच केला असे म्हणता येईल.

प्रिन्स हेन्रीच्या मृत्यूनंतर सागरी मोहिमांना उत्तेजन देण्याचे काम व जबाबदारी पोर्तुगालच्या राजाने स्वीकारली. दुसऱ्या जॉनच्या कारकिर्दीत १४८१ पासून १८९५ पर्यंत या मोहिमांना बहर आला. या काळातच युरोपात पुनरुज्जीवनाचे वारे खेळत होते. आणि विज्ञानात व शास्त्रात प्रगती होत होती. दुसऱ्या जॉनने आपल्याभोवती गणितशास्त्रज्ञ व खगोलशास्त्रज्ञ जमवले होते. त्यांच्या अभ्यासामुळे व संशोधनामुळे नौकानयनाच्या पद्धती सुधारल्या व भौगोलिक ज्ञानात भर पडली. त्यामुळे लांब लांबच्या सागरी मोहिमा शक्य होऊ लागल्या.

दुसऱ्या जॉनच्या कारकिर्दीत बार्थालोम्यू डियाझ हा धाडसी नाविक बराच प्रसिद्धीला आला. १८८७ मध्ये तो तीन जहाजे घेऊन लिस्बनहून निघाला. पूर्वीच्या पोर्तुगीज नाविकांचा मार्ग धरून तो कांगो नदीच्या मुखापर्यंत पोचला. दियागो कामने उभारलेला स्मृति-स्तंभ त्याने पाहिला आणि तो आणखी दक्षिणेकडे निघाला. जाता जाता तो दक्षिण-पश्चिम आफ्रिकेच्या म्हणजे नांबियाच्या किनाऱ्यापर्यंत पोचला. तेथे समुद्रामध्ये एक प्रचंड वादळ झाले आणि त्याचे जहाज भरकटत केप ऑफ गुड होपच्या दक्षिणेला गेले. पोर्तुगीज नाविक आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्याकिनाऱ्यानेच त्या काळी प्रवास करीत असत. त्यामुळे पूर्वेकडे गेले की त्यांना आफ्रिकेचा किनारा दिसू लागे. या अनुभवाच्या

आधाराने वादळ शांत झाल्यानंतर बार्थोलोम्यू पूर्वेकडे जाऊ लागला, पण तो आफ्रिकेच्या दक्षिण टोकाच्याही पलीकडे वादळात भरकटला असल्यामुळे पूर्वेकडे थोडा प्रवास करूनही त्याला जमीन सापडली नाही तेव्हा तो आश्चर्यचकित झाला. त्या वेळी त्याने विचार करून तेथून उत्तरेचा रस्ता धरला. तेव्हा तो मोसेलच्या उपसागरावर पोचला व त्याला जमीन दिसली. पण तो आता आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर लागला होता. मानवी इतिहासामध्ये आफ्रिकेच्या दक्षिण टोकाला वळसा घालून पूर्वेकडे गेलेला बार्थलोम्यू दियाझ हा पहिला नाविक आहे. तत्कालीन परिस्थिती पाहता त्याचा हा पराक्रम अतुलनीय होता.

दियाझचा विचार मोसेल उपसागराच्या पलीकडे जाण्याचा होता. त्याचे खलाशी घाबरले. या अज्ञात प्रदेशात शिरायची त्यांची तयारी नव्हती. त्यांनी बंड करावयाचे ठरवले. त्यामुळे दियाझचा नाइलाज झाला. पोर्तुगालला परतल्यानंतर दियाझचे वीरोचित स्वागत झाले. आणि त्याला आणखी मोठ्या मोहिमेची तयारी करावयाला राजाने सांगितले. आफ्रिकेच्या या दक्षिण टोकाला दियाझने 'वादळाचे भूशीर' असे नाव दिले होते. पण राजाने ते बदलून 'नव्या आशांचे भूशीर ( केप ऑफ गूड होप ) असे ठेवले.

बारा वर्षांनंतर बार्थलोम्यू दियाझने दक्षिण आफ्रिकेच्या टोकाकडे दुसरी मोहीम काढली. पण या वेळी त्याचे जहाज वादळात सापडले नि बुडाले. जहाजाबरोबर दियाझही समुद्राच्या तळाशी गेला ! त्या दक्षिण टोकाला दियाझने वादळाचे भूशीर असे जे नाव ठेवले होते तेच सार्थ ठरले.

सुरुवातीच्या या सागरी मोहीमांबद्दल सर्वजण एक गोष्ट नेहमी

विसरतात. प्रत्येक यशस्वी शोधामागे अनेक अपयशी साहसे आणि मृत्यू यांची मालिका असे. दियाझच्या मृत्यूमुळे अशा अपघातांची व अयशस्वी सफरींची नोंद झाली इतकेच. दियाझसारख्या अनेक साहसी वीरांनी त्या काळी सागरी मोहिमा काढल्या होत्या. आणि त्यापैकी कित्येकांची नावनिशाणीही उरलेली नाही ! त्या काळी कदाचित त्यांच्यासाठी हळहळ व्यक्त झाली असेल, पण आज त्यांची कोणाला आठवण नाही. त्यांच्या मृत्यूभूमीवर 'नाही चिरा नाही पणती' अशी स्थिती आहे. पण त्यांच्या साहसामुळे आणि बलिदानामुळे पुढचे शोध शक्य झाले. हे लक्षात ठेवले पाहिजे.

पोर्तुगीजांनी एकदा आफ्रिकेच्या अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर आपले वर्चस्व स्थापन केल्यानंतर त्यांनी आपले दोन हेतू साध्य करण्यास आरंभ केला. व्यापार आणि धर्मप्रसार ही दोन्ही उद्दिष्टे पोर्तुगीजांना एकाच वेळी साधावयाची होती. पोर्तुगीजांनी आफ्रिकेतील बेनी आणि कांगो येथील राजांना पोर्तुगालला वकील पाठविण्याविषयी विनंती केली. ते वकील आले तेव्हा त्यांचे थाटात स्वागत करण्यात आले. पोर्तुगीजांनी त्यांना भेटी दिल्या व शाही जहाजांतून परत पाठवले.

कांगोमधील राजांशी पोर्तुगीजांचे घनिष्ठ संबंध आले. कांगोतील लोकांनी पूर्वी कधीच गोरा मनुष्य पाहिला नव्हता. त्यांनी पोर्तुगीजांचे चांगले स्वागत केले. त्यांचा राजा निझांगा याने ख्रिश्चन धर्म स्वीकारला. सवयीने त्याला पोर्तुगीजही बोलता येऊ लागले. पोर्तुगीज राजाने या कांगोतील राजाची स्तुती केली आहे.

त्याने लिहिले आहे की, ‘ कांगोतील हे राजे सद्‌गुणी असून आमचे मित्र आहेत. ’

कांगोच्या निझांगा राजाने ‘ डॉम अल्फान्सो ’ हे खिश्चन नाव घेतले. कांगोमध्ये शाळा व चर्च बांधण्यात आल्या. तेथील तरुण हुषार मुले निवडून त्यांना शिक्षणासाठी लिस्बन विश्वविद्यालयात पाठविण्यात आले. डॉम अल्फान्सोने स्वतः पोर्तुगीज कायद्याचे पाच खंड वाचून काढले व त्यानुसार आपल्या राज्याची कायदेपद्धती बसवली.

पोर्तुगालचे एका दुताने आपल्या इमॉन्युअल राजाला कांगोहून पत्र लिहले की, ‘ येथील अल्फान्सो राजेसाहेब उत्तम पोर्तुगीज बोलतात. त्यांच्या देहातून देवदूतच बोलत आहे असे वाटते ! ते नेहमी पुस्तके वाचत असतात, आणि अनेकदा पुस्तके वाचता वाचता झोपी जातात. ’

डॉम अल्फान्सोने कांगोमध्ये १५०६ ते १५५४ पर्यंत राज्य केले. पाश्चिमात्य ज्ञानप्रसाराने आफ्रिकेमध्ये संस्कृतीची पहाट उगवेल असे त्याला वाटत होते. पण त्याच्या हयातीतच त्याचे हे स्वप्न विरून गेले. मिशनरी व धर्मोपदेशक यांच्या मागोमाग गुलाम पकडणारे लोक आले आणि त्यांनी त्याच्या निरागस राज्यात बेबंदशाही माजवली. ते टोळ्या टोळ्यांचे झगडे लावून देत व गुलाम पकडत. गुलाम पकडण्याच्या कामात मिशनरीही सामील होत असत ! त्या सर्वांनी देश वैराण करून टाकला. अल्फान्सोने उद्वेगाने लिस्बनच्या राजाला लिहिले, ‘ तुम्ही गोऱ्या लोकांनी आम्हाला सुसंस्कृत करावयाचे व आपल्या वागणुकीचा आदर्श घालून द्यायचा हे बाजूलाच राहिले. तुम्ही खिश्चन लोक

आमच्या प्रदेशात सैतानासारखे वागतात. अशा परिस्थितीत आमचा ख्रिश्चन धर्मावर कसा विश्वास बसावा ?'

अल्फान्सोच्या या पत्राला पोर्तुगीज राजाने उत्तर दिले नाही. धर्मप्रसारापेक्षा गुलाम पकडणे जास्त महत्त्वाचे वाटले असावे ! पुढच्या शंभर वर्षांत कांगोमधील स्थिर व शांततावादी राज्य नष्ट झाले. आणि तेथे गुलाम पकडणाऱ्यांच्या क्रूर कृत्यामुळे बेबंदशाही आणि बजबजपुरी माजली.

पंधराव्या शतकात आफ्रिका खंड म्हणजे पूर्वेकडच्या मार्गामध्ये असलेला नैसर्गिक अडथळा आहे असे पोर्तुगीजांना वाटत असे. पूर्वेचा मार्ग शोधता शोधता किनारपट्टीने जेवढे संशोधन करणे आवश्यक होते तेवढेच त्यांनी केले. आफ्रिकेतील अरण्यापेक्षा हिंदुस्थानच्या समृद्धीचा व संपत्तीचा मोह त्यांना जास्त पडला होता.

पूर्वेकडचा जलमार्ग शोधण्याचे श्रेय वास्को-द-गामाला दिले पाहिजे. त्याचा जन्म १४६० साली झाला. त्याच वर्षी नाविक संशोधनात रस घेणारा राजपुत्र हेन्री मरण पावला होता. हिंदुस्थानचा जलमार्ग शोधण्याचे त्याचे स्वप्न अपुरेच राहिले होते. वास्को-द-गामाने ते पूर्ण केले. त्याच्या आधिपत्याखाली चार जहाजे व एकशे साठ खलाशी देण्यात आले. त्याच्या जहाजाचे नाव 'सेंट ग्राब्रिअेल' होते. केप वर्दूपर्यंत बार्थालोम्यू दियाझ मार्गदर्शक होता. केप वर्दू बेटापासून वास्को-द-गामाने आफ्रिकेच्या किनाऱ्याला धरून जाण्याची पूर्वीची पद्धत सोडून दिली वर्दू बेटा-


वास्को-द-गामा

पासून तो सरळ अटलांटिकमध्ये घुसला. विषुववृत्त लागल्यानंतर त्याने दक्षिणेचा रस्ता पकडला. तो मकरवृत्ताजवळ पोचला, तेव्हा आफ्रिकन भूमीपासून तीनहजार किलोमीटर लांब होता. तेथून तो पश्चिम वाऱ्याच्या प्रवाहात सापडला आणि केपजवळील सेंट हेलेना बेटाजवळ पोहचला. त्याचे या प्रवासातील धाडस पाच वर्षांपूर्वीच्या कोलंबसाच्या धाडसापेक्षा कोणत्याही दृष्टीने कमी नव्हते.

वास्को-द-गामाचे खलाशी स्कर्व्ही रोगाला बळी पडू लागले. पण वास्को-द-गामाने प्रवास पुढे चालूच ठेवला. नाताळ सणाच्या पहिल्या दिवशी त्यांना दक्षिण आफ्रिकेच्या किनारपट्टीचे दर्शन झाले. त्या प्रदेशाचे नाव त्याने 'नाताळ' असे ठेवले. ते आजही चालूच आहे.


आता वास्को-द-गामा आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्याने उत्तरेकडे येऊ लागला. मालिंदीच्या किनाऱ्याजवळ त्याला 'अहमद इब्न मजीद' हा वाटाड्या मिळाला त्यानेच वास्को-द-गामाला अरबी समुद्रातून हिंदुस्थानला पोचवले. तो मलबारच्या किनाऱ्यावरील कालिकत येथे पोचला. पहिल्यांदा त्याला थोडा विरोध झाला. पण नंतर त्याने मसाल्याचे पदार्थ व रत्ने हस्तगत केली. सफरीला सुरुवात केल्यापासून दोन वर्षांनी म्हणजे ऑगस्ट १४९९ मध्ये वास्को-द-गामा लिस्बनला परतला तेव्हा त्याने ३८ हजार किलो-मीटरचा सागरी प्रवास केला होता. १६० खलाशांपैकी ६० खलाशी शिल्लक राहिले होते. व चार जहाजांपैकी दोनच जहाजे राहिली होती. पण त्याच्या या नवीन जलमार्गामुळे हिंदुस्थान व अतिपूर्व यांच्या इतिहासालाच कलाटणी मिळणार होती !

हिंदुस्थानकडे जाण्याचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न पोर्तुगीज

जवळ जवळ शंभर वर्षं करत होते. वास्को-द-गामाने हा जलमार्ग शोधल्यानंतर पोर्तुगीजांना साहजिकच असे वाटले की, या सर्व प्रदेशाशी व्यापार करण्याचा केवळ आपल्यालाच एकाधिकार आहे. परंतु पोर्तुगीजांचे सामर्थ्य मर्यादित होते. व युरोपातील इतर प्रतिस्पर्धी सत्ता जास्त बलिष्ठ होत्या. त्यांच्यापुढे पोर्तुगीजांचा फार काळ टिकाव लागला नाही.

केप ऑफ गुड होपला वळसा घातल्यानंतर वास्को-द-गामाच्या जथ्याने एका ठिकाणी नांगर टाकले आणि ते किनाऱ्यावर गेले. तेथे त्यांना हॉटेंटॉट जमातीच्या टोळीचे लोक भेटले. ते किनाऱ्यावर खेळत होते व नृत्य करीत होते. त्यांच्यातील वृद्ध लोक खुणांच्या साह्याने पोर्तुगीजांशी बोलत होते. पण त्याच वेळी तरुण माणसे जवळच्या झुडूपांत शस्त्रे घेऊन दबा धरून बसली होती. वास्को-द-गामाने त्यांना काचेचे मणी वगैरे भेटी देऊन खूष करून टाकले. पण झाम्बेझी नदीच्या मुखाजवळ त्यांना निराळाच अनुभव आला. पोतुगीजांनी दिलेल्या भेटीची त्यांना काहीच किंमत वाटली नाही. त्यांच्या अवखळपणामुळे वास्को-द गामाला तेथून लवकरच निसटावे लागले.

पोर्तुगीजांनी जेव्हा मोंबासा येथे नांगर टाकला तेव्हा त्यांना प्रखर प्रतिकाराला तोंड द्यावे लागले. आणि यात आश्चर्य नव्हते. कारण मोझांबिक येथे त्यांनी केलेल्या दुष्टपणाची कीर्ती मोंबासाला त्यांच्या आधीच येऊन पोहचली होती. मोझांबिकला वास्को-द-गामाने काही स्थानिक लोकांना पकडून कैद केले होते. किनाऱ्याने उत्तरेला जाण्याचा मार्ग त्या कैद्यांच्याकडून त्यांना समजावून घ्यायचा होता. त्यांच्याकडून हवी असलेली माहिती मिळत नाही,




**वास्को-द-गामाचा हिंदुस्थानकडे येण्याचा प्रदीर्घ मार्ग**

असे समजले की वास्को-द-गामा व त्याचे खलाशी या कैद्यांच्या उघड्या कातडीवर जळते तेल ओतत असत. मोंबासा बंदरात तेथील सुलतानाने त्यांना मांस व फळे यांच्या भेटी दिल्या, पण रात्रीच्या वेळी सशस्त्र टोळ्या होडीतून येऊन पोर्तुगीजांवर छापा घालण्याचा प्रयत्न करत. त्यामुळे त्याला त्यांच्याशी चकमक करून संरक्षण करावे लागे. उत्तरेकडच्या मालिंदी बंदरात वास्को -द-गामाचे नशीब उघडले. त्याने काही लोकांना पकडून ओलीस ठेवले आणि त्यांच्या बदल्यात हिंदुस्थानला जाण्याचा मार्ग दाखवणारा वाटाड्या मिळविला.

वास्को- द- गामाची मोहीम यशस्वी झाल्यानंतर या मार्गावर पोर्तुगालने लागोपाठ अनेक सागरी मोहिमा काढल्या. हिंदुस्थानच्या सागरी मार्गावरील सहा शहरांवर पोर्तुगीजांनी सन १५००

ते १५१० पर्यंत हल्ले चढविले व विजय मिळविला. त्या शहरांचे रक्षण करणाऱ्या आफ्रिकन व अरब यांचेकडे तलवारी व धनुष्य-बाण हीच काय ती आयुधे होती. तर पोर्तुगीजांच्याकडे तोफा व बंदुका होत्या. तेव्हा पोर्तुगीजांचा विजय होणार यात शंकाच नव्हती. झांजीबार येथे पोर्तुगीज कॅप्टन राव्हास्को याने सुलतानाची अनेक जहाजे पकडली, तेव्हा सुलतानाने सूड घेण्यासाठी त्याच्यावर चार हजार सैन्य पाठवले. पण कॅप्टनने काही डझन खलाशी, तोफा व बंदुका यांच्या जोरावर या चार हजार सैन्याचा पराभव केला. जो सुलतान खंडणी देईल त्याला पोर्तुगीजांनी राज्यावर राहू दिले. पण बाकीची सर्व शहरे हस्तगत केली. पोर्तुगीजांचे हे सागरी मार्गावरील अधिराज्य फार काळ टिकले नाही. काही वर्षातच सर्व काही स्मृतीशेष झाले !

पंधराव्या शतकाच्या शेवटी सागरी मोहिमांमुळे पृथ्वीवरील सर्व खंडे ज्ञात झाली. पण या नवीन भूखंडावर कोणाचे अधिराज्य असावे हा वादाचा विषय होता. त्याबाबत सहावा अलेक्झांडर या पोपने फार सोपा उपाय शोधून काढला. युरोपच्या बाहेरच्या जगाची वाटणी त्याने नकाशावर एक रेघ ओढून करून टाकली ! त्या रेघेच्या पश्चिमेकडील भाग पोपने स्पेनच्या ताब्यात दिला आणि पूर्वेकडील भाग पोर्तुगीजांच्या ताब्यात दिला. पोपचा हा निवाडा १४९४ चा टोर्डेसिलासचा तह म्हणून प्रसिद्ध आहे.

नकाशावर रेघा मारणे निराळे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे निराळे ! पोपने पोर्तुगालला पूर्वेकडच्या सर्व मुलखाचे म्हणजे हिंदुस्थान, इंडोनेशिया, ब्रह्मदेश वगैरे सर्व देशांचे साम्राज्य-पद बहाल केले होते. पण या १८ हजार किलोमीटरच्या सागरी

मार्गावर केवळ व्यापारी दळणवळण चालू ठेवणे पोर्तुगीजांच्या आवाक्याबाहेरचे होते. कारण पोर्तुगाल हे त्या मानाने फारच चिमुकले राष्ट्र होते.

तरी पोर्तुगालने थोडी फार धडपड केलीच. डी अलिमडा आणि अल्बुकर्क या दोघा राजप्रतिनिधींनी केप ऑफ गुड होपच्या उत्तर-पूर्वेला पोर्तुगीज अंमल बसवण्यात यश मिळविले. सन १५०७ मध्ये मोझांबिक बेटावर काही पोर्तुगीज वसाहतवाले उतरले. हा प्रदेश सध्याच्या टांझानिया राष्ट्राच्या दक्षिण सरहद्दी जवळ आहे. विषुववृत्ताच्या दक्षिणेकडे आफ्रिकेत वस्ती करणारे हे पहिले युरोपियन लोक होते.

पोपने पोर्तुगीजांना पूर्वेकडील अर्धे जग बहाल केले होते तरी आफ्रिकेमध्ये पोर्तुगीजांची फार निराशा झाली. त्यांना हवे होते त्याप्रमाणे हस्तिदंत व सोने मिळाले नाही. पण याबद्दल तत्कालीन पोर्तुगीज अंमलदाराना दोषी धरले पाहिजे. हे ठाणेदार फक्त स्वतःचाच वैयक्तिक स्वार्थ पाहत असत. या पोर्तुगीज ठाणेदारांनी ठरवले की, अरबी मध्यस्थ दूर करून सरळ आफ्रिकनांशीच व्यवहार करावयचा. हे साध्य करताना त्यांनी इतका क्रूरपणा दाखवला की आफ्रिकनांच्या मनात त्यांच्याबद्दल दहशतच बसली. आफ्रिकन अंतर्भागाशी त्यांचा संबंध राहिला नाही. त्यांचे किनाऱ्यावरचे किल्ले म्हणजे अलग पडलेली बेटे बनली. फक्त सोफालाच्या दक्षिणेला त्यांनी अंतर्भागात थोडे संशोधन केले व तिथला प्रदेश ताब्यात घेतला.

दक्षिण आफ्रिकेच्या अंतर्भागात घुसलेला पहिला युरोपियन आन्टोनियो फर्नांडिस हा पोर्तुगीज अधिकारी होता. सोफाला बंदरात आफ्रिकेच्या अंतभागातून सोने येत असे. हे सोने येते तरी

कोठून हे शोधून काढायला पोर्तुगीज सरकारने आन्टोनियो फर्नांडिसला पाठवले होते. फर्नांडिस १५१४ मध्ये सोफालाहून झिम्बाब्वेच्या दिशेने निघाला. सोफालावर नुकताच अरबांनी प्रचंड छापा घातला होता. अशी मोहीम काढणे हे त्या वेळी धाडसाचेच कृत्य होते. अंतर्भागात मोनोमोटोपाचे साम्राज्य पसरले होते. जुन्या ग्रीक पुराणात वर्णिलेली सालोमन राजाची सुवर्णभूमी हीच असावी अशी अफवा होती.

फर्नांडिस एका पर्वतराजीला धरून आत शिरला आणि परतण्यापूर्वी साबी खोऱ्यात शिरला. त्याने या भागात दुसऱ्यांदा संशोधन मोहीम काढली. या पठारावरील हवामान उत्कृष्ट असून युरोपियनांना ते आवडण्यासारखे आहे असा त्याने अहवाल दिला. या प्रदेशात किल्ले बांधावे व सैन्य ठेऊन तेथील व्यापार नियंत्रणाखाली आणावा, असे मत त्याने व्यक्त केले. त्या काळी या भागात हजारो अरब राहात होते व त्यांच्या हातातच सर्व व्यापार होता.

पोर्तुगालने त्याचा अहवाल फारसा मनावर घेतला नाही. अर्धशतक असेच निघून गेले. तरीही या काळात पोर्तुगीज ज्याला मोनोमोटोपो म्हणत त्या प्रदेशाच्या राजधानीत आन्टोनियो कोयीडो हा व्यापारी राहात होता. मोनोमोटापाची राजधानी आधुनिक सॅलसबरी शहरापासून जवळच होती. सन १५६० मध्ये गोव्यातील जेसुईट धर्मोपदेशक डॉन गोन्कालो द सिल्व्हेरा याने या भागात ख्रिस्ती धर्मप्रसारासाठी मोहीम काढली. तेथील टोळीप्रमुखाने त्याचे चांगले स्वागत केले. पण त्याने टोळीप्रमुखाकडून गुलाम, गुरे आणि सोने यांच्या भेटी स्वीकारायचे नाकारले म्हणून टोळीप्रमुखाचा अपमान झाला ! अरबांनी अफवा पसरवली

की, डी सिल्व्हेरा चेटूक करणारा आहे. स्थानिक आदिवासी आफ्रिकन घाबरले त्यांनी डी सिल्व्हेराला व त्याच्या धर्मांतर झालेल्या पन्नास आफ्रिकनांना घेरले व त्या सर्वांची कत्तल करून टाकली ! डी सिल्व्हेरानंतरही काही ख्रिस्ती धर्मोपदेशक या भागात गेले, पण त्यांना मुठभर सुद्धा ख्रिस्ती अनुयायी मिळाले नाहीत.

सन १५६९ मध्ये पोर्तुगालच्या राजाने फ्रान्सिस्को बरेटोच्या नेतृत्वाखाली मोठे सैन्य देऊन दक्षिण आफ्रिका जिंकण्यासाठी मोहीम काढली. बरेटोची तुकडी जेव्हा मोनोमोटापा प्रदेशात पोचली तेव्हा तेथील टोळीवाल्यांत युद्ध चालू होते. बरेटोने मोनामोटापाची बाजू घ्यायची ठरवले. अनेक चकमकींत भाग घेतल्यानंतर शिल्लक राहिलेले सैन्य घेऊन बरेटो किनाऱ्याकडे परतला व लौकरच मृत्यू पावला. दोन वर्षांनी आणखी एक सैन्याची तुकडी पाठविण्यात आली. त्या तुकडीने अंतर्भागातील प्रदेशात खोलवर मुंसडी मारली, पण त्यांच्या हाती काहीच लागले नाही.

पोर्तुगीजांचा अरबी समुद्रात प्रवेश होण्यापूर्वी तेथील पूर्वेकडचा व्यापार ऑटोमन तुर्क आणि अरबांच्या हातात होता. साहजिकच पोर्तुगीज त्यांना शत्रू वाटत होते व त्यांच्याशी अरबांचे नित्य झगडे उडू लागले. इजिप्तच्या सुलतानाला पूर्वेकडच्या व्यापारापासून तीन लाख पौंडांचे उत्पन्न दरवर्षी मिळत असे. पोर्तुगीजांनी हिंदुस्थानशी सागरी मार्गाने व्यापार सुरू केल्यामुळे खुष्कीच्या मार्गाने व्यापार करणाऱ्या अलेक्झांड्रिया बंदरात राहणाऱ्या व्हेनिसच्या व्यापाऱ्यांचे नुकसान होऊ लागले. त्यांनी पोर्तुगीजांना निपटून काढण्यासाठी तुर्कांना व अरबांना

चिथावणी दिली. पण गुजरातच्या किनाऱ्यावर दीव येथे तुर्कांच्या मोठ्या आरमाराचा पोर्तुगीजांनी पराभव केला व ते बुडवून टाकले. तांबड्या समुद्राच्या पश्चिमेकडे इथोपियामधील लोक प्राचीनकाळापासून ख्रिस्ती झालेले होते. तुर्कांविरुद्धच्या झगड्यात त्यांच्याशी मैत्री करावयाचे पोर्तुगीजांनी ठरवले. आता समुद्रावर पोर्तुगीजांची सत्ता प्रस्थापित झाली होती. सन १५२० मध्ये पोर्तुगीज तांबड्या समुद्रातील मसावा बंदराजवळ पोचले. व तेथून त्यांनी इथोपियामध्ये जेसुईट मिशनरी पाठवले. पण सन १५२७ मध्ये तुर्कांनी इथेपियावर हल्ला केला. आणि तो पूर्णपणे जिंकून घेतला. उरल्यासुरल्या ख्रिश्चनांनी पर्वताचा आश्रय घेतला. शेवटी १५४१ मधे वास्को-द-गामाच्या मुलाने इथोपियावरील तुर्कांची नाकेबंदी उठविली. ४०० सैनिक घेऊन तो तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावर उतरला आणि त्याने इथोपियातील तुर्की फौजांवर हल्ला चढविला. पहिल्याच लढाईत तो मारला गेला. पण राहिलेल्या पोर्तुगीज सैन्यातील एकाने स्थानिक सल्फेट व सल्फरपासून बंदुकीची दारू बनविली आणि तुर्की सैन्याचा साना सरोवराजवळ पराभव केला. तरी पण तुर्कांचा उपद्रव पोर्तुगीजांना शेवटपर्यंत होतच राहिला.

सन १५८६ मधे मिररालबे नावाचा तुर्की सरदार जहाजांचा ताफा घेऊन जेद्दाला निघाला होता. त्याने पूर्व आफ्रिकन किनाऱ्यावरील अरबांना सांगितले की, ' मी पोर्तुगीजांविरुद्ध जिहाद पुकारला आहे.' अरबस्तानाकडे परतताना त्याने अनेक पोर्तुगीज ठाणी उद्ध्वस्त केली आणि पन्नास गोऱ्या पोर्तुगीजांना कैद करून नेले. गोव्यामधील पोर्तुगीजांनी मोंबासा येथील अरबांवर एक सुसज्ज आरमार पाठविले. तुर्कांना मदत केल्याबद्दल या

अरबांवर त्यांनी सूड उगवला. पण तीनच वर्षात मिररालबे परत आला. त्याने पुन्हा मोंबासाचा ताबा घेतला. आता अरब, तुर्क व पोर्तुगीज यांच्या झगड्यात आफ्रिकेतील वांझिम्बा नावाची नरभक्षकांची टोळी सामील झाली. त्यांचे सैन्य वीस हजार होते. त्याने झांम्बेझी नदीवरील पोर्तुगीजांचे टे टे हे ठाणे उद्ध्वस्त केले. आणि किलवावर स्वारी करून तेथे तीन हजार लोक मारले. मोंबासा येथे तुर्कांनी वाझिम्बाशी दोस्ती केली. वाझिम्बाचे सैन्य शहरात शिरले आणि त्यांनी तेथे हाहा:कार माजविला. खूप प्रयत्नानंतर पोर्तुगीजांनी मिररालबेला पकडले व ते त्याला लिस्बनला घेऊन गेले. वांझिम्बाचे नरभक्षक सैन्य व केनियातील इतर टोळीवाले यांच्यात लढाया होऊन भीषण रणकंदन झाले. त्यातच वांझिम्बाचा पराभव झाला. त्याच्या टोळीपैकी फक्त शंभरजण निसटून जाऊ शकले. बाकीचे सर्व मारले गेले.

□

प्रकरण पाचवे


## आफ्रिका व अमेरिका येथील गुलामांचा व्यापार

हिंदुस्थानकडे जाणारा जलमार्ग शोधता शोधता पोर्तुगीज प्रथम गिनीच्या किनाऱ्याकडे पोचले होते. तेथे दळणवळण सुरू झाल्यावर साहाजिकच त्यांनी व्यापार सुरू केला. तेथून त्यांनी काळी मिरी, हस्तिदंत व सोनं पोर्तुगालला न्यायला सुरुवात केली. पण थोड्याच वर्षांत पोर्तुगीज नाविकांना भरपूर पैसा मिळवून देणारा दुसराच एक माल आहे हे समजले. हा माल म्हणजे निग्रो गुलाम ! तसे पाहिले तर सन १४६० पासूनच पोर्तुगीज नाविक निग्रो गुलाम पकडून लिस्बनला नेत व तिथे त्यांना विकत. पण हे प्रमाण फार थोडे होते. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला पोर्तुगीजांनी जेव्हा विषुववृत्तीय प्रदेशात प्रवेश केला तेव्हा लागवडीचे कष्टाचे काम करण्यासाठी त्यांना निग्रो गुलामांची जरूर भासू लागली. पोर्तुगीजांनी आफ्रिकेच्या किनाऱ्याजवळ असलेल्या सावो थोमे आणि फर्नान्डो पो या बेटावर ऊसाची लागवड सुरू केली. सन पंधराशेमध्ये पेड्रो काब्रालने दक्षिण अमेरिकेतील ब्राझील प्रदेशाचा शोध लावला. अमेरिकेच्या अफाट निसर्गसंपत्तीतून धन निर्माण करायला कष्ट करणारे लोक हवे होते. अमेरिकेतील स्थानिक आदिवासी कष्टाची कामे करत

नसत. त्यांच्या स्वातंत्र्यप्रिय वृत्तीमुळे ते सतत झगडे करत. लढाईत मरून जात पण गुलाम होत नसत. त्या मानाने निग्रो गुलाम सोशिक व कष्ट करणारा होता. प्रथम पोर्तुगीज नाविक, गुलाम पकडून स्पेन व पोर्तुगाल येथे नेत व तेथून त्यांना कारिबियन समुद्रातील वेस्ट इंडिज बेटाकडे निर्यात करण्यात येई. असा द्राविडी प्राणायाम करण्यापेक्षा आफ्रिकेच्या किनाऱ्यावर गुलाम पकडून सरळ अमेरिकेचा किनारा गाठणे सोईचे व सोपे आहे, हे पोर्तुगीजांना लवकरच समजले. वारा अनुकूल असेल तर आफ्रिकेच्या किनाऱ्यापासून ब्राझीलपर्यंत जायला चार आठवडे पुरत.

सन १५१८ मध्ये अशा जवळच्या मार्गाने निग्रो गुलामांचा तांडा अमेरिकेकडे नेण्यात आला. या विषयी पुरावा उपलब्ध आहे. त्या वर्षीपासून निग्रो गुलामांचा हा सरळ व्यापार दरवर्षी वाढतच राहिला.

नंतर सोळाव्या शतकात अमेरिका व वेस्ट इंडिज्चा शोध लागल्यानंतर स्पॅनिश लोकांना हिस्पानियोला (वेस्ट इंडिज बेट) येथे शेती कामासाठी गुलामांची जरुर भासू लागली. तेव्हा स्पॅनिश राजांनी पोर्तुगीज नाविकांना गुलाम पुरविण्याची कंत्राटे दिली. एका व्यापाऱ्याने नऊ वर्षांत अडतीस हजार गुलाम पुरवण्याचे कंत्राट घेतले. आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील अंगोलापासून ब्राझीलमधील बाहीयापर्यंत गुलाम पुरवण्याचा दुसरा मार्ग तयार झाला. कांगोप्रदेशातून सतराव्या शतकात दहा लाख निग्रो पकडून विक्री करण्यात आले. यात मनिकांगोचे जुने साम्राज्य नष्ट झाले. आणि तिथला प्रदेश उजाड झाला. लुआंडा येथे जहाजात भरण्यात येणाऱ्या गुलामांना तिथला बिशप सामुदायिक




अटलांटिक महासागरावर गुलामांचा व्यापार या मार्गाने होत असे.

बाप्तिस्मा देई! आणि ख्रिश्चनधर्मात भर घातल्याचे समाधान मानून घेई.

निग्रो गुलामांच्या व्यापाराचे अनेक परिणाम झाले. त्यांपैकी एक परिणाम म्हणजे आफ्रिकेच्या अंतर्भागाचे संशोधन मंदावले, पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावर किल्ला व वखार बांधून ठेवली की पुरेसे होत असे. तेथे पोर्तुगीजांचे एजंट गुलाम पकडून आणत. मग अंतर्भागात जायचेच कशाला? तरी पण अंतर्भागात शिरण्याचे दोन प्रयत्न उल्लेख करण्याजोगे आहेत. सन १६१८ मध्ये जॉर्ज थॉम्सन याच्या नेतृत्वाखाली एक इंग्रजी जहाज गांबिया नदीच्या मुखातून ६४० किलोमीटर्स आत शिरले होते. या मोहिमेमध्ये थॉम्सन मारला गेला. सन १६५२ मध्ये फादर द मॉंटेसारच्यो या मिशनऱ्याने स्टॅन्ले धबधब्यापर्यंत कांगो नदीतून प्रवास केला. तेथे त्याला पोर्तुगीजांची व्यापारी ठाणी चालविणारे निग्रो भेटले.


सुरुवातीची बरीच वर्षे गुलामांच्या व्यापारात पोर्तुगीजांचीच मक्तेदारी राहिली. पण हळूहळू सोळाव्या शतकाच्या प्रारंभापासून या व्यापाराच्या बाबतीत इंग्लंडने स्पर्धा सुरू केली. युरोपियन देशांची जहाजे सोने व हस्तिदंत पूर्वीपासून आणत असतच. पण मोठ्या प्रमाणात जहाजातून गुलाम आणण्याचे काम प्लिमथ येथील जॉन हॉकिन्सने सुरू केले. त्याला लंडनमधील व्यापाऱ्यांचा पाठिंबा होता.

हॉकिन्सनंतर युरोपातील अनेक धाडसी व्यापाऱ्यांनी हा व्यापार सुरू केला. त्यांचा पोर्तुगीजांशी संघर्ष उडाला. डचांनी १६२० मध्ये पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावर किल्ले व वखारी बांधल्या. मग फ्रेंच, जर्मन व स्वीडिश नागरिकही ह्या धंद्यात

उतरले. गुलाम पकडणाऱ्या या नाविकांच्या एकमेकात चकमकी उडत असत. पोर्तुगीजांनी मग आपला मक्तेदारीचा हक्क बजावणे सोडून दिले व कांगोच्या मुखाजवळ इतर राष्ट्रांना गुलाम पकडण्याची ठाणी स्थापायला मान्यता दिली.

सन १६१८ मध्ये पहिल्या जेम्सने आफ्रिकेशी व्यापार करणाऱ्या कंपनीला सनद दिली. ही कंपनी मुख्यतः गुलामांचाच व्यापार करणार होती! अशा प्रकारे १६१८ मध्येच इंग्लंडने गुलामांच्या व्यापाराला मान्यता दिली. उत्तर अमेरिकेतल्या इंग्रजी वसाहतीत १६२० साली प्रथम निग्रो गुलाम पुरवण्यात आले. सोळाव्या शतकात सर्व आफ्रिका खंडातून दहा लाख गुलामांची निर्यात झाली असावी! पण सतराव्या शतकात अमेरिकेत गुलामांची मागणी प्रचंड वाढू लागली. १६५० साली गुलामांची मागणी कधीच पुरी करता येणार नाही इतकी वाढली. १६८० साली एकाच वाढाह या ठाण्यामध्ये इंग्लिश दलाल दरवर्षी पंधरा हजार गुलाम विकत घेत होते. गुलामांना पकडल्यामुळे पश्चिम आफ्रिकेमधील अनेक प्रदेश उजाड व निर्मनुष्य होऊ लागले. तेव्हा गुलाम पकडणारे एजंट जास्त अंतर्भागात जाऊ लागले आणि मोझांबिकसारखे नवे प्रदेश गुलामांसाठी हुडकू लागले.

गुलाम नेणाऱ्या जहाजांवर गुलामांना फारच क्रूरपणे वागवण्यात येई. आणि सर्वच युरोपियन नाविक याबाबतीत सारखेच होते. पकडलेल्या गुलामांना ओळखता यावे म्हणून प्रथम डागण्यात येई! त्यांना गळ्याला आणि पायाला साखळ्या बांधून डांबण्यात येत असे! पुरेशी हवा न मिळाल्याने अनेक गुलाम मरत. अनेक गुलाम आजारी दिसू लागले की जहाजावरचे अधिकारी त्यांना समुद्रात फेकून देत किंवा अन्नपुरवठा कमी पडला की तो वाच-



**गुलाम भरून नेणाऱ्या जहाजाचे छेद-दृश्य. गुलामांच्या जिवजीवितापेक्षा जहाजातील जागा जास्त महत्त्वाची होती !**

विण्याकरिता जहाजावरचे अनेक गुलाम समुद्रात टाकून देत. आफ्रिकेच्या किनाऱ्यापासून अमेरिकेत पोहोचेपर्यंत १/५ गुलाम मृत्यूमुखी पडत !

सतराव्या शतकामध्ये गुलामांच्या या व्यापाराची फारच भरभराट झाली व अठराव्या शतकाच्या सुरुवातीला या व्यापारात इंग्लंड अग्रेसर बनले. या सुमारासच इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली होती व लँकेशायर येथील कापड–गिरण्या भरपूर कापडाचे उत्पादन करू लागल्या होत्या. हे कापड देऊनच त्याच्या बदल्यात इंग्रजी एजंट आफ्रिकन टोळीवाल्यांच्याकडून गुलाम खरेदी करत. आफ्रिकन टोळीवाल्यांना सोने देऊन उपयोग नव्हता. त्यांच्या दृष्टीने कापड महत्त्वाचे होते ! आफ्रिकेत कापडाचा उपयोग चलनासारखा होत असे.

सोळाव्या शतकाच्या शेवटी आफ्रिकन किनाऱ्यावरचे पोर्तुगीजांचे वर्चस्व संपुष्टात आले. १६४१ मध्ये पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील लुआंडाचे ठाणे डचांनी बळकावले. आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर पोर्तुगीजांनी अरबांना खूपच विरोध केला. अरबांना तोंड देता यावे म्हणून पोर्तुगीजांनी मोंबासा बंदराजवळ फोर्ट जिझस् हा किल्ला बांधला होता. पण १६३१ मध्ये हा किल्ला सुलतान युसूफ याने जिंकून घेतला. सुलतान युसूफ हिंदुस्थानात जन्मला होता. त्याला कॅथॉलिक म्हणून वाढवला होता. पण नंतर तो मुसलमान बनला. सुलतान युसुफ ३०० सैनिकांसह आपल्या झग्यात खंजीर लपवून फोर्ट जिझस्मध्ये शिरला. आणि एका इशाऱ्यासरशी त्यांनी किल्ल्यातील शिबंदी मारून टाकली. मोंबासा येथे पोर्तुगीज व मुसलमान यांचे अनेकदा झगडे झाले. फोर्ट जिझस् किल्ल्याला मुसलमानांचा तीन वर्षे वेढा पडला. शेवटी पोर्तुगीजांची येथून हकालपट्टी करण्यात आली.

पोर्तुगीजांची अशी पिछेहाट होत होती तरी त्यांची जुनी संशोधक वृत्ती नष्ट झाली नव्हती. त्यांनी अंगोलाच्या अंतर्भागात किल्ले बांधले व ठाणी स्थापली. तेथील प्रदेशाचे संशोधनही केले. लोपेस नावाच्या प्रवाशाने सन १६०० मध्ये कांगोपासून टांगानिका सरोवरापर्यंत प्रवास केला होता. पण त्याबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. पण सन १६१६ मधील ग्रास्पर बोकारो याने केलेल्या प्रवासाची बरीच माहिती उपलब्ध आहे, लिव्हिंग्स्टनने टांगानिका सरोवर शोधण्यापूर्वी २०० वर्षे ग्रास्पर बोकारोने ते शोधून काढले होते. बोकारोचा संबंध टांगानिका किनाऱ्यावर राहाणाऱ्या मालावी या सामर्थ्यवान जमातीशी आला. पोर्तुगीज नकाशात या भागाला मालावी असेच नाव देण्यात

आले. आत्ताचे मालावी राष्ट्राचे नाव याच नावावरून घेतले आहे. या सरोवराच्या काठाने उत्तरेकडे गेल्यावर बोकारोला एक व्यापारी रस्ता सापडला. हा रस्ता रोवूमा या नदीच्या किनाऱ्याने जात होता. त्या रस्त्याने तो किलवा बंदर येथे पोहोचला. त्याने १६०० किलोमीटर्सचा प्रवास दोन महिन्यांत केला. टोळीवाल्यांच्या हल्ल्याला तो घाबरत होता. आपल्या वृत्तान्तात त्याने सांगितले की हा सर्व प्रदेश कांगोतून आलेल्या बाझिंबा या नर-भक्ष्यकाच्या टोळीने उद्ध्वस्त करून टाकला आहे. आपल्या क्रूर कृत्याने या टोळीने पूर्व आफ्रिकेत बरीच दहशत बसविली होती.

हिंदुस्थानाकडे जाणाऱ्या जहाजांना केप–ऑफ–गुड–होप येथे थांबून अन्नपाण्याची रसद घेणे सोपे जात असे. टेबल–बे येथील नैसर्गिक बंदरामध्ये दक्षिण अटलांटिक महासागरात होणाऱ्या वादळापासून चांगले संरक्षणही मिळत असे. पण तेथे अंतर्भागात युरोपियनांना बराच विरोध झाला. जे लोक अंतर्भागात शिरले त्यांना हॉटेन्टाट जमातीच्या लोकांनी तीव्र विरोध केला. हॉटे-न्टाट जमातीचे लोक निम्–भटके होते. ते शेतीही करत असत. आणि गुरांना घेऊन भटकतही असत.

त्यामुळे बरेच वर्ष हॉटेन्टाट लोकांच्या वाटेला कुणी गेले नाही. सन १६०८ मध्ये जॉन जॉर्डीन या ब्रिटीश व्यापाऱ्याने अहवाल सादर केला की टेबल-बे येथे तळ स्थापल्यास बोटींना रसद घ्यायला ते उपयोगी पडेल. १६१४ मध्ये आठ गुन्हेगार पाठवून येथे वसाहत स्थापण्याचा प्रयत्न इंग्रजांनी केला. पण तो यशस्वी झाला नाही. त्यानंतर १६२० मध्ये अन्ड्र्यू शिलिंग आणि हॅन्फ्रे हर्बर्ट पाच जहाजे घेऊन टेबल-बे येथे आले आणि त्यांनी इंग्रजी निशाण फडकवले. पण त्यानंतर तेथे कोणी उतरले नाही.

किंवा राहिले नाही. १६४८ मध्ये हॉर्लेम हे डच जहाज फुटले आणि केपच्या किनाऱ्याला लागले. या वेळी हॉटेन्टाट लोक डचांशी मित्रत्वाने वागले आणि त्यांनी डचांना अन्नपदार्थ व मांस पुरविले. कालान्तराने या डच खलाशांची सुटका करण्यात आली. तेथे परिस्थिती व हवामान अनुकूल आहे असे पाहून 'डच-इस्ट-इंडिया' कंपनीने जोहान व्हॉन रिबेक याच्या नेतृत्वाखाली तेथे वसाहत करायला एक ताफा पाठविला.

सन १६५२ मध्ये १३० पुरुष व काही स्त्रिया यांच्यासह व्हॉन रिबेक केप येथें उतरला. त्याला केप फारसे आवडले नाही. तरीही पण दहा वर्षांत तेथे लहानशी वस्ती तयार झाली. डच शेतकरी तेथे गहू पेरू लागले व गुरे पाळू लागले. व्हॉन रिबेकने वसाहत-वाल्यांपैकी काही पुरुषांना हॉटेन्टाट स्त्रियांशी लग्ने करायला परवानगी दिली. शेतीची कष्टाची कामे करण्यासाठी त्याने अंगोलाहून निग्रो गुलामही आणले. डचांनी जेव्हा टेबल-बेच्या आस-पासची भूमी आपल्या अंमलाखाली आणणे सुरू केले तेव्हा त्यांच्या हॉटेन्टाट लोकांबरोबर चकमकी उडू लागल्या. कारण ती जमीन त्यांचे परंपरागत गुरचरण होते.

व्हॉन रिबेक बटाविया येथे नव्या जागेवर गेला. त्यानंतर काही वर्षांनी सिमान व्हॉन डर स्टेल या मिश्र वंशाच्या माणसाची केपचा राज्यपाल म्हणून नेमणूक झाली. त्याचा जन्म मॉरिशस बेटात झाला होता. आता वसाहतीमध्ये किल्ला बांधण्यात आला होता. आणि युरोपातून मादागास्कर, सिलोन, जावा इकडे जाणारे प्रत्येक डच जहाज या नवीन बंदरात रसदीसाठी थांबत होते. विषुववृत्तावरील दमट हवामानापेक्षा येथील हवामान चांगले

होते आणि जमीन सुपीक होती. हळूहळू गोऱ्यांची वसाहत वाढू लागली. आफ्रिकेच्या दक्षिण टोकावर ही गोऱ्यांची वसाहत आफ्रिकाखंडातील पहिली वसाहत होय.

वसाहतीच्या सुरुवातीच्या काळात डच वसाहतवाल्यांनी अंतर्भागात शिरण्याचा मुळीच प्रयत्न केला नाही. वसाहतीतील जीवन कष्टाचे होते. आणि एखादा लहानसा जथा बंदरापासून अंतर्भागात गेला असता तर उग्र प्रकृतीच्या हॉटेन्टाट लोकांनी त्यांना कापून काढले असते. सुरुवातीच्या मोहीमा फारच लहान होत्या. आणि त्यातून काही निष्पन्न झाले नाही. १६६० नंतर जॉन दानकेर्ट बारा लोक घेऊन मोनामोटापा येथील सोन्याच्या शोधार्थ निघाला. पण त्याचा शोध व्यर्थ ठरला. काही वर्षांनंतर पिटर मिरहॉफ याने सध्याच्या नांबियामधील पश्चिम आफ्रिकेचा किनारा संशोधला. सन १७०० पर्यंत फारसे संशोधन झाले नाही. त्यावर्षी केप कॉलनीची वस्ती १७०० झाली होती. यापैकी खूप लोक फ्रान्सहून आलेले ह्युजेनॉट पंथाचे निर्वासित होते.

डच शेतकरी वाढू लागले होते. त्यांना आपल्यावरील ‘ डच इस्ट इंडिया ’ कंपनीचा अंमल आवडत नव्हता. त्यांनी अंतर्भागात वस्ती करून स्वतंत्र व्हायचे ठरवले. अर्थात त्यांना हॉटेन्टाट लोकांशी सामना करावा लागला. पण बंदुकीच्या जोरावर त्यांनी अशा चकमकीत हॉटेन्टाट लोकांचा पराभव केला. चकमकीत जे हाती सापडत त्यांना ते गुलाम करून पकडून नेत. त्याच वेळी टेबल-बे येथे देवीची साथ आली आणि अर्धे अधिक निग्रो गुलाम साथीला बळी पडले. त्यामुळेही अंतर्भागामध्ये जाऊन वस्ती करण्याची प्रवृत्ती वाढली. १७१९ मध्ये बव्हेरियन गणितज्ज्ञ पिटर कोल्ब याने केपपासून उत्तरेकडे पाचशे किलोमीटर पायी

प्रवास केला आणि ऑरेंज नदी ओलांडली. त्याने आपल्या मोहिमेचा सविस्तर वृत्तान्त लिहून ठेवला आहे. यानंतर पन्नास वर्षांनी डचांच्या नोकरीत असलेल्या कॅप्टन रॉबर्ट गार्डन या स्कॉट माणसाने ऑरेंज व वॉल नदीचा संगम शोधून काढला. आता केप वसाहतीची लोकसंख्या ३५०० झाली होती. निग्रो गुलामही तितकेच होते. वसाहतीतील घरे आणि संस्कृती यावर डचांची छाप पडली होती.

या मानाने मॉरिशस बेटावरील डचांची वसाहत फारशी यशस्वी झाली नाही. हे बेट पोर्तुगीजांनी सुरुवातीच्या संशोधन मोहीमेतच शोधले होते. डचांनी तेथे १५९८ मध्ये पाय ठेवला. आणि १७१२ मध्ये ते सोडून दिले. या काळात तेथे विपुल प्रमाणात असलेल्या डोडो पक्ष्याचा वंश शिकार करून करून त्यांनी नष्ट करून टाकला. नंतर हे बेट फ्रान्सने आपल्या ताब्यात घेतले. पुढे नेपोलियनशी झालेल्या युद्धात ते इंग्लंडने जिंकून घेतले.

मादागास्कर या मोठ्या बेटात सतराव्या शतकात फक्त चाचे लोकांची वस्ती होती. या चाच्यांनी आपले आंतरराष्ट्रीय गणराज्य स्थापले होते व घटनाही बनवली होती, पण चाचेगिरी व जहाजे लुटणे हाच त्यांचा मुख्य व्यवसाय होता.

अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत दक्षिण आफ्रिकेमधील पोर्तुगीजांचे अस्तित्व व सत्ता संपुष्टात आली. मोझांबिकमध्ये पोर्तुगीजांची लोकसंख्या काही शेकडे शिल्लक राहिली. त्यांपैकीही अनेकजण गोव्यातले होते. मिश्र जमातीच्या काही लोकांनी अंतर्भागात व्यापार करण्यासाठी मोहिमा काढल्या. पण त्या काही संशोधन मोहीमा नव्हत्या.

१७५० पासून पोर्तुगीज लोक आफ्रिकाखंड पूर्व-पश्चिम दिशेने

ओलांडायची कल्पना बोलू लागले. आफ्रिकेच्या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यामध्ये फार पूर्वीपासून दळणवळण चालूच असे. सोळाव्या शतकात अंगोलात विकलेले एक पांघरूण मोनामाटोपाच्या दरबारात आढळून आले होते. कांगोमधील काही जमाती मालावी सरोवरापर्यंत म्हणजे टांगानिका सरोवरापर्यंत नेहमी स्थलांतर करून जात असत. त्यांच्या द्वारे हे दळणवळण चालू राहात असे. पण अंगोलाचा राज्यपाल कुटिन्हो याला पूर्व आणि पश्चिम आफ्रिकेला जोडणारा कायमचा खुष्कीचा मार्ग हवा होता. असा मार्ग प्रस्थापित झाला म्हणजे अंतर्भागातील तांबे आणि हस्तिदंत सहज मिळविता येईल अशी त्याची कल्पना होती. शेवटी सन १७९८ मध्ये डॉ. फ्रॅन्सिस्को-जोश-मारीया-द लार्केडा या ब्राझीलच्या विद्वानाने पूर्व पश्चिम अफ्रिकेचा प्रवास केला. तो लिस्बनच्या दरबारात खगोलशास्त्रज्ञ होता. नंतर त्याची मोझांबिक मधील सेना येथे राज्यपाल म्हणून नेमणूक झाली होती. तेथे असतानाच त्याने आपली योजना आखली.

मोहिमेची आखणी मोठ्या प्रमाणात केली होती : चारशे हमाल, पन्नास सैनिक, दोन राजनैतिक अधिकारी आणि एक धर्मोपदेशक बरोबर घेऊन ही मोहीम मावाटा कझांम्बे या टोळीप्रमुखाच्या दरबाराकडे निघाली. हे ठिकाण अकराशे किलोमीटरवर उत्तर-पूर्वेच्या दिशेला होते. कझांम्बे हा लुंडा जमातीचा श्रीमंत टोळी-प्रमुख होता. त्याच्या मदतीने कसाई नदीवरच्या मावाटा याम्वो या लुंडा जमातीच्या राजाकडे ते जाणार होते. आणि तेथून पश्चिमेकडे प्रवास करून लुआंडा येथे अॅटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर ती मोहीम संपणार होती. पण दैव काही निराळेच होते. लार्केडा मलेरियाने आजारी पडला. त्याचे अनुयायी आपापसांत

भांडू लागले. आणि मार्गातल्या आफ्रिकन जमातींनी त्यांच्यावर हल्ले केले. कारण पोर्तुगोज लोक गुलाम पकडणारे म्हणून आफ्रिकन जमातीला माहीत होते. शेवटी लार्केंडा मरणोन्मुख झाला. तरीपण शेवटपर्यंत त्याने सविस्तर दैनंदिनी लिहिणे सोडले नाही. त्यातील निरीक्षणे पुढे फार उपयोगी पडली. त्याने कझांम्बेबद्दल लिहिले आहे, ' हा राजा आफ्रिकेच्या अंतर्भागातील टोळचात राहात असला तरी तो रानटी नाही. उलट चांगला सुसंस्कृत आहे. ' हा कझांम्बे राजा सध्याच्या झांबिया देशात राहात होता. काही दिवसांनंतर लार्केंडा मृत्यू पावला. मोहीमेतील उरलेल्या लोकांना धर्मोपदेशक फादर फ्रान्सिको पिंटो याने मोझां-बिकला परत नेले. लार्केंडाची मोहीम अयशस्वी ठरली. पण एकोणीसाव्या शतकात ज्या अनेक संशोधन मोहीमा निघाल्या व संशोधक निर्माण झाले, त्या सर्वांचा लॉर्केर्डा हा अग्रदूत होता.

लॉर्केंडाच्या मृत्यूनंतर त्याच्या मोहिमेतील माणसे मावाटा कझांम्बेच्या दरबारात नऊ महिने रेंगाळली. या काळात त्यांच्यातील एक सैनिक एकटाच पश्चिमेकडे गेला. त्याचे पुढे काय झाले ते समजले नाही. तो बहुधा जिवंत राहिला नसावा.

फादर पिन्टो अयशस्वी मोहीम घेऊन टेटे येथे परतला तेव्हा मोझांबिकमधील पोर्तुगीज जमीनदारांनी क्षणभर सहानुभूती दाखवली आणि ते पुन्हा आपल्या थंड व शांत जीवनक्रमात मग्न झाले. पण अंगोला येथील राज्यपाल अजून उत्साही होता. त्याने पेड्रो बाप्तिस्टा व अमेरो जोशे हे मिश्र संततीचे (मुलेटो) लोक निवडले आणि त्यांना पश्चिमेकडून पूर्वेकडे खंड ओलांडण्याची आज्ञा केली. हे दोघेजण भूदास होते. ते मोहिमेत खतम झाले असते तर फारसे नुकसान होण्यासारखे नव्हते ! शिवाय त्यांना

आज्ञापालन करणे भागच होते. बाप्तिस्टाला लिहिता येत होते म्हणून आपले अनुभव दैनंदिनीत लिहून ठेवण्याविषयी त्याला सांगण्यात आले.

ही जोडी १८०२ मध्ये निघाली. पण १८०५ पर्यंत त्यांची फारशी प्रगती झाली नाही. तोपर्यंत ते मावाटा याम्वोच्या दरबारात पोचले होते. तेथून ते कांगो नदी व झाम्बेझी नदीला विभागणाऱ्या जलरेषेपासून पूर्वेकडे अडचणी न येता निघाले. बाप्तिस्टा रोज दैनंदिनी लिहीत असे. त्याने आफ्रिकन खेड्यांची व त्यांच्या शेतांची सुंदर वर्णने लिहिली आहेत. त्याचे अनुभवही चित्तथरारक होते. ते कझाम्बेच्या दरबारात पोचले, पण त्यांना कैद करण्यात आले व सन १८१० पर्यंत त्यांना चार वर्षे कैदेतच राहावे लागले. शेवटी टेटे येथून व्यापाऱ्यांचा एक जथा आला आणि त्यांनी या जोडगोळीची सुटका केली.

टेटे येथे परत आल्यावर सेना येथील राज्यपालाने त्यांची मुलाखत घेतली. राज्यपालाने लिस्बनला अहवाल पाठविला की, 'या दोघांनी त्यांच्या कुवतीच्या मानाने आफ्रिकन संशोधनात चांगलीच कामगिरी बजावली आहे.'

बाप्तिस्टाची दैनंदिनी व लार्केडाच्या सफरीचे अहवाल १८७३ साली सर रिचर्ड बर्टनने इंग्लंडमध्ये प्रसिद्ध केले. योगायोगाने त्याच वर्षी आफ्रिका खंड ओलांडणारा पाहिला इंग्रज डॉ. लिव्हिंग्स्टन कझांम्बेच्या दरबाराकडून 'टेटे' कडे जाणाऱ्या पारंपारिक मार्गाजवळ मृत्यू पावला.

दक्षिणेकडे पोर्तुगीज लोक जेव्हा आपली प्राचीन सत्ता पुन्हा स्थापण्यासाठी धडपडत होते त्याच वेळी पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावर अरबांनी आपली सत्ता प्रस्थापित केली होती. अठराव्या

शतकात किलवापासून मालिन्दीपर्यंतचा समुद्रकिनारा अरबस्थान व ओमान येथील सुलतानांच्या साम्राज्यात मोडत असे. पण या सुलतानांना घरच्या कटकटी काही कमी नव्हत्या. त्यानी किनाऱ्यावरच्या मोठ्या शहरांसाठी प्रशासक नेमण्यापलीकडे काहीं केले नाही. अठराव्या शतकात येथील बहुतेक व्यापार फ्रेंचांच्या हातात होता. मॉरिशस अणि रियुनियन बेटावर त्यांची बळकट ठाणी होती. मॉरिशस बेटावर ऊसाची लागवड करण्यासाठी गुलामांची जरुर असे. त्यांना लागणारे निग्रो गुलाम अरब पुरवत असत. सन १७७६ मध्ये किलवाच्या सुलतानाने फ्रेंचाशी दरवर्षी हजार गुलाम पुरवायचा करारच करून टाकला. आफ्रिकेच्या अंतर्भागाशी होणारा व्यापार काही थोड्या जमातींच्याच हाती होता. त्यापैकी एक याम्वो ही जमात होती. त्या जमातीने झाम्बेझी नदीच्या खोऱ्यापासून मालावी सरोवरापर्यंत आणि तेथून रोऊमा नदीच्या किनाऱ्याने आपले व्यापारी मार्ग आखले होते. या प्रदेशाच्या उत्तरेकडे टांगानिका सरोवरापासून झांजिबार बेटाच्या किनारपट्टीपर्यंत असलेला व्यापारी मार्ग न्यामवेझी जमातीच्या हाती होता.

सन १८०६ मध्ये ओमानच्या सुलतानाला पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील आपल्या सार्वभौमत्वाची आठवण झाली. ओमान येथे तेव्हा सय्यद सैद आपल्या भावाचा खून करून सुलतान बनला होता. त्याने झांजिबार येथे ठाणे स्थापले व तेथे ओमानची राजधानी मस्कत येथून प्रशासक व व्यापारी पाठवले. त्या काळी युरोपात इंग्लंड व फ्रान्स यांची युद्धे चालू होती. त्याकडे सैद सावधपणे लक्ष देऊन होता. इंग्रज जिंकताहेत असे दिसल्याबरोबर त्याने फ्रान्सची बाजू सोडली आणि तो इंग्रजांचा दोस्त बनला.



अरब व्यापारी आफ्रिकेच्या अंतर्भागातून गुलाम असे पकडून आणत !

थोड्याच दिवसांत त्याने आपली राजधानी झांजिबारला नेली. कारण ओमानच्या रुक्ष वाळवंटापेक्षा झांजिबारमध्ये त्याला जास्त फायदा होत होता. तोपर्यंत अरब व्यापाऱ्यांनी अंतर्भागात धुमाकूळ घालायला सुरुवात केली होती. आता त्यांच्या हालचालींना जोर आला. हिंदुस्थानमधील सावकार पोर्तुगीजांच्या काळापासून पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावर व झांजिबार येथे राहू

लागले होते. त्यांना ‘ बनिया ’ या नावाने ओळखत असत. अरब व्यापाऱ्यांना या बनियांनी पैसा पुरवला व अंतर्भागात गुलाम, हस्तिदंत व तांबे यांचा व्यापार करायला उत्तेजन दिले. झांजिबार पासून टांगानिका सरोवराच्या अर्ध्या वाटेवर ताबोरा येथे अरबांनी आपले ठाणे स्थापले. लवकरच पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्या-वरील सर्व व्यापार अरबांच्या हाती आला. यापैकी गुलामांचा व्यापार सर्वांत मोठा होता. एकोणीसाव्या शतकाच्या सुरुवातीला झांजिबारच्या बाजारात दरवर्षी ४० हजार निग्रो गुलामांची विक्री होत असे !

□

प्रकरण सहावे

# एकोणिसाव्या शतकातील आधुनिक संशोधन

सोळाव्या शतकापासून एकोणिसावे शतक संपेपर्यंत आफ्रिकेतून आणलेल्या दोन कोटी गुलामांची विक्री झाली असावी. याशिवाय अमेरिकेला नेताना किंवा पकडताना एक कोटी गुलाम मृत्यू पावले ते निराळेच ! ही आकडेवारी अमेरिकेत नेलेल्या गुलामांची आहे. पूर्व आफ्रिकेतून अरबांनी लक्षावधी गुलाम पकडले ते निराळेच ! अशा तऱ्हेने आफ्रिका खंड म्हणजे निग्रो गुलामांचा कच्चा माल पुरवण्याची भूमी झाली होती. हे गुलाम किनारपट्टीच्या बंदरापर्यंत एजंट आणून पोचवत असल्यामुळे अंतर्भागात संशोधन करण्याची जरूर कोणाला भासत नव्हती. आफ्रिका खंडाच्या किनाऱ्याचा परिचय दीर्घकाळ असतानाही या कारणामुळेच अंतर्भागात कोणीही संशोधन केले नव्हते. गुलामांच्या मुक्ततेच्या चळवळीनंतरच आफ्रिका खंडात संशोधनाचे युग सुरू झाले. म्हणून गुलामांच्या मुक्ततेच्या चळवळीनेच आफ्रिका खंडाच्या भौगोलिक संशोधनाची नांदी म्हटली होती.

गुलामगिरीला विरोधही सुरुवातीच्या काळापासूनच होऊ लागला होता. क्वेकर पंथाचा संस्थापक जॉर्ज फॉक्स याने १६७१ मध्येच गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला होता. त्याचप्रमाणे

रिचर्ड बास्टर या धर्मोपदेशकाने गुलामगिरीविरुद्ध मते व्यक्त केली होती. त्यांचा हा आवाज अरण्यरुदनच ठरला ! पुढे क्वेकर-पंथीय लोक अमेरिकेत वस्तीला गेले आणि त्यांनी तिथेही व इंग्लंडमध्येही गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवणे चालूच ठेवले. सन १७६० पर्यंत गुलामांचा बहुतांश व्यापार इंग्लंडकडे आला होता. १७८३ मध्ये क्वेकरपंथीयांनी ब्रिटिश लोकसभेकडे एक अर्ज केला. त्या अर्जात जुलूम जबरदस्ती होत असलेल्या आफ्रिकन गुलामांच्या मुक्ततेविषयी कायदा मंजूर करण्याबद्दल विनंती करण्यात आली होती. तेव्हापासून इंग्लंडमधील लेखक आणि विचारवंत यांचा पाठिंबा या गुलामगिरीविरुद्धच्या चळवळीला मिळू लागला. त्यामध्ये जॉन लॉक, डॅनियल डेफो, अॅलेक्झांडर पोप आणि डॉ. जॉन्सन हे प्रमुख विचारवंत होते. डॉ. जॉन्सनचा नोकर आणि मित्र जमेका बेटातील माजी गुलाम होता. ग्रेनव्हिल शार्प याने सन १७७२ मध्ये ब्रिटिश लोकसभेत एक ठराव मंजूर करून घेतला. त्यानुसार इंग्लंडमध्ये कोणीही मनुष्य दुसऱ्याला गुलाम करू शकणार नव्हता. तरी पण एखादा गुलाम केवळ इंग्लंडमध्ये आल्यामुळे मुक्त होऊ शकत नाही हा १७२९ च्या कायद्याचा निर्णय कायमच होता. अठराव्या शतकाच्या शेवटी विल्यम विल्बरफोर्स याने ब्रिटिश लोकसभेत गुलामगिरी रद्द करण्याचा कायदा करण्यासाठी खूप खटपट केली. पण गुलामांचा व्यापार करणाऱ्यांचा त्याला तीव्र विरोध झाला. शेवटी १८०७ मध्ये इंग्लिश जहाजातून गुलामांची वाहातूक व व्यापार करायला बंदी करण्यात आली.

बुद्धिवंताच्या गुलामगिरी विरुद्धच्या या चळवळीमुळे आफ्रिकेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चालला. आफ्रिकेविषयीचे

जुनाट पूर्वग्रह जाऊन त्याची जागा शास्त्रीय दृष्टिकोनाने घेतली. या नव्या संशोधकांचा अग्रदूत जेम्स ब्रूस होता. त्याने १७६८–७३ पर्यंतचा काळ इथोपियाची राजधानी गोंडारे येथे काढला. याच काळात त्याने नीलनाईल नदीच्या उगमाचा शोध लावला. वास्तविक या भागाला पोर्तुगीजांनी दोनशे वर्षांपूर्वी भेट दिली होती. पण ते सर्व आता विस्मृतीत गेले होते ! जेम्स ब्रूसने आपल्या संशोधनाचा वृत्तांत सविस्तरपणे लिहून ठेवला होता. तो १७९० मध्ये पाच खंडांत प्रसिद्ध झाला त्याच्या या वृत्तांतामुळे आफ्रिकेच्या शास्त्रीय संशोधनाला सुरुवात झाली.

अठराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास कोणत्याही युरोपियन राष्ट्राच्या राजधानीत निग्रो गुलाम दिसत असत. श्रीमंत कुटुंबे निग्रो गुलाम ठेवणे हे मानाचे लक्षण समजत. पण यापैकी काही गुलाम मुक्त झाले, शिकले व बौद्धिक श्रमाची कामे करू लागले. त्यापैकी काहींनी आपल्या जमातीवर होणारे जुलुम, जबरदस्ती व अन्याय याबद्दल लिखाण केले व स्वतःला आलेले अनुभवही लिहिले. या सगळ्यामुळे गुलामगिरीविरुद्ध जागृती व आफ्रिकेबद्दल कुतुहल निर्माण होऊ लागले.

निग्रो गुलामांचे हाल साहित्यात येऊ लागले आणि त्याचा परिणाम होऊन युरोपातील सुसंस्कृत समाजात त्यांच्याविषयी सहानुभूती निर्माण होऊ लागली. याच सुमारास वेस्ट इंडिज बेटात निग्रो गुलामांनी बंडे केली. अशा बंडांचे पुढारी टाइसेंटल् ओव्हरचुअर व किंग ख्रिस्तोप यांना युरोपातील उदार मतवाद्यांची सहानुभूती मिळाली. हे बंडखोर हायकी बेटावरील होते. गुलामांच्या मुक्ततेच्या चळवळीबरोबरच दुसरा एक विचार पुढे आला. निग्रो गुलामांना आफ्रिकन भूमीवरून पकडून अन्याय करून अमेरिकेला

नेले आहे. त्यांना न्याय द्यायचा असेल तर आफ्रिकेच्या भूमीवर त्यांना परत नेले पाहिजे व तेथे त्यांचे पुनर्वसन केले पाहिजे— हा विचार पुढे आला. त्यानुसार १७८७ मध्ये सियरा-लिओन येथे माजी गुलामाच्या वसाहतींची स्थापना करण्यात आली. त्या वर्षी तेथे ३७० लोक वस्तीला गेले. १७९२ पर्यंत ही वसाहत मोडकळीला आली होती. पण त्या वर्षी अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतलेले व गुलामगिरीतून मुक्त झालेले बाराशे सैनिक तेथे वस्तीला आले. दोन वर्षांनी फ्रेंच जहाजांनी त्यांच्यावर हल्ला केला. पण त्यातूनही ही वसाहत वाचली आणि त्यांनी तेथे सुसंस्कृत समाज निर्माण केला. निग्रो गुलामांची मुक्तता केल्यास ते पुन्हा रानटी जीवन न जगता ते पुन्हा सुसंस्कृत समाज उभारतील अशी जी गुलामगिरीच्या मुक्ततेची चळवळ करणाऱ्यांची विचारधारणा होती, त्याला या सियरालिओनच्या वसाहतींच्या प्रयोगामुळे आधार मिळाला.

जेम्स ब्रूसने इथोपियामध्ये केलेल्या संशोधनामुळे इंग्लंडमध्ये आफ्रिकेबद्दल उत्सुकता निर्माण झाली आणि आफ्रिकेच्या अंतर्भागात संशोधन करण्यासाठी लंडनमध्ये १७८८ साली आफ्रिका असोशिएशन ही संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेच्या सभासदांना शास्त्रीय व भौगोलिक संशोधनाबद्दल मनापासून कळकळ वाटत होती. परंतु या संशोधनामागे दुसराही एक हेतू होता. गुलामांचा व्यापार संपुष्टात येत होता आणि औद्योगिक क्रांतीमुळे वाढत्या उत्पादनाच्या इंग्लंडमधील मालाला नव्या नव्या बाजारपेठांची जरूरी होती.

आफ्रिका असोशिएशनने नायगर नदीचे गूढ उकलायचे ठरविले. ही नदी समुद्राला कोठे मिळते व कोठे उगम पावते हे कोणालाच

माहीत नव्हते. नदीचा शोध दोन दिशांनी घेण्यासारखा होता. सहारा वाळवंटातून दक्षिणेकडे जायचे किंवा गांबियामधून पूर्वेकडे निघायचे. अनेक संशोधकांनी या मार्गाने जायचा प्रयत्न करून पाहिला होता. जॉन लेअर्ड हा संशोधक इजिप्तमध्ये मृत्यू पावला तर मेजर ह्यूटन्‌चा गांबियामध्ये खून झाला. या पार्श्वभूमीवर हे संशोधन पुढे हाती घेण्यासाठी जीवावर उदार होणाऱ्या धाडसी मनुष्याची जरूर होती. आफ्रिका असोशिएशनचा अध्यक्ष सर जोशिआ बँक्स याने मंगोपार्क याला निवडले. तो एका गरीब स्कॉटिश शेतकऱ्याचा मुलगा होता व त्याने सर्जनची पदवी मिळविली होती. तो नुकताच सुमात्राला जाऊन आला होता. व ऐन पंचविशीत होता. १७९५ मध्ये मंगोपार्क एका जहाजातून झांबियाकडे जायला निघाला. हे जहाज हस्तिदंत व मधमाश्यांच्या पोळ्यातील मेण यांचा व्यापार करीत असे. तेथून तो तीनशे किलोमीटर्स आत असलेले ब्रिटिश ठाणे पिसानिया येथे गेला. तेथे त्याने कित्येक महिने स्थानिक आफ्रिकन भाषा व चालीरिती शिकण्यात घालवले. नंतर एक दिवस तो दोन नोकर, एक घोडा व दोन गाढवे यासह प्रवासाला निघाला. तो कित्येक महिने या प्रदेशात भटकला. बहुतेक प्रदेश निर्मनुष्य व वैराण होता. या भ्रमंतीतच तो एका अरब टोळी प्रमुखाच्या हातात सापडला. त्याने मंगोपार्कला चार महिने कैद करून ठेवले. त्याच्या कैदेतून तो कसाबसा निसटला, पण त्याच्याकडे आता एक घोडा व होकायंत्र याशिवाय काहीच राहिले नव्हते. शेवटी सोळाशे किलोमीटर्सचा प्रवास करून तो नायगर नदीच्या काठावरील सेगू या गावी पोहोचला.

पण तोपर्यंत त्याची उपासमार झाली होती व भीक मागण्या-

शिवाय त्याला गत्यंतर नव्हते. सेगू गावातून त्याला लवकरच पळ काढावा लागला. आता तो नायगर नदीच्या किनाऱ्याने



मंगोपार्क

वाटचाल करू लागला. आता त्याच्याजवळ त्याचा घोडाही राहिला नव्हता व तो खूप अशक्त झाला होता. तो गांबियाला जाण्यासाठी म्हणून पश्चिमेकडे वळला. वाटेत त्याला लुटण्यात आले व तापाने आजारी पडून तो मरणोन्मुख झाला. तरीही धीर धरून तो अनंत अडचणी सोशीत वाटचाल करतच राहिला. शेवटी एकदाचा तो पिसानिया ठाण्यावर पोचला. त्याला या प्रवासाला अठरा महिने लागले. तो नायगर नदीचा बराच भाग पाहून आला होता. इंग्लंडला परतल्यावर त्याने 'आफ्रिकेच्या अंतर्भागातील प्रवास' या नावाचे एक पुस्तक लिहिले. त्या पुस्तकाची सर्वत्र प्रशंसा झाली.


परत आल्यावर मंगोपार्कने स्कॉटलंडमध्ये आपला वैद्यकीय व्यवसाय सुरू केला व सहा वर्षे सुखाने राहिला. वसाहत मंत्रालयाच्या सचिवाने आफ्रिकेच्या नव्या मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी त्याला विनंती केली, स्थिरस्थावर झालेले घर, पत्नी, मुलेबाळे सोडून आफ्रिकेच्या जंगलात हालअपेष्टा सोसत संशोधन

करण्याचे त्याने मान्य केले. पण आपण आफ्रिकेच्या या संशोधन मोहिमेवर जात आहोत ही बातमी आपल्या कुटुंबियांना सांगण्याचे धाडस त्याच्याने झाले नाही. वियोगाचे दुःख मोठे कठीण असते हेच खरे ! मग तो व्यवसायाच्या कामासाठी एडिंबराला जात आहे असे सांगून निघाला आणि तेथून त्याने निरोपाचे पत्र घरी लिहिले.

या वेळी तो सरकारी मोहींमेवर जात असल्याने त्याच्याबरोबर बरेच लोक होते. त्याच्या जथ्यात पंचेचाळीस युरोपियन होते. होते. त्यातले पस्तीस सैनिक होते. वाटाड्याही बरोबर घेतला होता. नायगरकडे जाताना वाटेत अनेक संकटे आली. अनेक लोक आजारी पडून मृत्यू पावले. तो जेव्हा बामाको या गावी पोचला, तेव्हा त्याच्या जथ्यातील अकरा लोक जिवंत राहिले होते. तेथे त्याने एक मोडकीतोडकी बोट मिळविली आणि तो नायगर नदीतून प्रवाहाच्या दिशेने निघाला. त्याने वसाहत मंत्रालयाच्या सचिवाला पत्र लिहिले, 'मी पूर्वेकडे माझी नाव हाकत आहे. मी निश्चय केला आहे की, 'नायगर नदीचे मुख शोधून काढीन किंवा नष्ट होऊन जाईन ! माझ्याबरोबरचे सर्व सहकारी किंवा मी मृत्यूमुखात पडलो तरी आमचा प्रयत्न सोडणार नाही.' मंगोपार्क नायगर नदीतून वाहात वाहात सोळाशे किलोमीटर्स गेला. नदीचे मुख शोधण्याचे त्याचं ध्येय साध्य होत आले होते, पण बुसा येथील जोराच्या उतारावर त्याची नाव फुटली. सर्वजण पाण्यात पडले. ते किनाऱ्याकडे जाण्याचा प्रयत्न करू लागताच किनाऱ्यावरील आदिवासी टोळ्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. नावेतले सर्वजण ठार झाले किंवा बुडून मेले.

मंगोपार्कच्या मृत्यूनंतर आफ्रिकेतील संशोधन मोहीम थंडावली.

युरोपमध्ये नेपोलियनच्या युद्धाची धामधूम चालू होती व त्यातच सर्व देश व्यग्र झाले होते. आफ्रिकेच्या संशोधनाकडे लक्ष द्यायला कोणाला वेळ नव्हता. शेवटी सन १८२० मध्ये ब्रिटिश वसाहत-मंत्री लॉर्ड बाथरस्टने नायगर नदीच्या उगम शोधण्यासाठी नव्याने प्रयत्न आरंभला. ह्यू क्लॅपर्टन, वॉल्टर अँडने व डिक्सन डेनहॅम या तिघांनी या मोहिमेत सामील व्हायचे ठरविले. सन १८२२ मध्ये हे तिघे त्रिपोलीला पोहोचले आणि तेथून त्या तिघांनी उत्तरेकडून आफ्रिका खंडात प्रवेश करावयाचे ठरविले. ते सरळ दक्षिणेकडे सहारा वाळवंटातून निघाले आणि चाड सरोवराजवळ




सहारा व पश्चिम आफ्रिकेतील क्लॅपर्टनचे धाडसी प्रवास

पोचले. तेथे बार्नू या राज्याची राजधानी होती. या प्रदेशात तोपर्यंत कुठल्याही गोऱ्या माणसाने प्रवेश केला नव्हता !

तेथे पोहोचल्यावर ॲडने मृत्यू पावला. परंतु क्लॅपर्टन व डेनहॅम यांनी संशोधन चालूच ठेवले. त्यांनी नायगरची बेनुये ही उपनदी शोधून काढली. चाड सरोवराच्या पश्चिमेकडे असलेल्या कानो या व्यापारी शहरात त्यांनी प्रवेश केला. तेथे गेलेले ते पहिलेच युरोपियन होते! तेथील अमीराने त्यांचे स्वागत केले. तेथून ते सोकोटो येथे गेले. सोकोटो ही अडीच लाख चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असलेल्या राज्याची राजधानी होती. ती उस्मान-बीन-फोदियो याने वसविली होती. त्या सुलतानाने नायगर नदीचा नकाशा काढून दिला आणि क्लॅपर्टनला सांगितले की, पुढच्या युरोपियन संशोधकांना वाळवंट तुडवून उत्तरेकडून यायचा सल्ला देऊ नकोस. दक्षिणेकडून येणे जास्त सोपे आहे. चाड सरोवराला येऊन मिळणाऱ्या नद्यांपैकी कोणतीच नदी नायगर नाही हे त्या संशोधकांनी शोधून काढले होते. मग क्लॅपर्टन आपले निष्कर्ष सांगायला इंग्लंडला घाईघाईने परतला. डेनहॅम मागे आफ्रिकेतच राहिला.

लंडनमध्ये क्लॅपर्टनचे जोरदार स्वागत झाले. तो उंच, सशक्त, देखणा व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा होता. संशोधक जसा असायला पाहिजे तसाच तो होता. एका स्कॉटिश शस्त्रवैद्याचा तो मुलगा होता. त्याचे आयुष्य रोमहर्षक प्रसंगांनी भरले होते. तेराव्या वर्षी तो केबिनबॉय म्हणून आरमारात सामील झाला. मॉरिशस बेट फ्रेंचांच्याकडून जिंकून घेण्याच्या मोहिमेत तो लढला होता. लवकरच त्याला कप्तानपद मिळाले. कॅनडात त्याने ताम्रांच्याबरोबर शिकारही केली होती.

सरकारने त्याला लगेच नायगर नदीकडे पाठविले. सोकोटोच्या सुलतानाबरोबर तह करण्याचे अधिकार त्याला देण्यात आले.

गुलामगिरी बेकायदा ठरवण्याची आणि व्यापाराची हमी देण्याची तरतूद यात केली होती. क्लॅपर्टन दक्षिणेकडून सोकोटो येथे जायला निघाला; पण या प्रवासात त्याची फार ससेहोलपट झाली. जथ्यातल्या सर्वांना मलेरिया झाला आणि अनेक लोक योरूबा प्रदेशात मृत्युमुखी पडले. आठ महिन्यांच्या खडतर प्रवासानंतर क्लॅपर्टन सोकोटोला पोचला. पण अरब व्यापाऱ्यांच्या सांगण्यावरून सुलतानाने तहनाम्यावर सही करायला नकार दिला. त्यामुळे क्लॅपर्टनला धक्का बसला. मलेरियामुळे व सततच्या प्रवासामुळे तो आजारी झालाच होता. एप्रिल १८२७ मध्ये वयाच्या एकोणचाळिसाव्या वर्षी तो मृत्यू पावला. त्याचे दफन सोकोटो शहराच्या कोटाच्या भिंतीपलीकडे करण्यात आले.


क्लॅपर्टन

क्लॅपर्टन मृत्यू पावला तेव्हा त्याच्याबरोबर त्याचा नोकर रिचर्ड लॅंडर होता. लष्करी अधिकाऱ्याचा खिदमतगार म्हणून त्याने काम केले होते. युरोप, वेस्ट इंडिज आणि द. आफ्रिका येथे तो फिरून आला होता. क्लॅपर्टनच्या मृत्यूनंतर झैराच्या अमीराने त्याला कैद केले. पण तो कैदेतून निसटला व रस्ता काढत किनाऱ्याकडे परत आला. नंतर फर्नांडो पो बेटावरील डिक्सन डेनहॅमला तो भेटला आणि मायदेशी परतला.

रिचर्ड लँडर प्रसंगावधानी व शूर होता. एका टोळीप्रमुखाने त्याला विषप्राशनाचे दिव्यही करायला लावले होते. तो नुसताच धाडसी प्रवासी नव्हता तर उत्तम साहित्यिक सुद्धा होता. क्लॅपर्टनच्या शेवटच्या दिवसांचे त्याने प्रत्ययकारी चित्रण केले आहे. परतल्यावर त्याने आपल्या मोहिमेचे वर्णन करणारे पुस्तकही लिहिले. त्याने लॉर्ड बाथरस्टला नायगर नदीचे मुख शोधून काढण्यासाठी आपल्याला पाठवावे अशी विनंती केली. बॉथरस्टने त्याला शंभर पौंड दिले व मोहिमेवर पाठवले. मोहीम संपेपर्यंत त्याच्या पत्नीला दरवर्षी शंभर पौंड देण्याचेही बाथरस्टने मान्य केले. लँडरचे वय तेव्हा सव्वीस वर्षांचे होते. त्याच्याजवळ जबरदस्त आत्मविश्वास होता. या महिमेत त्याने आपला धाकटा भाऊ जॉन यालाही घेतले. नायगर नदीतून त्याने १८३० मध्ये प्रवास सुरू केला. त्याला या प्रवासाला चार महिने लागले. अनेकदा त्याला प्राणसंकटातून जावे लागले. स्थानिक आदिवासी टोळयांनी त्याला लुटले. इबो जमातीच्या प्रमुखाने खंडणी मिळवण्यासाठी त्याला ओलीस ठेवले. खून होण्याची त्याला सतत भीती होती! या सर्वांवर मात करून त्याने नायगर नदीचे मुख गाठले व अटलांटिक महासागरात तेथून प्रवेश केला. त्याच जागी आता हार्कोर्ट हे बंदर विकसित झाले आहे. नायगर नदीच्या मुखाचा शोध लावून लँडरने पश्चिम आफ्रिकेच्या इतिहासाला कलाटणी दिली.

आफ्रिकेच्या अंतर्भागात शिरायला नायगर नदीचा जलमार्ग आता उपलब्ध झाला. या नवीन मार्गामुळे पश्चिम आफ्रिकेतील गुलामांचा व्यापार व खोबरेल तेलाचा व्यापार यांची सूत्रे अरब, स्पॅनिश व पोर्तुगीज यांच्या हातांतून निसटली. ते बॉनी येथील

बंदरामधून हा व्यापार करीत असत. पाच वर्षांनंतर इंग्लंडने पोर्तुगाल व स्पेनबरोबर एक करार केला. त्यानुसार जी स्पॅनिश किंवा पोर्तुगीज जहाजे आफ्रिकेच्या किनाऱ्यावरून गुलाम पकडून अमेरिकेकडे नेत असतील ती पकडून ताब्यात घ्यायला इंग्लिश आरमाराला परवानगी देण्यात आली. अशा तऱ्हेने सन १८०७ मध्ये इंग्लिश आरमाराला गुलामगिरीविरुद्ध दिलेला आदेश आता अंमलात आला. बॉनीच्या राजाबरोबर– दापा पेपलबरोबर १८३७ मध्ये तहनामा करण्यात आला. त्यानुसार गुलामांचा व्यापार बंद करण्यासाठी या प्रदेशात ब्रिटिश वर्चस्व असावे हे मान्य करण्यात आले. त्यामुळे यातूनच नायजेरियाची वसाहत तयार झाली. या वसाहतीच्या हद्दी सोकोटोपर्यंत व चाड सरोवरापर्यंत पोचल्या.

आफ्रिकेमधील तिम्बक्तू या शहराबद्दल युरोपात व अन्यत्र अनेक दंतकथा शेकडो वर्षं सांगितल्या जात असत. ते विद्येचे माहेरघर आहे आणि तिथे अमाप संपत्ती आहे असेही बोलले जात असे. सोळाव्या शतकात लिओ आफ्रिकनस या अरबाने तिम्बक्तूला भेट दिल्याची नोंद आहे. या लिओला भूमध्य समुद्रातील चाच्यांनी पकडून आणले होते व पोपला नजर केले होते.

नायगर नदीवरील आपल्या प्रवासाचा वृत्तान्त लिहिताना मंगोपार्कने या तिम्बक्तू शहराचा उल्लेख केला होता. त्यामुळे अनेक संशोधक तिम्बक्तूचे रहस्य उकलण्यासाठी उत्सुक झाले होते. तिम्बक्तूला पहिला पोचलेला पहिला गोरा मनुष्य इंग्रज होता. अलेक्झांडर लँग या नावाचा हा इंग्रज तिम्बक्तूला पोचला खरा, पण लागलीच तेथे त्याचा खून झाला. त्याच्या मागोमाग रेने कॅले हा फ्रेंच तेथे पोचला. रेने कॅले हा सरकारी पाठिंब्याने गेला नव्हता. त्याची मोहीम निघेपर्यंत फ्रान्सने आफ्रिकेच्या मोहिमेत

काहीच रस दाखवला नव्हता याचे आश्चर्य वाटते. कारण १७९८ मध्ये नेपोलियनने जेव्हा इजिप्तवर स्वारी केली तेव्हा त्याने आपल्याबरोबर शास्त्रज्ञांचा ताफा नेला होता. त्या शास्त्रज्ञांनी तेथे खूप संशोधन केले. जुनी इजिप्शिअन लिपी उलगडली आणि आपले संशोधन चोवीस खंडांत प्रसिद्ध केले होते. रेने कॅलेने आफ्रिकेत मोहीम काढण्याचे ध्येय लहानपणापासून बाळगले होते. तो विद्यार्थी असतानाच सेनेगॉलला गेला होता. तेथून तो सन १८२४ मध्ये परतला. त्यानंतर तीन वर्षांनी त्याने सियरालिओनचा आपला रोमहर्षक प्रवास सुरू केला. तिम्बक्तूच्या वाटेवर गोरा मनुष्य किंवा ख्रिस्ती मनुष्य दिसला की स्थानिक आदिवासी त्याचा खूनच करीत असत ! म्हणून रेने अरेबिक भाषा शिकला आणि बाटलेल्या मुसलमानांचे आचार-विचार त्याने अंगी बाणवले. त्याने आपला वेषही बदलला आणि इजिप्शिअन मुसलमान म्हणून तो वावरू लागला. त्याने एक उंटाचा काफला पकडला आणि तो जेने व काब्रा या गावावरून तिम्बक्तूला पोचला. तेथे पोचल्यावर त्याची फार निराशा झाली. ते एक घाणेरडे रानटी लोकांचे स्थळ होते. प्राचीनकाळच्या साम्राज्याच्या स्मृतीवर ते शहर जगत होते.

त्याने तिम्बक्तू शहरात पंधरा दिवस काढले. नंतर तो उत्तरेकडे वळला व पश्चिमेस सहारा वाळवंट ओलांडून फेज येथे पोहोचला. त्याचा हा प्रवास फार धोक्याचा होता. या प्रदेशात कुठल्याही युरोपियनाने प्रवास केला नव्हता. क्लॅपर्टन आणि डेनहॅम यांनी उत्तर–दक्षिण दिशेने सहारा वाळवंट ओलांडले होते; पण तो मार्ग रेनेच्या मार्गाच्या पूर्वेला १६०० किलोमीटर होता.

रिचर्ड आणि जॉन लॅण्डर यांनी नायगर नदीच्या मुखाचा शोध लावल्यानंतर तेथे नव्या नव्या मोहिमा निघू लागल्या. लिव्हर-पूलच्या व्यापाऱ्यांनी एक संघ स्थापन करून माग्रेगोर लेअर्ड याला नव्या मोहिमेवर पाठविले. त्याने रिचर्ड लँडरला वाटाड्या म्हणून घेतले. ही मोहीम नायगर नदीतून आत शिरून नायगर आणि बेनुअे नद्यांच्या संगमापर्यंत पोचली.

लॅन्डरने आपले संशोधनही त्यापुढे चालूच ठेवले. पण त्याला स्थानिक व्यापाऱ्यांनी फार विरोध केला. अन्गिमा येथे त्याला गोळी लागली व तो जखमी झाला. त्याला बोटीतून नायगर नदीतून फर्नांडो पो बेटावर नेण्यात आले. झालेल्या जखमांमुळे तो तेथे मृत्यू पावला. तेव्हा त्याचे वय २९ वर्षांचे होते. पश्चिम आफ्रिकेच्या या संशोधनात सन १७९० पासून बहुतेक सर्व संशोधक मृत्युमुखी पडले. ल्यूटन, मंगोपार्क व त्याचे पंचेचाळीस सहकारी, ऑडने, क्लॅपर्टन आणि इतर अनेक नावे घेता येतील. त्या नामावळीतच रिचर्ड लँडरचे नाव समाविष्ट झाले.

पण संशोधकांना रानटी आफ्रिकेत विरोधकांपेक्षा मलेरियाचा जास्त त्रास झाला. पश्चिम आफ्रिकेच्या संशोधनामध्ये मलेरिया हाच मोठा अडथळा होता. १९ वे शतक संपेपर्यंत मलेरिया डास चावल्याने होतो हे समजलेले नव्हते. मलेरिया या शब्दाचा अर्थ 'वाईट हवामान' असा आहे. विषुववृत्तीय प्रदेशात साठलेल्या पाण्याच्या डबक्यामुळे वाईट हवा निर्माण होते व त्यामुळे मलेरिया होतो असा त्या काळी समज असे.

त्यामुळे पश्चिम आफ्रिका म्हणजे गोऱ्या माणसांचे थडगे बनली. सन १८५४ मध्ये क्विनाईनचा शोध लागला व त्यामुळे मलेरियामुळे होणारे मृत्यू थांबले. त्या वर्षी विल्यम बाल्फोर

बैके याने नायगर नदीच्या प्रवासात क्विनाईन वापरले. चार महिन्यांनंतर त्याचे जहाज परतले तेव्हा जहाजावर मलेरियामुळे एकही मृत्यू झाला नव्हता.

क्विनाईनच्या शोधामुळे पश्चिम आफ्रिकेत क्रान्तीच घडून आली. आता व्यापारी जहाजातून जाण्याऐवजी किनाऱ्यावर जहाज नांगरून ठेवू लागले आणि अंतर्भागात व्यापारासाठी पक्की ठाणी वसवू लागले. इंग्लंडने पश्चिम आफ्रिकेच्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था राखावयाची जबाबदारी आपली आहे असे मानले आणि सगळीकडे आपले राजदूत नेमले. गुलाम पकडणाऱ्या व्यापाऱ्यांविरुद्ध इंग्लंडने युद्धच पुकारले. इंग्लिश सैन्याने व आरमाराने हस्तक्षेप करून लागोसचा प्रिन्स कोसोको याचा पराभव केला. तरी पण अंतर्भागात इंग्रजांना सन १९०० पर्यंत प्रतिकार होतच राहिला.

चाड सरोवर आणि पश्चिम सुदान याकडे उत्तरेकडून जाण्याचा मार्ग शोधण्याचा मान क्लॅपर्टन व त्याचे सहकारी यांच्याकडे जातो. सन १८५० मध्ये या मार्गाने तीन साहसी संशोधक पुन्हा निघाले. ही मोहीम ब्रिटिश सरकारने आखली होती. पण त्या मोहिमेत हॅम्बुर्गचा हेन्रीच बार्थ आणि ॲडोल्फ ओव्हरवेग हे दोन जर्मन होते व जेम्स रिचर्डसन हा तिसरा इंग्रज होता. त्रिपोलीहून ते निघाले. एका वर्षाने ते चाड सरोवराजवळ पोचले. तेथे पोचताच जेम्स रिचर्डसन मृत्यू पावला. ओव्हरवेगने होडीत बसून चाड सरोवराला प्रदक्षिणा घातली. पण नंतर तोही मृत्यू पावला.

आता हेन्रीच बार्थ हा एकटाच राहिला होता. पण त्याने धीर सोडला नाही. पुढची तीन वर्षं त्याने तिम्बक्तू व कॅमेरॉन

यामधील प्रदेशांचे संशोधन करण्यात घालविली. हेन्रीच बार्थ-जवळ शास्त्रीय दृष्टिकोन होता, त्याचबरोबर त्याचे मन दयार्द्र व कोमल होते. त्याने आपले सर्व निरीक्षण तपशीलवार लिहून ठेवले व नंतर पाच खंडांत प्रसिद्ध केलें. त्याच्या माहितीपूर्ण वृत्तान्तामुळे युरोपियनांच्या आफ्रिकेविषयी ज्ञानात भर पडली. त्याच्या या पंचखंडात्मक अहवालात अनेक तपशील भरले आहेत. नद्यांची रुंदी, किनाऱ्यांच्या काठांची उंची, तेथील वनस्पतींचे प्रकार, शहरातील व गावातील अंतरे, आदिवासी जमातींच्या चालीरीती या सर्वांचे वर्णन तो तपशीलवार देतो. बेनुअे नदी ओलांडताना काय प्रसंग ओढवला हे त्याने एका ठिकाणी लिहून ठेवले आहे. ते वर्णन वाचल्यास त्याच्या तरल व तपशीलवार वृत्तान्ताची कल्पना करता येईल. तो लिहितो–

'मी होडीच्या तळाशी तंबूच्या काठ्या ठेवल्या होत्या व त्यावर सामानाची गाठोडी होती. त्यामुळे होडीत शिरलेल्या पाण्यामुळे माझे सामान भिजले नाही, पण हाजीच्या जोडी-दारांनी ही काळजी घेतली नाही. त्यामुळे त्याचे सामान भिजले व हाजीची पुस्तकेही ओली झाली. हे नुकसान पाहून त्याच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले. आमचे घोडे होडीच्या बाजूने पोहत येत होते. त्यांना खूप त्रास होत होता. पण उंट पलीकडे नेताना सर्वांत वैताग आला. त्यांना मारल्याशिवाय ते पाण्यातून पुढे सरकतच नव्हते. हाजीचा उंट तर वाहून जाणार असे वाटले, पण त्याला कसाबसा वाचवला.'

हेन्रीच बार्थला आपल्या भ्रमंतीत तीन वर्षेपर्यंत एकही युरो-पियन भेटला नाही. शेवटी तीन वर्षांनंतर त्याला डॉ. आल्फ्रेड होगेल हा जर्मन भेटला. बार्थबद्दल काहीच न कळल्यामुळे त्याला

शोधायलाच होगेल आला होता. त्याने बरोबर दोन सैनिक आणले होते. डॉ. होगेल आणि एक सैनिक यांचा चाड सरोवराजवळ खून झाला. राहिलेल्या सैनिकाला घेऊन हेन्रीच बार्थ सप्टेंबर १८५५ मध्ये लंडनला परतला. तेथे पोचल्यावर त्याला पुष्कळ मान-सन्मान मिळाले. त्याने नंतर आशिया मायनरमध्ये प्रवास केला. व नंतर बर्लिनमध्ये तो प्राध्यापक झाला. वयाच्या चव्वेचाळिसाव्या वर्षी १८६५ मध्ये तो मृत्यू पावला. त्याच्या संशोधनामुळे जर्मनीचे लक्ष आफ्रिकेकडे वळले.

एकोणिसाव्या शतकात उत्तर आफ्रिकेत ज्या संशोधकांनी अविश्रांत संशोधन केले त्यामध्ये गेरहार्ड राल्फचे नाव पहिले आहे. तो जन्माने जर्मन होता. आणि विसाव्या वर्षीच तो अल्जेरियामधील फॉरीन लिज्नमध्ये भरती झाला होता. त्या वेळी त्याचे वय वीस वर्षांचे होते. अल्जेरियात राहात असताना अरबांच्या चालीरीतींचे त्याने चांगले निरीक्षण केले होते. एका प्रवासात त्याने मुस्लीम वैद्याचे हुबेहूब सोंग वठविले होते. १८६५ मध्ये तो त्रिपोलीहून निघाला आणि सहारा वाळवंट ओलांडून अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर लागोस येथे पोचला. त्यानंतर त्याने लिबियाच्या वाळवंटातील दूरदूरच्या प्रदेशात प्रवास केला. खुफारा ओयासिसमध्ये पोचलेला तो पहिलाच युरोपियन होता. सहारा वाळवंटामधील एकाकी आयुष्याचा व जीवनक्रमाचा त्याने चांगला अभ्यास केला होता. त्याने लिहिले आहे, 'सहारा वाळवंटात प्रवास करताना मला वाटे की, जीवसृष्टी नसलेल्या दुसऱ्याच एका ग्रहावर आपण आहोत ! उंटांच्या तांड्यापासून जर आपण क्षणभर मागे रेंगाळलो तर तांडा दिसेनासा होई. अशा वेळी तेथील वाळवंटाचा अमर्याद

विस्तार व एकटेपणाची जाणीव खायला उठे ! आणि बलदंड मनाच्या माणसालासुद्धा भयाची भावना स्पर्श करून जात असे.' सहारा वाळवंटातील प्रवासाशिवाय त्याने इथोपियामध्ये दोन वेळा प्रवास केला होता. इंग्लंडच्या रॉयल जिऑग्राफिकल सोसायटीने त्याचा सन्मान केला. शेवटी तो झांजिबारमध्ये जर्मन वकील म्हणून काम पाहात होता.

गुस्तॉव नाचीगल हा राल्फचा समकालीन जर्मन संशोधक होता. त्याने उत्तर आफ्रिकेबद्दल खूपच भर घातली आहे. त्याने चाड सरोवरापासून नाईल नदीपर्यंत प्रवास केला. असा प्रवास करणारा तो पहिलाच युरोपियन होता. शिवाय त्याने सहाराच्या अंतर्भागातील तिबेस्ती प्रदेशाचे संशोधन केले.

आतापर्यंत विषुववृत्ताच्या उत्तरेकडील आफ्रिकेचे संशोधन पूर्ण होते आले होते. आता मात्र स्थानिक शासकांना युरोपियनांच्या संशोधनाचा खरा अर्थ समजू लागला. युरोपियनांच्या प्रभावापुढे आपली सत्ता नष्ट होणार याचे भविष्य त्यांना समजले. अर्थातच ते युरोपियनांना विरोध करू लागले. त्यांना शासन करण्यासाठी म्हणून गोल्डकोस्टमध्ये इंग्रजांनी अष्टानी जमातीविरुद्ध लष्करी मोहीम काढली, तर फ्रेंचांनी अल्-हाज्-उमर आणि सामीरी तोरे या सरदारांचा बंदोबस्त केला. पण जाणवण्यासारखा विरोध सुदानमधील महादीने केला. तो स्वतःला परमेश्वराचाच दूत मानत असे. 'पृथ्वीवर न्यायाचे राज्य स्थापायला मला पाठविले आहे,' असे तो सांगत असे. इजिप्तचा खेदिव इस्माईल याने १८७४ मध्ये जनरल चार्ल्स गॉर्डन याला सुदानचे राज्यपाल नेमले होते. तो एकदा व्यवस्था लावून परत गेला होता. १८८४–८५ मध्ये गॉर्डन परत आला तेव्हा सर्व सुदान

महादीने व्यापला होता. गॉर्डन खार्टूम येथे दहा महिने वेढ्यात अडकला. वेढ्यातून सुटका करण्यासाठी त्याने ब्रिटिश फौज मागविली होती. पण तो मारला गेल्यावर दोन दिवसांनी ती फौज पोचली ! पुढे सन १८९८ मध्ये लॉर्ड किचनेरच्या नेतृत्वाखाली इंग्रज सेनेने सुदान पुन्हा जिंकून घेतले. या युद्धामध्ये सुदानी फौजेची अतोनात प्राणहानी झाली.

□

प्रकरण सातवे

# मध्य आफ्रिकेतील मिशनरी

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मध्य आफ्रिकेत अनेक मिशनरी शिरले. त्यांचा प्रमुख हेतू धर्मप्रसार होता, पण त्याबरोबर त्यांनी संशोधनही केले. या सगळ्या मिशनऱ्यांचा मुगुटमणी म्हणजे लिव्हिंगस्टन ! युरोपियनांच्या मनात जगाच्या कानाकोपऱ्यात प्रभू येशूचा संदेश पोचवावा अशी प्रामाणिक तळमळ होती. धर्मप्रसाराबरोबरच पुढच्या काळात गुलामांच्या मुक्ततेचे ध्येयही सामील झाले. १७८७ मध्ये गुलामाची चाल रद्द करण्यासाठी एक सोसायटी स्थापन झाली. या सोसायटीने सियरा–लिओनमध्ये मुक्त केलेल्या गुलामांची वसाहत केली होती. यातील लोकांनीच पुढे चर्च मिशनरी सोसायटी (सी. एम. एस.) स्थापन केली. त्यांनी ठिकठिकाणी शाळा काढल्या. अशाच एका फ्रीटाऊनमधील शाळेत सन १८२२ मध्ये ब्रिटिश आरमाराच्या एका जहाजाने एक मुलगा दाखल केला. त्याला पोर्तुगीजांनी आपल्या जहाजात पकडून ठेवला होता, व गुलाम म्हणून त्याची विक्री होणार होती. ब्रिटिश आरमारी जहाजाने त्याला सोडविले.

त्याचे नाव सॅम्युएल क्रॉथर! १८२६ साली क्रॉथरला इंग्लंडमधील इलिंग्टन येथील शाळेत पाठविण्यात आले. शिक्षण संपल्यानंतर त्याने आफ्रिकेमधील तीन संशोधन मोहिमांत भाग घेतला. शेवटी तो बिशपपदापर्यंत पोचला. आफ्रिकन रक्ताचा तो पहिला प्रॉटेस्टंट बिशप होता.

सॅम्युएल क्रॉथरच्या उदाहरणावरून एकोणिसाव्या शतकातल्या मिशनऱ्यांना वाटू लागले की, शिक्षण आणि ख्रिश्चन धर्म आफ्रिकेत पोचवल्यास या खंडाचा कायापालट होईल.

प्रॉटेस्टंटांप्रमाणे कॅथॉलिकांनी आफ्रिकेत धर्मप्रचाराचे काम सुरू केले. कॅथॉलिकांनी सुरुवात फार पूर्वी केली होती. सन १५६० मध्ये जेसुईट धर्मोपदेशक गोन्कालो-द-सिल्व्हेरा याने कांगो व झांबेझीच्या खोऱ्यात ख्रिश्चन धर्मप्रसार केला होता. पण पुढे सातत्य न राहिल्यामुळे ते सर्व कार्य नामशेष झाले होते व केवळ इतिहासातच उरले होते. सन १८१८ मध्ये कॅथॉलिकांनी पुन्हा मिशनरी काम सुरू केले. व्हाईट फादर्स (सोसायटी ऑफ अवर लेडी ऑफ आफ्रिका) यांनीही आफ्रिकेच्या अंतर्भागात धर्मप्रसार सुरू केला.

आफ्रिकेत काम करणारे मिशनरी आपापल्या देशातील सरकारांना नेहमी विनंती करीत असत की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रदेश संरक्षित प्रदेश म्हणून ताब्यात घ्यावा. त्यामुळे गुलामगिरीचेही उच्चाटन होईल आणि ख्रिस्ती धर्मप्रसाराचे कामही शांतपणे चालविता येईल. पण अशी कृती करायला युरोपातील राष्ट्रे नाखूष असत. अशा प्रकारे संरक्षित प्रदेशाचा पहिला करार



सूलतान सैय्यद सैद

झांजिबारच्या सुलतानाने १८२२ मध्ये प्रथम केला. सुलतान सय्यद सैद आणि ब्रिटिश प्रतिनिधी कॅप्टन मोर्सबी यांनी या करारावर सह्या केल्या. या करारानुसार सुलतानाच्या राज्याबाहेर गुलाम विकणे बेकायदेशीर ठरविण्यात आले. १८३९ पासून ब्रिटिश राजदूत झांजिबार येथे राहू लागला.

मिशनरी लुडविग क्राफ १८४४ मध्ये मोंबासा येथे उतरला. त्यापूर्वी त्याने इथोपियात मिशनरी म्हणून पाच वर्षं काम केले होते. आफ्रिकेचा हा किनारा झांजिबारच्या सुलतानाच्या राज्यात मोडत असे. सुलतानाने क्राफला वसाहत स्थापायला परवानगी दिली. मोंबासा बेटावरच आता ओसाड पडलेला पोर्तुगीजांचा किल्ला फोर्ट जिझस होता. पण आता पोर्तुगीजांचा तेथे मागमूसही उरला नव्हता. त्याच ठिकाणी ब्रिटिश मिशनरी सोसायटीचा हा जर्मन प्रतिनिधी नव्याने धर्मप्रसाराचा प्रयत्न सुरू करत होता. परंतु आता अरबांची सत्ता आफ्रिकेच्या अंतर्भागापर्यंत पोचली होती. एक पोर्तुगीज प्रवासी आन्टोनिया गामीटो याला अरब व्यापारी टांगानिका सरोवराच्या दक्षिणेकडे १८३२ मध्ये भेटले होते. क्राफचे काम कठीण होते व अनंत अडचणी होत्या.

मोंबासा येथे आल्याआल्याच क्राफवर दैवाचा घाला पडला. त्याच्या गर्भवती पत्नीला मलेरिया झाला व त्यातच तिचा मृत्यू

ओढवला. क्राफही मलेरियाने आजारी पडला. परंतु तो वाचला. लवकरच त्याला जोहॉन रेबमान हा मिशनरी येऊन मिळाला. तो शेतावरच वाढला होता आणि त्याची प्रकृती ठणठणीत होती. त्या दोघांनी मोंबासा शहराबाहेर मिशनरी केंद्र स्थापन केले. क्राफ भाषाशास्त्रज्ञ होता. तो स्वाहिली भाषा शिकला आणि त्याने त्या भाषेत बायबलचे भाषांतर केले.

या दोघा जर्मनांनी किनारपट्टीवर धर्मप्रसार सुरू केला. पण तेवढ्यावर त्यांचे समाधान होण्यासारखे नव्हते. आफ्रिकेच्या अंतर्भागात शिरून धर्मप्रसार कसा करायचा याच्या योजना ते आखायला लागले. अंतर्भागातून अरबांचे तांडे अनोख्या जातींच्या लोकांना गुलाम म्हणून पकडून आणताना त्यांना दिसत असत. आफ्रिकेच्या अंतर्भागात समुद्राएवढ्या विस्ताराची सरोवरे आणि उत्तुंग पर्वतश्रेणी आहेत, अशा अफवा त्यांच्या कानावर येत असत. क्राफला असे वाटत होते की, मोंबासाहून उत्तर पश्चिम दिशेला निघाले तर त्याला इथोपियामध्ये भेटलेले गाला जमातीचे लोक भेटतील.

पण अंतर्भागात प्रवेश करणे सोपे नव्हते. झांजिबारच्या समोरच्या किनाऱ्यावर बगमायो हे ठाणे होते. आफ्रिकेच्या अंतर्भागातून गुलाम घेऊन यायचा रस्ता तेथेच संपत असे. या ठिकाणीच गुलामांना शिडाच्या जहाजात बसवून अरबस्तानाकडे नेले जाई. डोळ्यांतून अश्रुपात करत जहाजात बसलेले गुलाम आफ्रिकेचा शेवटचा निरोप येथूनच घेत. बगमायो या शब्दाचा अर्थ 'अश्रुभूमी' असाच आहे. या ठाण्यापासूनच १८४५ मध्ये मैझान नावाचा तरुण फ्रेंच गृहस्थ आफ्रिका खंड पूर्वेकडून पश्चिमेकडे ओलांडण्यासाठी निघाला होता. किनाऱ्यापासून १५० किलो-

५८९.४ २२००७

मीटर अंतर न जातो तोच आदिवासी जमातींनी त्याचा खून केला.

१८४७ मध्ये क्राफ आणि रेबमान यांनी सध्या जेथे केनिया व टांझानिया आहे त्या प्रदेशात संशोधन सुरू केले. गुलाम पकडणाऱ्या अरब व्यापाऱ्यांनी त्यांना अनेकदा विरोध केला. आपल्या व्यापारी मार्गात हे मिशनरी ढवळाढवळ करतील असे त्यांना वाटत असे. त्या दोघांनी आपल्या प्रवासाचा वृत्तान्त तपशीलवार लिहून ठेवला, आणि चेग्गा जमातीत धर्मप्रसार केला. तिसरा एक जर्मन जेकब अेरहार्ड याने अरब व्यापाऱ्यांशी गोडी करून बरीच माहिती गोळा केली. अहंमद बीन इब्राहिम हा व्यापारी १८४० च्या सुमारास व्हिक्टोरिया सरोवराच्या काठावरील युगांडा राज्यापर्यंत जाऊन आला होता.

आपल्या भ्रमंतीत एप्रिल १८४८ मध्ये रेबमानला क्षितिजावर पांढरा ढग दिसला. वस्तुतः तो पांढरा ढग नसून किलिमांजारो पर्वताचे ते बर्फाच्छादित शिखर होते, हे त्याला लवकर समजले. आपला शोध जगाला कळवायला तो तातडीने मोंबासाला परतला. रेबमानने मग या प्रदेशाकडे दुसरी सफर काढली. तेथील जमातीत देवऋषाने क्राफचा सन्मान करण्यासाठी त्यांच्या अंगावर ताजे रक्त शिंपडले! कितुई खेड्याजवळ त्याला माहिती मिळाली की, उत्तरेकडे आणखी एक बर्फाच्छादित शिखर आहे. गावाबाहेर पडताच त्याला केनिया पर्वताच्या बर्फाच्छादित शिखराचे दर्शन झाले. त्याने या शोधाचे वृत्तान्त लंडनला पाठवले. परंतु लंडनमधील भूगोलशास्त्रज्ञांनी या वृत्तांताची थट्टा उडवली. या मिशनऱ्यांना बहुधा गारगोटीचे खडक दिसले असतील त्यालाच ते बर्फ म्हणत आहेत असे ते शास्त्रज्ञ म्हणू लागले! किंवा हे मिशनरी

एकटे व दूर राहिल्यामुळे भ्रमिष्ट झाले आहेत आणि त्यांना काही तरी भास होत आहेत असाही तर्क करण्यात आला. विषुववृत्तावर बर्फाच्छादित शिखरे असणे शक्यच नाही. असे त्या भूगोलशास्त्रज्ञांचे म्हणणे होते. पण किलिमांजारो पर्वताची उंची ५८८९ मीटर आणि केनिया पर्वताची उंची ५१९४ मीटर आहे हे जेव्हा पुढे समजले त्या वेळीच विषुववृत्ताच्या पर्वतावरही बर्फ असू शकते ही कल्पना मान्य झाली.

या मिशनऱ्यांचा सहकारी एरहॉर्ड याने पूर्व आफ्रिकेचा एक नकाशा तयार केला. अरबांच्याकडून जमवलेल्या माहितीवर तो आधारलेला होता. या नकाशात त्याने बारा अक्षांशापर्यंत पसरलेले एक प्रचंड सरोवर दाखवले होते. त्याने टांगानिका, न्यासा व व्हिक्टोरिया ही सरोवरे जोडून टाकली होती. या नकाशात त्याने सरोवराच्या काठावर उजीजी हे शहर दाखवले होते. आणि किनाऱ्यापासून या शहराला जोडणारा अरबांच्या तांड्याचा रस्ताही दाखवला होता. हा नकाशा लंडनच्या जिऑग्राफिकल सोसायटीच्या नियतकालिकात प्रसिद्ध झाला. त्या नकाशाने आफ्रिकेविषयी बरीच उत्सुकता निर्माण केली. त्यामुळे सोसायटी पूर्व आफ्रिकेत एक संशोधन मोहीम काढण्याविषयी विचार करू लागली.

आफ्रिकेच्या संशोधनाच्या इतिहासात डॉ. लिव्हिंग्स्टनचे नाव अजरामर झाले आहे. लहानपणी डेव्हिड लिव्हिंग्स्टन हा थंड, शांत व बावळट मुलगा होता. तो तोतरा बोलत असे. आणि वर्गात नेहमी अभ्यासात मागासलेला असे. पण त्याच्याजवळचा चिवटपणाचा गुण जबरदस्त होता. या गुणाच्या जोरावरच तो आफ्रिकेतील सर्वश्रेष्ठ संशोधक बनला. त्याचा चिवटपणा व

चिकाटी लहानपणापासूनच दिसून येत होती. दहाव्या वर्षी तो स्कॉटलंडमधील कपडयाच्या गिरणीत सकाळी सहापासून रात्री आठपर्यंत काम करीत असे आणि कामावरून आल्यानंतर रात्रीच्या शाळेत जात असे. लिव्हिंग्स्टनचे कुटुंब श्रद्धाळू व धार्मिक ख्रिश्चनांचे होते. वयाच्या पंचविसाव्या वर्षी लंडन मिशनरी सोसायटीच्या प्राथमिक अभ्यासक्रमात त्याला प्रवेश मिळाला. बोलण्याच्या तोतरेपणामुळे तो या धर्मोपदेशकांच्या परीक्षेत नापास झाला. पण त्याला वैद्यकीय अभ्यासक्रमाकडे प्रवेश मिळाला. तो त्याने पूर्ण केला आणि त्याची रवानगी परदेशी करण्याचे ठरविण्यात आले

लिव्हिंग्स्टनच्या मनात चीनला जायचे होते. पण तेथे युद्ध सुरू होते म्हणून लंडन मिशनरी सोसायटीने त्याला दक्षिण आफ्रिकेत पाठवायचे ठरवले. तो केपटाऊनला १८४१ मध्ये पोचला. त्यावेळी तेथे प्रख्यात ब्रिटीश मिशनरी डॉ, जॉन फिलिप होता. त्याचा लिव्हिंग्स्टनवर खूपच प्रभाव पडला. दक्षिण आफ्रिके-तील डच शेतकरी स्थानिक रहिवाश्यांना नीट वागवत नसत. गुलामही पाळत असत. डॉ. फिलिपने या विरुद्ध आवाज उठविला. त्याच्या प्रयत्नाला यश येऊन उदारमतवादाचा विजय झाला. लिव्हिंग्स्टन केपटाऊनला पोचण्यापूर्वी पाच वर्षांपूर्वी तीन हजार बोअर–डच शेतकरी मोर्चा काढून ऑरेंज नदीपलीकडे वस्ती करायला निघून गेले होते. तरीही गुलामांचा प्रश्न आणि हॉटेन्टाट जमातीचा प्रश्न यासबंधी वाद मिटलेला नव्हता.

केपटाऊनला पोचल्याबरोबरच लिव्हिंग्स्टनने या वादात भाग घेतला. वर्णभेदाच्या धोरणाचा व गुलामगिरीच्या चालीचा त्याने कठोर शब्दांत समाचार घेतला. त्याच्या कडवट भाषणांमुळे स्थानिक युरोपियन लोक खवळले. आपल्या प्रस्थापित हिताविरुद्ध बोलणाऱ्या लिव्हिंग्स्टनवर त्यांनी डूख धरला. अकरा वर्षानंतरही

आपल्या मोहिमेसाठी सामुग्री गोळा करायला तो केपटाऊनला आला असता जुने भांडण स्मरून युरोपियनांनी त्याला सामुग्री मिळू दिली नव्हती. सुरुवातीलाच अशी खळबळ निर्माण करून लिव्हिंग्स्टन आपल्या कुरूमान येथील मिशनरी केंद्राकडे रवाना झाला. हे केंद्र केपटाऊनच्या उत्तरेला ८०० किलोमीटर अंतरावर होते. तेथे तो काही वर्षे राहिला. नंतर त्याने आणखी उत्तरेकडे ४०० किलोमीटर अंतरावर कोलोबेंग येथे स्वतःचेच मिशनरी केंद्र काढले. या केंद्राच्या उत्तरेकडे कोणीही युरोपियन संशोधक गेलेला नव्हता. तेथून नजीकच कलहारी वाळवंट सुरू होत होते. वाळवंटापलीकडे कशा प्रकारची भूमी आहे याबद्दल लिव्हिंग्स्टन स्थानिक टोळीप्रमुख सेचेले याच्याकडे नेहमी चौकशी करीत असे.

लिव्हिंग्स्टन हा एकाकी भटकणारा संशोधक होता असा एक समज आहे. पण त्याच्या पहिल्या दोन मोहिमांमध्ये त्याची पत्नी व तीन मुले त्याच्याबरोबर होती. त्याची पत्नी मेरी लिव्हिंग्स्टन ही कुरूमान येथील मिशनरी डॉ. रॉबर्ट मोफाट यांची मुलगी होती. १८४९ मध्ये लिव्हिंग्स्टन नगामी सरोवर शोधण्यासाठी ऑस्वेल आणि मूरे या हत्तींची शिकार करणाऱ्या दोघांना घेऊन घोड्यावरून निघाला. तेव्हा त्याने आपल्या पत्नीला मिशनरी केंद्रातच मागे ठेवली. या मोहिमेत तो यशस्वी झाला आणि त्याला रॉयल जिऑग्राफिकल सोसायटीकडून पंचवीस गिनीचे बक्षीस मिळाले. या यशामुळे लिव्हिंग्स्टनला हुरूप आला आणि आपली पत्नी व मुले यांसह तो कोलोबेंग येथून ताबडतोब मोहिमेवर निघाला. काही आफ्रिकन मदतनीस त्याने बरोबर घेतले होते. वाळवंट ओलांडून ते पुन्हा नगामी सरोवराजवळ

पोचले. लिव्हिंग्स्टनची पत्नी गर्भवती होती. तेथे पोचल्यावर मुलांसकट सर्वांना मलेरिया झाला आणि लिव्हिंग्स्टनला कोलोबेंग येथे परतावे लागले. परतल्यावर त्याच्या पत्नीने एका अर्भकाला जन्म दिला पण ते लगेच गेले. पत्नीही बाळंतपणामुळे बरीच आजारी पडली.

एका वर्षानंतर लिव्हिंग्स्टन पुन्हा उत्तरेकडे निघाला. या वेळी त्याच्याबरोबर विल्यम ऑसवेल हा श्रीमंत शिकारी होता. मोहिमेला लागणारे सर्व सामान त्यानेच दिले होते. सासऱ्याचा विरोध असतानाही लिव्हिंग्स्टनने पत्नीला आणि मुलांना बरोबर घेतलेच.

त्याच्या जथ्याने आठशे किलोमीटर्स प्रवास तीन महिन्यांत केला. चोबे नदीच्या किनाऱ्यावर ते पोचले. तेथे मोकोलोलो जमातीचा प्रमुख सेबितुने याने त्यांचे स्वागत केले. तेथून लिव्हिंग्स्टन व ऑस्वेल अप्पर झांबेझी नदीच्या काठावर पोचले. विस्तीर्ण झांबेझी नदीचे ते दृश्य पाहून ते दोघे आश्चर्यचकित झाले. या ठिकाणाला भेट देणारा लिव्हिंग्स्टन हा पहिलाच युरोपियन होता. तो १८५१ चा ऑगस्ट महिना होता. लिव्हिंग्स्टनला आपल्या कुटुंबासह तेथेच राहायचे होते. पण ऑस्वेलने परतण्याबद्दल त्याचे मन वळविले. कोलोबेंगला येत असता रस्त्यातच मेरी लिव्हिंग्स्टन प्रसूत झाली. तिचे बाळंतपण घोडागाडीतच उरकले.

या प्रवासानंतर लिव्हिंग्स्टनने आपले कुटुंब इंग्लंडला परत पाठवले आणि तो आफ्रिका खंड ओलांडण्याची आपली योजना बनवू लागला.

सहा महिन्यांनंतर तो लुआंडा येथे पोचला. आणि तेथील ब्रिटिश राजदूत एडमंड गॅब्रियल याच्या घरी काही दिवस विश्रांती

घेतली. गॅब्रियलने त्याला समुद्रमार्गे इंग्लंडला परतायचा सल्ला दिला. पण तो त्याने मानला नाही. सप्टेंबर १८५४ मध्ये त्याने आफ्रिका खंड ओलांडण्याच्या प्रवासाला सुरुवात केली. या प्रवासाला त्याला दोन वर्षे लागली व अठ्ठेचाळीसशे किलोमीटर अंतर तो चालला. आफ्रिकेच्या अटलांटिक किनाऱ्यावरून तो निघाला आणि हिंदी महासागराच्या किनाऱ्यावर पोचला. वाटेत त्याने जगातला सर्वांत मोठा धबधबा शोधून काढला. या धबधब्याला त्याने राणी व्हिक्टोरियाचे नाव दिले. पंधरा वर्षांनंतर १८५६ मध्ये लिव्हिंग्स्टन इंग्लंडला परतला. त्या वेळी राष्ट्रीय वीर पुरुष म्हणून त्याचे सन्मानाने स्वागत करण्यात आले. झांबेझी नदीचे गूढ त्याने उकलले होते. 'मिशनरी ट्रॅव्हलर्स आणि रिसर्चेस इन साऊथ आफ्रिका' हे त्याचे पुस्तक १८५७ मध्ये प्रसिद्ध झाल्याबरोबर लोकप्रिय झाले. त्याचे लिखाण पारदर्शक व शैलीदार होते. त्याने आफ्रिकन लोकांच्या चालीरितींबद्दल सहानुभूतीने लिहिले, तर तेथील निसर्ग व वनस्पती यांच्या सूक्ष्म व तपशीलवार वर्णनामुळे शास्त्रज्ञांनी त्याची स्तुती केली. लंडन, एडिंबरो व ग्लासगो येथील नगरपालिकांनी त्याल मानपत्र दिले. भाषणे करण्यासाठी त्याला आमंत्रणे येऊ लागली. त्याच्या बोलण्यात अजूनही दोष होता. पण मनातील तळमळ व भावनांचा सच्चेपणा या जोरावर तो व्याख्यान ऐकणाऱ्या श्रोतृसमुदायाला भारून टाकत असे. केंब्रिजच्या भाषणात असेच घडले. भाषणाचा समारोप करताना तो म्हणाला, 'आफ्रिकेचा उद्धार करण्याचे ध्येय बाळगून मी माझे काम सुरू केले आहे. ते पुढे चालवावयाचे की नाही हे तुम्ही ठरवायचे आहे.'

लिव्हिंग्स्टनचा पेशा आता संशोधकाचा झाला होता व त्याचीच

त्याला आवड होती. तेव्हा त्याने लंडन मिशनरी सोसायटीचा राजिनामा दिला. पण त्या भागातले संशोधनाचे व धर्मप्रसाराचे काम चालू ठेवण्यासाठी लंडन मिशनरी सोसायटीने मोकोलोलो जमातीच्या प्रदेशात दोन प्रतिनिधी पाठवले. प्राईस व हेल्मोर हे दोघेजण तिकडे रवाना झाले. हेल्मोरने आपली पत्नी व चार मुले यांना बरोबर घेतले होते. तर प्राईसबरोबर त्याची एक पत्नी व एक मूल होते. १८५९ च्या शेवटी शेवटी ते झाम्बेझी नदीच्या खोऱ्यात पोचले. पण मोकोलोलो जमातीच्या लोकांनी त्यांचे थंडे स्वागत केले. काही आठवड्यांतच ते सर्वजण मलेरियाने आजारी पडले. या आजारपणामुळे हेल्मोर, त्याची पत्नी व दोन मूले आणि प्राईसची पत्नी, तिचे मूल हे सर्वजण दगावले. प्राईस हेल्मोरच्या वाचलेल्या दोन मुलांसह कुरूमानच्या मिशनरी केंद्रावर कसाबसा परतला.

यामुळे त्या प्रदेशातील मिशनऱ्यांचे कार्य थंडावले. लिव्हिंग्स्टन या मिशनऱ्यांना भेटायला व मदत करायला निघाला होता. पण तो कित्येक महिन्यांनी तेथे उशीरा पोचला. घडलेल्या दुर्घटने-मुळे लिव्हिंग्स्टन निराश झाला. विल्यम बाल्डविन् या एकाच संशोधकाची तो सुटका करू शकला. मोकोलोलो जमातीने या बाल्डविनला कैद केले होते. विल्यम बाल्डविन हा फार धाडसी संशोधक होता. कलहारी वाळवंटातून फक्त खिशातील होकायंत्र जवळ बाळगून त्याने प्रवास केला होता. व्हिक्टोरिया धबधब्याला भेट देणारा तो दुसरा युरोपियन होता.

लिव्हिंग्स्टन आफ्रिकेत १८५८ मध्ये जेव्हा परतला तेव्हा त्याच्या नेतृत्वाखाली एक मोठी मोहीम नेण्यात आली होती. मोहिमेबरोबर बरीच साधनसामुग्री होती. आणि बरेच मिशनरी व शास्त्रज्ञ या मोहिमेत सामील झाले होते. झाम्बेझी खोऱ्याचे

संशोधन करण्यासाठी ब्रिटिश सरकारने पाच हजार पौंडांचे अनुदान दिले होते. झाम्बेझीच्या खोऱ्यात वसाहतीला किंवा व्यापाराला किती वाव आहे याबद्दल मोहिमेतील लोकांनी अहवाल सादर करावयाचा होता. लिव्हिंगस्टनला राजदूताचा दर्जा देण्यात आला आणि प्रयाणापूर्वी त्याने व्हिक्टोरिया राणीची भेट घेतली. परराष्ट्रमंत्री लॉर्ड क्लॅरेन्डन याने आश्वासन दिले की पोर्तुगीज त्रास देणार नाहीत याविषयी व्यवस्था केली आहे. कारण झाम्बेझी नदीच्या प्रदेशात पोर्तुगीज साडेतीनशे वर्षांपासून वावरत होते.

लिव्हिंगस्टनची ही दुसरी सफर पहिल्या सफरीच्या मानाने यशस्वी झाली नाही. झाम्बेझी नदीत नौकानयन करण्यासाठी त्याने 'रॉबर्ट' ही वाफेवर चालणारी बोट सुटे भाग करून घेतली होती. नदीजवळ गेल्यावर ती जोडून चालवायची होती. पण त्या बोटीचा फारसा उपयोग झाला नाही. सर्वांत मोठी अडचण झाम्बेझी नदीमधील कबोराबासा या उताराच्या खडकाळ प्रदेशामुळे झाली. लिव्हिंगस्टनच्या मागच्या प्रवासात त्याला हा नदीचा अवखळ उतार दिसला नव्हता. या अवखळ उतारावरून आगबोट किंवा जहाज चालविणे शक्य नव्हते याचा अर्थ व्हिक्टोरिया धबधब्यापर्यंत आगबोटीत बसून जाता येणे शक्य नव्हते. या अनपेक्षित अडचणीमुळे लिव्हिंगस्टन निराश झाला. चार वर्षांच्या या सफरीत आपल्या सहकाऱ्यांबरोबर लिव्हिंगस्टनचे अनेकदा मतभेद झाले व भांडणे झाली. त्याचा भाऊ चार्लस आणि चित्रकार थॉमस बेनेस हेही त्याच्या विरुद्ध गेले. बिशप मॅकेन्झीसारखे अनेक चांगले सहकारी मलेरिया होऊन मृत्यू पावले १८६२ मध्ये लिव्हिंगस्टनची पत्नी मेरी मोहिमेत सामील झाली पण तीनच आठवड्यांत ती मृत्यूमुखी पडली. हा फटका

लिव्हिंग्स्टनला सोसला नाही. त्याने लिहिले आहे, 'माझ्या दुःखाला पार नव्हता. आयुष्यात प्रथमच माझ्या मनात निराशा दाटून आली. मला मृत्यू हवासा वाटू लागला.'

तरीही न्यासा सरोवराभोवती प्रवास करताना त्याला असे वाटले की, 'हे सर्व हाल व कष्ट आफ्रिकन माणसाच्या मुक्ततेसाठी सोसणे आवश्यक आहे.' या भागामध्ये गुलामांचा व्यापार एवढ्या मोठ्या प्रमाणात चालू होता की बाहेरच्या जगाला त्याची कल्पनाच करता आली नसती. मोहिमेतील लोकांना ठिकठिकाणी पराकाष्ठेची क्रूरता पाहावयास मिळाली. अनेकदा त्यांच्या बोटीला प्रेतांचा गराडा पडलेला असे. गुलाम म्हणून पकडलेल्या स्त्रियांची अर्भके दगडावर डोकी आपटून ठार केली जात असत. दोन जमातींमध्ये युद्ध झाले की विजयी पक्ष शत्रूपक्षाची सरसहा कत्तल करत असे व तिथे लोकवस्ती मुळीच उरत नसे. दक्षिणेकडच्या नगोनी जमातीच्या योध्द्यांनी उत्तरेकडे आक्रमण करून खूपच दहशत निर्माण केली होती. लिव्हिंग्स्टनने आज्ञा दिली की, गुलाम पकडून नेणारा एखादा तांडा आढळल्यास त्यांना थांबवावे आणि गुलामांना मुक्त करावे. या धोरणामुळे पोर्तुगीजांचा जळफळाट झाला. संशोधन मोहिमेच्या बुरख्याखाली आमच्या हक्काच्या प्रदेशावर हे आक्रमणच आहे असे त्यांना वाटले त्यांनी ब्रिटिश सरकारकडे तक्रार केली तेव्हा सरकारने ती मोहीम १८६२ मध्ये परत बोलावली.

झाम्बेझी नदीच्या खोऱ्यातील संशोधनात लिव्हिंग्स्टनने अनेकदा पोर्तुगीजांची मदत घेतली होती. अनेक पोर्तुगीज अधिकारी त्याचे निकटचे मित्र झाले होते. लुआंडा येथे तो पोर्तुगीजांच्या वसाहतीतच राहिला होता. मोझाबिक येथे टेटे व सेना येथेही पोर्तुगीजांनी त्याचे स्वागत केले होते व मदत केली होती.

पण लिव्हिंग्स्टनच्या या मोठ्या प्रमाणावरील मोहिमेमुळे पोर्तुगीज साशंक बनले. ब्रिटिश मोहिमेचा हेतू काही निराळाच आहे असे त्यांना वाटू लागले. कोलंबसाच्या काळापासून पोर्तुगीजांनी अंगोला व मोझांबिक यामधील सर्व प्रदेशावर हक्क सांगितला होता. त्याला आता बाध येईल असे त्यांना वाटू लागले.

काही वर्षांपूर्वीच या प्रदेशावरच्या हक्काचे स्मरण पोर्तुगीजांनाही नव्हते. या रानटी व निरुपयोगी मुलखातून मिळण्यासारखे काय होते ? ब्रिटिशांच्या मोहिमेमुळे ते जागे झाले इतकेच. एकोणीसाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास आफ्रिकेच्या या भागात उगीचच पैसा खर्च करायला व रानटी लोकांनी भरलेली जंगले ताब्यात घ्यायला ब्रिटिश सरकार तयार नव्हते. आफ्रिकन लोकांचा उद्धार व गुलामगिरीविरुद्धची चळवळ या उदारमतवादी लोकांच्या प्रचारामुळे संशोधनाला चालना मिळाली व सरकारने थोडाफार खर्च केला.

या सगळ्या जागृतीमुळे पोर्तुगीज सरकारने थोडी हालचाल केली. लुआंडापासून अंतर्भागात त्यांनी किल्ले बांधले व काही संशोधन मोहिमाही पाठविल्या. मैग्यार लॉझलो हा हंगेरियन संशोधक अप्पर झाम्बेझीपर्यंत १८५० मध्येच गेला होता. सिल्व्हा पोर्टो हा मिश्रवंशाचा संशोधक १८५३ मध्ये व्हिक्टोरिया धबधब्याच्या पश्चिमेकडे संशोधन करत होता. तेथे लिव्हिंग्स्टनची व त्याची भेट झाली होती. मोकोलोलो जमातीशी त्याने संबंध जोडले होते. पोर्टोने आफ्रिका खंड ओलांडण्याचा प्रयत्न केला होता. पण तो मधूनच परत फिरला. मात्र त्याने आपल्या अनेक नोकरांना पुढे पाठवले आणि ते कांगो व झाम्बेझी यांना विभागणाऱ्या जलरेषेवरून प्रवास करत टेटे येथे पोचले. दोन दशकानंतर

सेर्पा पिंटो या लष्करी अधिकाऱ्याने आफ्रिका खंड पायी ओलांडले. याच वेळी त्याने न्यासा सरोवराजवळ एक मोहिमही काढली होती. पण पोर्तुगीजांचे हे प्रयत्न फारच उशीरा सुरू झाले आणि ते फारच तुरळक होते. मोझांबिक आणि अंगोला या पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावरच्या पोर्तुगीज वसाहतीमध्ये १६०० किलो मीटरचे अंतर होते. या मधल्या प्रदेशात नजीकच्या भविष्य-काळात इंग्रजच आपले वर्चस्व प्रस्थापित करणार होते. इंग्रजांनी हा मधला प्रदेश बळकाविल्याची बातमी ऐकून म्हातारा सिल्व्हा पोर्टो इतका निराश झाला की, त्याने स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली. परंतु सन १५५० मध्ये आफ्रिका खंडात गेलेल्या पहिल्या ब्रिटिश जहाजांना अन्टोनिओ पिन्टाडो या पोर्तुगीज कप्तानानेच मार्गदर्शन केले होते. पोर्तुगीजांचा दैवदुर्विलास हा असा होता.

ब्रिटिश सरकारची मोहीम संपली होती. लिव्हिंग्स्टनला आता इंग्लंडला परतणे भाग होते. पण त्यापूर्वी त्याने सध्याच्या मालावी राज्याच्या न्यासा सरोवराभोवती एक प्रदक्षिणा घातली. नंतर तो मोझांबिक येथे येऊन एका लहानशा स्टीमलाँचमध्ये बसला. ती स्टीमलाँच गुलामांच्या व्यापाऱ्यांच्या हातात पडू नये म्हणून तो थोड्या लोकांसह त्यातूनच चारहजार किलोमीटरचा प्रवास करून मुंबईला आला आणि तेथून लंडनला परतला. त्याने पोर्तु-गीजांशी ज्या कटकटी निर्माण केल्या होत्या, त्यामुळे ब्रिटिश सरकार त्याच्यावर नाराज झाले होते. पण इंग्लंडमधील जनता मात्र त्याच्या धाडसावर खूष होती.

परतल्यावर लिव्हिंग्स्टनने बाथ येथे ब्रिटिश ॲसोसिएशन पुढे गुलामांच्या मुक्ततेबद्दल हृदयस्पर्शी भाषण केले. 'गुलामगिरी ही जगाला झालेली वाहती जखम आहे' असे तो म्हणाला.

लिव्हिंग्स्टनच्या चळवळीमुळे इंग्रजी आरमाराने पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावर गुलामांचा व्यापार बंद पाडण्यासाठी गस्त घालावी अशी जनतेकडून मागणी होऊ लागली. आपले दुसरे पुस्तक लिहिण्यासाठी लिव्हिंग्स्टनने आठ महिने घालविले. त्या पुस्तकाचे नाव होते ' झाम्बेझी व तिच्या उपनद्या यांच्या संशोधन मोहिमेचे शब्दचित्र ' पूर्वी आफ्रिकेच्या मोहिमेत मिशनऱ्यांची खूप प्राणहानी झाली होती तरी पुन्हा मिशनरी पाठवणे आवश्यक आहे. असे जनमत तयार होऊ लागले.

लिव्हिंग्स्टनच्या दुसऱ्या पुस्तकामुळे त्याच्या स्कॉटिश देशभक्त मित्रांना स्फुरण मिळाले. न्यासा सरोवराभोवती ख्रिश्चन धर्मप्रसाराची मोठी मोहीम काढण्याची योजना तयार होऊ लागली. त्यांच्या या कामाचा परिणाम दीर्घकाळ टिकला. सध्याच्या मालावी राष्ट्राचा अध्यक्ष डॉ. हेस्टिंग्ज बांडा हा स्कॉटलंड चर्चचा निष्ठावंत अनुयायी आहे. पण आपला ठसा मध्य आफ्रिकेवर उमटविण्यासाठी स्कॉटलंडच्या चर्चला मोठा त्याग करावा लागला. लिव्हिंग्स्टनचे कित्येक अनुयायी ख्रिश्चन धर्मप्रसाराच्या या कामात वाईट हवेमुळे आजारी पडून मेले किंवा मारले गेले.

लिव्हिंग्स्टनने आता मनाचा दृढनिश्चय केला. त्याचे मन आफ्रिकेतच रेंगाळत होते. आफ्रिकेतील आदिवासी जमातींनी त्याच्या मनाशी प्रेमाचा अतूट धागा जोडला होता. नियतीने लिव्हिंग्स्टनला आफ्रिकेसाठीच जन्माला घातला होता. पण हा नुसता भावनात्मक संबंध नव्हता. आफ्रिकन जनतेच्या उद्धाराचे ध्येय त्यांनी सतत मनाशी बाळगले होते. तो कोलोबेंग येथे होता, तेव्हा १८५२ मध्येच डच शेतकऱ्यांच्या एका तुकडीने त्याच्या मिशनरी केंद्रावर हल्ला करून ते उद्ध्वस्त केले होते. लिव्हिंग्स्टन

स्थानिक आदिवासींना त्याचे हक्क शिकवतो म्हणून त्यांना राग आला होता. आफ्रिकन जमातीचे प्रेम त्याने किती संपादन केले होते याचे एक उदाहरण सांगता येईल. १८५६ मध्ये त्याने झाम्बेझी नदीच्या काठी मोकोलोलो जमातीच्या हमालांना निरोप दिला व दोन वर्षांनी पुन्हा त्याच जागी भेटायला सांगितले. सन १८५८ मध्ये ते सर्व आदिवासी लोक बरोबर त्याच जागी लिव्हिंग्स्टनचे स्वागत करायला हजर होते. तो एकदा म्हणाला होता, 'आफ्रिकन लोक काळे आहेत म्हणून त्यांच्या विकासा-करीता मी धडपडतो असे नाही. तर त्यांची परिस्थिती सुधार-ण्याची सर्वांत जास्त जरूर आहे म्हणून मी हे काम आंगिकारले आहे. आफ्रिकाखंड अस्तित्वात नसते तर लंडनमधील गरीब लोकांसाठी मी माझे आयुष्य खर्च केले असते.'

लिव्हिंग्स्टनला आफ्रिकेची हाक सतत ऐकू येत होती. म्हणून सन १८६४ मध्ये आफ्रिकेमध्ये पुन्हा एकदा एक संशोधन मोहीम काढण्याचे विचार त्याच्या मनात येऊ लागले.

□

करण आठवे

## नाईलचे गूढ व स्टॅनलेचे प्रवास

सन १८५५ पर्यंत पश्चिम आफ्रिकेतील व झांबेझी नदीच्या खोऱ्यातील खूपच संशोधन पूर्ण झाले होते. आता मध्य आफ्रिकेकडे संशोधकांचे लक्ष वळले. विषुववृत्ताच्या अलीकडे पलीकडे हजार ते सोळाशे किलोमीटरचा पट्टा असंशोधित राहिला होता. येथूनच शुभ्र नाईल नदीचा उगम होत होता आणि त्या उगमाचे गूढ उकलले नव्हते. एरहार्ड या मिशनऱ्याने १८५३ मध्ये जो नकाशा तयार केला होता, त्याकडे आता संशोधकाचे लक्ष गेले. त्या नकाशात आफ्रिकेच्या मध्यभागी एखादा समुद्र असावा असे मोठे सरोवर दाखवले होते. अरब व्यापाऱ्यांनी पुरविलेल्या माहितीनुसार हा नकाशा तयार केला असल्यामुळे त्यात अविश्वासार्ह अशा बऱ्याच गोष्टी होत्या. पण प्रचंड सरोवराविषयी प्राचीन काळापासून दंतकथा ऐकू येत असल्यामुळे त्यानुसार संशोधन करावे असे लोकांना वाटू लागले.


मध्य आफ्रिकेमध्ये आतवर घुसणारे पहिले दोन संशोधक म्हणजे रिचर्ड बर्टन आणि जॉन स्पेक. सन १८५७ मध्ये त्यांनी हा प्रवास केला. ते दोघेही लष्करी अधिकारी होते आणि धाडसी होते. बर्टनने दरवेशाचा वेष करून मक्केची यात्रा केली होती.



व्हिक्टोरिया सरोवराचा शोध लावणारा
जॉन स्पेक

स्पेकने हिमालयात गिर्यारोहण केले होते. त्या दोघांनी इथोपियातील एकत्र प्रवासात अनेक संकटांना तोंड दिले होते व ते मरता मरता वाचले होते. त्या दोघांनी १५० हमाल गोळा केले. आणि बगमायो येथून ते अरब व्यापाऱ्यांच्या मार्गाने ताबोरा येथे जायला निघाले. त्या प्रवासात ते दोघेजण आजारी पडले.कानात शिरलेला किडा चाकूने काढण्याच्या प्रयत्नात स्पेक एका कानाने बहिरा झाला. शिवाय त्याला तापामुळे तात्पुरते आंधळेपण आले होते. तरी पण शेवटी ते टांगानिका सरोवराजवळ पोचले. तेथे पोचणारे ते पहिले युरोपियन होते. बर्टनने लिहिले आहे, 'तेथील शेतजमीन, खेडी, सरोवराच्या पाण्यावर फिरणाऱ्या कोळ्यांच्या होड्या हे सर्व पाहून मन तृप्त झाले. किनाऱ्यावर वाऱ्याबरोबर लाटा येऊन फुटत आणि त्यांचा नित्य होणारा आवाज मन प्रसन्न करीत असे. त्या सुंदर देखाव्यामुळे आम्ही आमच्या पुढचे धोके विसरलो. श्रमाचा परिहार झाला परतीचा प्रवास शक्य होईल की नाही याची शंका असतानाही मन शांत झाले. आणि आजवरच्या हालअपेष्टा सहन केल्या त्या पुन्हा सहन करू असे वाटू लागले.'

किनाऱ्याकडे परतताना स्पेकने उत्तरेकडे एक मोहीम काढली. आणि तो त्या प्रचंड सरोवराच्या दक्षिण टोकाजवळ पोचला.





**बर्टन आणि स्पेकची १८५६–५७ मधील मोहीम.**

**स्पेकने व्हिक्टोरिया सरोवर शोधले.**

त्याने त्या सरोवराला राणी व्हिक्टोरियाचे नाव दिले. नाईल नदीचा हाच उगम असल्याबद्दल स्पेकची खात्री पटली. पण बर्टनने त्यावर विश्वास ठेवला नाही आणि त्यांचे कडाक्याचे भांडण झाले.

टांगानिका सरोवराचा शोध लावल्याबद्दल सर्व श्रेय जॉन स्पेकला मिळाले. आणि रॉयल जिऑग्राफिकल सोसायटीने १८६० मध्ये स्पेकला पुन्हा एका संशोधन मोहिमेवर पाठवायचे ठरविले. बर्टनला निमंत्रण दिले नाही. जेम्स ग्रॅन्ट हा दुसराच एक लष्करी अधिकारी स्पेकचा सहकारी म्हणून गेला. अंतर्भागातील प्रवास

पुन्हा एकदा कष्टमय ठरला. गुलाम पकडणाऱ्या व्यापाऱ्यांनी फार त्रास दिला. पण ते व्हिक्टोरिया सरोवराच्या पश्चिमेकडे गेले, तेव्हा त्यांना आश्चर्यकारक बदल जाणवला. तेथे दाट लोकसंख्या होती आणि रुंद रस्ते होते. खेडी नीटनेटकी होती. हे ब्युंगाडाचे राज्य होते. त्यांचा मुटेसा नावाचा राजा होता. ग्रॅन्ट आजारी असल्यामुळे स्पेक एकटाच त्याला भेटायला गेला. दरबारातील लोकांनी झाडांच्या सालीपासून केलेली वस्त्रे नेसली होती व हरणांचे कातडे पांघरले होते. त्यांची वस्त्रे चांगली शिवलेली होती. मुटेसाने स्पेकचे चांगले स्वागत केलें; अगदी सुसंस्कृत लोकांसारखे. पण भर दरबारात चालत असलेला नरमेध पाहून स्पेक हादरला.





**स्पेकचा दुसरा प्रवास**

त्यानंतर स्पेकने व आजारी ग्रॅन्टने व्हिक्टोरिया सरोवराभोवती संशोधन केले. सरोवरातून नाईल जेथे बाहेर पडते तो धबधबा त्यांनी शोधून काढला आणि त्या धबधब्याला रिपनचे नाव दिले. परतीचा प्रवास त्यांनी उत्तरेकडून करायचा ठरविले. उत्तरेकडच्या प्रवासात त्यांचे फार हाल झाले. अनेकदा उपासमार झाली व दोघांच्या कपड्यांची दशा झाली. शेवटी कसेबसे ते खार्टूमला पोहचले आणि तेथून नाईल नदीतून प्रवास करून त्यांनी कैरो गाठले. या सर्व प्रवासाला त्यांना अडीच वर्षे लागली.

स्पेकचे व बर्टनचे पूर्वीपासूनच भांडण होतेच व तो मोहिमेत न नेल्यामुळे चिडला होता. बर्टनने स्पेकला नाईल नदीच्या उगमाचा वाद करण्यासाठी आव्हान दिले व एकाच व्यासपीठावर सभा ठरविली. स्पेकचे म्हणणे जरी बरोबर होते तरी त्याच्याजवळ पुरेसा पुरावा नव्हता. आणि त्याला जाहीर वक्तव्य करावयाचा सराव नव्हता. सभा भरली. व्यासपीठावर बर्टन स्पेक येण्याची वाट पाहात होता. इतक्यात बातमी आली की स्पेकला स्वतःच्याच बंदुकीची गोळी लागून तो मृत्यू पावला आहे. ही आत्महत्त्या होती की अपघात हे शेवटपर्यंत गूढच राहिले.

स्पेक आणि ग्रँट खार्टूमकडे उत्तरेकडचा प्रवास करीत असताना त्यांना त्या भागात शिकारीकरता आलेला सॅम्युअल बेकर हा श्रीमंत इंग्रज भेटला. तो आपल्या हंगेरियन पत्नीसह आला होता. त्यांची ही भेट नाईल नदीच्या काठी गोंडोकोरो येथे झाली. गोंडोकोरो हे ठिकाण युरोपियनांना बरीच वर्षे माहीत झाले होते. ऑस्ट्रियन मिशनऱ्यांनी सन १८५१ मध्ये तेथे चर्च बांधले होते. पण दहा मिशनऱ्यांपैकी आठ मिशनरी मलेरियाने मृत्यू पावल्याने लवकरच त्यांना हे केंद्र सोडून द्यावे लागले होते.

मियानी हा व्हेनिसचा रहिवासी १८६१ मध्ये नाईलच्या उगमाच्या शोधात गोंडोकोरो येथे पोचला होता. स्पेक आणि ग्रॅन्डचा शोध घेण्यासाठी जॉन पेथ्रिक हाही गोंडोकोरो येथे आलेला होता. याशिवाय दोन श्रीमंत डच स्त्रिया मोठाच लवाजमा घेऊन गोंडोकोरो येथे आल्या होत्या. ॲड्रीयाना व्हॉन कॅपलेन आणि तिची बहीण मॅडम 'तिने' व तिची मुलगी अलेक्झांड्राईन या तीन स्त्रिया, दोनशे नोकर व दोन जर्मन शास्त्रज्ञ बरोबर घेऊन गोंडोकोरो येथे आलेल्या होता. या तिन्ही स्त्रिया मलेरिया लागून मृत्यू पावल्या.



बेकर पती-पत्नी

बेकर व त्याची पत्नी यांनी गोंडोकोरोच्या दक्षिणेला जायचे धाडस दाखवले. या प्रदेशातूनच राने तुडवीत स्पेक आणि ग्रॅन्ट आले होते. स्पेकने व्हिक्टोरिया सरोवराच्या उत्तर पश्चिमेकडे आणखी एक प्रचंड सरोवर सापडण्याची शक्यता बोलून दाखवली होती. स्पेकने दिलेल्या नकाशाच्या अनुरोधाने बेकर पति-पत्नींनी

ते सरोवर शोधून काढण्याचे ठरवले. या प्रवासाला त्यांना एक वर्ष लागले. एकदा प्रवासात उष्माघात झाल्यामुळे सौ. बेकर एक आठवडा बेशुद्ध होती. दुसऱ्या एका प्रसंगी टोळीप्रमुखाने सौ. बेकरला आपल्या जनानखान्यासाठी मागितले! गुलाम पकडणाऱ्या अरबानी त्यांना अनेकदा ठार मारण्याची धमकी दिली. अशा सगळ्या संकटांतून पार पडून बेकर पति-पत्नी त्या अज्ञात सरोवराच्या किनाऱ्यावर पोचले. त्यांनी त्या सरोवराला प्रिन्स अलबर्टचे नाव दिले. त्या सरोवरात बेकरने होड्या घातल्या आणि फेरी मारून सिद्ध केले की नाईल नदी या सरोवरात वाहात येते आणि मर्चिसन धबधबा येथे बाहेर पडते. हा धबधबा अलीकडच्या काळात हौशी प्रवासांच्या भेटीचे ठिकाण झाले आहे.

अशा तऱ्हेने दोन वर्ष रानावनात भटकल्यानंतर बेकर पति-पत्नी खार्टूमला सुखरूप परत आली आणि तेथून इंग्लंडला परतली १८६९ मध्ये सॅम्युअल बेकरला उमराव करण्यात आले. त्यानंतर तो इजिप्तच्या खेदिवाकडे नोकरीस राहिला. सुदानचा गव्हर्नर जनरल म्हणून त्याने चार वर्षं कारभार पाहिला.

लँडर बंधूनी अगदी तरुण वयात आफ्रिकेत संशोधन केले होते, हे आपण मागे पाहिलेच. जोसेफ थॉम्सन यानेही त्यांच्याच प्रमाणे तरुण वयातच जबाबदारीने संशोधन केले. तो स्कॉटलंडमधील भूगर्भ शास्त्रज्ञ होता. रॉयल जिऑग्रफिकल सोसायटीने सन १८७९ मध्ये जी संशोधन मोहीम काढली होती, त्यात तो सामील झाला होता. त्या वेळी त्याचे वय वीस वर्षांचे होते. त्यांच्या पथकांचा नेता केथ जॉन्स्टन होता. मोहिमेच्या सुरुवातीलाच तो मृत्यू पावला. त्यामुळे मोहिमेचे नेतृत्व जोसेफ थॉम्सनकडे आले. त्याने मालावी सरोवराकडे मोहीम नेली आणि तेथून ते टांगानिका सरोवराच्या पूर्व किनाऱ्याला आले. तेथे संशोधन करून व यश

मिळवून ते परतले. तीन वर्षांनंतर त्याला पुन्हा पूर्व आफ्रिकेतील नव्या मोहिमेवर पाठविण्यात आले. या वेळी त्याला हिन्दी महासागराच्या किनाऱ्यावरून व्हिक्टोरिया सरोवराच्या उत्तर-पश्चिमेला असलेल्या युगांडा प्रदेशाकडे जाणारा सरळ रस्ता शोधायला सांगितले होते. त्या पूर्वी संशोधक प्रथम दक्षिणेच्या उजीजी या गावी जात असत आणि तेथून उत्तरेकडे वळून व्हिक्टोरिया सरोवराजवळ येत असत. कारण हिंदी महासागराच्या किनाऱ्यावरून सरळ पश्चिमेकडे गेल्यास मसाई जमातीचा प्रदेश लागतो. ही मसाई जमात फार क्रूर होती आणि त्यांनी कत्तली करून पूर्व आफ्रिकेचा हा प्रदेश उजाड करून टाकला होता.

थॉम्सनला मसाई प्रदेशातील धोक्याची कल्पना होती. पण तो घाबरला नाही. मोंबासापासून सरळ पश्चिमेकडे त्याने प्रवास सुरू केला. आत शिरताच मसाई जमातीने त्याच्यावर हल्ला केला. त्याचे हमाल पळून गेले. आणि तो मृत्यूसंकटात सापडला. त्यामुळे त्याला माघार घ्यावी लागली. त्याने पुन्हा एकदा मोहिमेची तयारी केली आणि तो निघाला. या दुसऱ्या प्रयत्नात मात्र तो हा प्रदेश ओलांडून जाऊन पलीकडे जाऊ शकला. कारण मसाई योद्धे हल्ला करावयाला दुसरीकडे निघून गेले होते. किकियुच्या जंगलात विष माखलेल्या बाणांनी त्याच्यावर हल्ला झाला व त्याला लुटले. तरीही तो पुढे जात राहिला. केनिया पर्वताजवळ तो गेला आणि थोड्या भागात त्याने पर्वतारोहण करून पाहिले. केनिया पर्वत क्रॉफ या मिशनऱ्याने तीस वर्षांपूर्वी पाहिला होता. पण त्या वेळी त्याची टिंगल झाली होती. थॉम्सनने रिफ्ट खोऱ्यातून प्रवास केला. आणि जाता जाता नकुरू, बारिंगो वगैरे सरोवरे शोधून काढली आणि शेवटी तो युगांडाला पोचला. त्याने लिहिलेले शास्त्रीय अहवाल फार महत्त्वाचे ठरले. आपल्या चित्तथरारक प्रवासाचे वर्णन करणारे पुस्तक त्याने लिहिले. त्या

पुस्तकाचे नाव ‘थ्रु मसाई लॅन्ड.’ ते प्रसिद्ध होताच तुफान खपले व लोकप्रिय झाले.

थॉम्सन नुसताच संशोधक नव्हता तर शैलीदार लेखकही होता. एका विस्तीर्ण मैदानाचे वर्णन त्यांने किती सुरेख केले आहे ते पाहा, ‘या ठिकाणी रानटी जनावरांचे कळप हजारोंच्या संख्येने चरत आहेत. ही जनावरे दिसतात हिंस्त्र, पण ती निरुपद्रवी आहेत. कळपातील काहीजण चारा खाऊन तृप्त झाल्यानंतर शेपटया उडवत सैरावैरा धावत आहेत. त्यांच्या या नैसर्गिक हालचाली किती रम्य वाटतात! या सगळ्या जनावरांत आपल्या पट्टेदार कातडीमुळे झेब्रा उठून दिसतो. काही जनावरे शांतपणे खाली माना घालून चरत आहेत. तर काही अवखळ पोरं खोटी लढाई केल्याचे दाखवून खूर उधळत चौफेर उधळत आहेत.’

थॉम्सनच्या प्रवासामुळे युगांडाकडे जाण्याचा नवीन मार्ग तयार झाला. थॉम्सन ज्या मार्गाने गेला त्याच मार्गाने पुढच्या दहा वर्षांतच पूर्व आफ्रिकेतील पहिला रेल्वेमार्ग बांधण्यात आला. थॉम्सनची स्मृती म्हणून एका धबधब्याला त्याचे नाव देण्यात आले आहे. आणि हरणांच्या एका जातीला थॉम्सन हरणे असे म्हणण्यात येते.

बाकीचे संशोधक ज्या काळात व्हिक्टोरिया सरोवराच्या आसपास संशोधन करत होते, त्या वेळीच डेव्हिड लिव्हिंग्स्टन आपल्या आयुष्यातील सर्वांत मोठ्या प्रवासाची तयारी करत होता. त्याचा हा प्रवास सात वर्षं चालणार होता. आणि त्यांच्या मृत्युनेच या प्रवासाची समाप्ती होणार होती! आपला मृत्यू अफ्रिकेतच होणार आहे हे जणू काही त्याला समजले होते! त्यांच्या अहवालात आणि पत्रात त्याने अनेकदा मृत्यूचे उल्लेख केले आहेत.

त्याने आपला हा आफ्रिकेतील प्रवास हिंदुस्थानमार्गे सुरू केला. म्हणजे तो प्रथम इंग्लंडहून मुंबईला गेला. तेथून झांजिबारला आला.

आणि झांजिबारहून रोवूमा नदीच्या मुखाजवळ तो उतरला. या वेळचा त्याचा जथा वैचित्र्यपूर्ण होता. त्याच्या जथ्यात सहा उंट, चार हिंदुस्थानातल्या म्हशी, दोन खेचरे, आणि चार गाढवे होती. शिवाय तेरा हिंदुस्थानी सैनिक व मुंबई येथे मिशनऱ्यांनी मुक्त केलेले अनेक माजी गुलाम होते. काही हमाल झांजिबारला भरती केलेले होते. आफ्रिकेतील आजारपणाला जनावरे दाद देणार नाहीत, अशा विश्वासाने ती घेतली होती. पण ती आजारपणाला टिकतात की नाही. याची चाचणी होण्यापूर्वीच सैनिकांनी जनावरांना इतक्या क्रूरपणे वागवले की ती सुरुवातीलाच मरून गेली! लिव्हिंग्स्टनने सैनिकांना हाकलून दिले आणि आफ्रिकन हमाल मालावी सरोवराजवळ पोचल्यानंतर तेथल्या क्रूर टोळीवाल्यांच्या भीतीमुळे पळून गेले. त्यातल्याच एका हमालाने अफवा उठविली की, लिव्हिंग्स्टनचा खून झाला आहे. तेव्हा त्याच्या शोधासाठी मोहीम पाठविण्याचे ठरले. त्याच वेळी खात्रीलायक बातमी मिळाली की तो जिवंत आहे, पण त्याच्याकडे पोचणे अशक्य आहे.

अरब व्यापाऱ्यांनी लिव्हिंग्स्टनला मालावी सरोवर ओलांडण्यासाठी होड्या देण्याचे नाकारले. त्यामुळे तो सरोवराच्या दक्षिण टोकाभोवती फिरत राहिला. सहा वर्षांपूर्वी त्याने येथे संशोधन केले होते. नंतर तो हळूहळू उत्तरेकडे वळला. याच मार्गाने सन १७९८ मध्ये लाकेर्डा गेला होता. आता लिव्हिंग्स्टन एकटाच होता. आपल्या मृत पत्नीची त्याला नेहमी आठवण होत असे. तो ज्या भागातून जात होता तो प्रदेश वन्य जमातींची क्रूर युद्धे आणि दुष्काळ यामुळे उजाड बनला होता. त्या वेळी त्याने लिहून ठेवले आहे, 'आशादेवता येथे मूर्तिमंत अवतरली तरी तिलाही

निराश व्हावे लागेल. असा हा उजाड व ओसाड प्रदेश आहे!' तो आता टांगानिका सरोवराजवळ पोचत होता. त्याचे जे हमाल शिल्लक राहिले होते, त्यांपैकी दोन हमाल त्याची औषधांची पेटी घेऊन पळून गेले! या पेटीतच मलेरियावरचे क्विनाईन औषध होते व इतर औषधे खेडूतांना औषधपचार करण्यास उपयोगी पडत. त्या वेळी त्याने लिहिले की, 'औषधांची पेटी हरवल्यामुळे मला मृत्यूदंडाची शिक्षा झाली आहे असे मला वाटले. माझा मृत्यू मला आता जवळ दिसत आहे' पण हे १८६७ साल होते आणखी काही वर्षं हालअपेष्टांत जायची शिल्लक होती.

क्विनाईन नसल्यामुळे लिव्हिंग्स्टनच्या मागे मलेरियाचा आजार लागला. आता त्याच्याजवळ फारच थोडे हमाल राहिले. खेडेगावात मुक्कामाला असताना अरबांनी गुलाम पकडण्याच्या हेतूने केलेले क्रूर हल्ले त्याने समक्ष पाहिले व आपल्या रोजनिशीत नोंदवूनही ठेवले. अशा परिस्थितीतही तेथील भूगोल व निसर्ग याची निरीक्षणे रोजनिशीत नोंदवण चालूच होते.

लिव्हिंग्स्टनने अरबांना खूप विरोध केला होता. तरीही अरबांनी त्याला खूपच मदत केली. कझाम्बे ह्या टोळीप्रमुखाच्या मवेरू सरोवराजवळ असलेल्या राजधानीकडे जाता यावे म्हणून त्यांनी लिव्हिंग्स्टनला अन्न दिले. तेथे पोचल्यावर त्याने एक महिना विश्रांती घेतली, लिखाण केले आणि पुढच्या प्रवासाची योजना आखली. तेथे राहणे फारसे सुखावह नव्हते. अरब व्यापाऱ्यांचे आणि टोळीप्रमुखांचे बरेच सख्य होते. तो अरबांना गुलाम पकडून देत असे. त्याच्या झोपडीमध्ये मुंडकी व वाळलेले हात शोभेसाठी लटकावून ठेवलेले असत!

झांजिबारचा अरब व्यापारी टिपू-टिब याने लिव्हिंग्स्टनला



गुलामपकडचा टिपू-टिब

बरीच मदत केली. तो गुलाम पकडणारा व्यापारी होता. परंतु आफ्रिकेच्या अंतर्भागात तो एखाद्या सम्राटासारखा वागत असे. त्याच्या टोळीत चार हजार लोक होते. ते एक लहानसे सैन्यच होते! जे लोक त्याला हस्तिदंत आणि गुलाम पुरविणार नाहीत त्यांच्याशी तो फार क्रूरपणे वागत असे. आफ्रिकन जमातीत त्याचे नाव उच्चारताच घबराट पसरत असे. टिपू-टिब हे काही त्याचे खरे नाव नव्हते. त्याच्या डोळे मिचकवण्याच्या सवयीमुळे ते त्याला पडलेले टोपण नाव होते. त्याचे खरे नाव होते 'हमीद बीन महमंद.'

'टिपू-टिब' मवेरू सरोवराच्या प्रदेशात प्रथम १८६७ मध्ये पोचला. तेथे सुरुवातीपासून वावरणारे अरब व्यापारी त्याला घेऊन आले होते. तेथे आल्यावर न्यासामा नावाच्या टोळी-प्रमुखाशी त्याचे युद्ध झाले. त्या युद्धात दोन हजार माणसे मृत किंवा जखमी झाली. टिपू-टिबला एक हजार गुलाम व तीस टन हस्तिदंत मिळाले. टिपू-टिब एका जमातीला दुसऱ्या जमातीविरुद्ध उठवत असे आणि त्यात त्यांचा नाश झाला की स्वतः सर्व कारभार हाती घेत असे. अशा प्रकारे टांगानिका सरोवराच्या पलीकडे त्याने एक प्रचंड साम्राज्य स्थापले होते. या प्रदेशात तो लांब लांब मोहिमा काढी. त्याच्या रानटी पद्धतीनुसार न्यायदान करी, टोळीप्रमुखांची नेमणूक करे आणि करही गोळा करत असे.

मधून मधून तो झांजिबारला परत जात असे. तेथे त्याचा भव्य वाडा होता. हा वाडा बांधताना त्याच्या पायामध्ये शेकडो गुलामांना त्याने चिणून भरले होते अशी अफवा बोलली जात असे.

अशा प्रकारच्या क्रूर टिपू-टिबने लिव्हिंग्स्टनला मदत करावी हे आश्चर्य आहे. एक क्रूरकर्मा तर दुसरा मानवतेचा उद्गाता. पण नियतीने त्यांची सांगड घालून दिली होती. स्टॅनलेने गुलाम पकडणाऱ्या अरब व्यापाऱ्यांच्या या राजाचे वर्णन चांगल्या शब्दांत केले आहे. तो लिहितो– 'आफ्रिकेत शिरलेल्या अरबांपैकी टिपू-टिब हा सर्वांत धाडशी व धडाडीचा अरब होता.' एका मिशनऱ्याने त्याचे स्पष्टवक्ता व उमद्या व्यक्तिमत्त्वाचा असे वर्णन केले आहे. त्या काळच्या इतिहासावर टिपू-टिबने छाप टाकली होती हे नक्की, कारण त्या वेळचा झांजिबार येथील जर्मन राजदूत हेन्रीच बाथ याने एक आफ्रिकन संशोधक म्हणून त्याचे चरित्र लिहिले आणि त्यात त्याचा गौरव केला होता.


लिव्हिंग्स्टनच्या या अंतिम प्रवासामधील त्याने पहिला शोध जुलै १८६८ मध्ये लावला. त्या वेळी त्याने 'बंगवेलू' सरोवर शोधून काढले. त्या वेळी तो अगदी एकाकी अवस्थेत होता. त्याचे शेवटचे पाच हमाल त्याची अवज्ञा करून पळून गेले होते. तरीही आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर त्याने कुठल्याही संकटांना जुमानले नाही. बंगवेलू सरोवर सध्याच्या झांबिया राष्ट्रात आहे. काही ठिकाणी सरोवराभोवती दलदल पसरली आहे. नाईल नदीच्या उगमाबद्दल अजूनही लिव्हिंग्स्टन काही निराळ्या कल्पना बाळगून होता. नाईल नदीचा खरा उगम येथे सापडेल असे त्याला उगीचच वाटले. पण यापूर्वी नाईल नदीचा उगम तेथून १६००

किलोमीटरवर उत्तरेकडे आहे असा शोध स्पेकने लावला होता. व लिव्हिंग्स्टनला त्याची माहिती होती.

या समस्येचा विचार करतच तो उत्तरेस टांगानिका सरोवराकडे वळला. आता तो महंमद बोरगीब या गुलामपकडचा अरब व्यापाऱ्याबरोबर जात होता. ज्या मुलखात अजून कोणी युरोपियन जात नव्हता अशा प्रदेशात तो भटकला व टांगानिका सरोवराजवळच्या उजीजी या गावी पोचला. तेथे त्याला रसद व शिधासामुग्री मिळेल अशी आशा वाटत होती. त्याला हवी असलेली सामुग्री झांजिबारहून पाठविलीही होती, पण चोरट्यांनी सर्व लुटून टाकली. काही कपडे फक्त त्याच्या हाती लागले. तो पुन्हा एकदा प्रवासाला निघाला. टांगानिका सरोवराच्या पश्चिम किनाऱ्याजवळ असलेल्या लुलाबा नदीच्या खोऱ्याचे त्याला संशोधन करावयाचे होते. त्याने नवीन हमालांची भरती केली होती. पण ते सर्व लबाड निघाले आणि चोऱ्या करून पळून गेले. आता त्याच्याजवळ फक्त तीन निष्ठावंत अनुयायी शिल्लक राहिले होते. तो ज्या प्रदेशात हिंडत होता, तेथे थोड्याशा सुद्धा सुधारणेची नावनिशाणी नव्हती. तेथील जमाती अश्मयुगाच्या प्राथमिक अवस्थेत होत्या. त्यातच गुलामपकडचा अरबांचे थैमान आता वाढले होते व सर्वत्र अराजक माजले होते. तेथील लोकांविषयी त्याने लिहिले आहे, 'मला भेटलेल्या वन्य जमातीत येथील लोक सर्वांत क्रूर, खुनशी व दुष्ट प्रवृत्तीचे आहेत.'

लिव्हिंग्स्टन कसाबसा उजीजीला परतला. या प्रवासात तो तीनदा मरता मरता वाचला. एकदा त्याच्या पाठीला भाल्याची फेक निसटती लागली. पण आता तो निराश झाला होता. व केव्हाही मरायला तयार झाला होता. तो उजीजीला पोचण्या-

पूर्वी झांजिबारहून ताजी शिधासामुग्री व रसद आली होती. पण तिथल्या अधिकाऱ्याने ती सर्व विकून टाकली. लिव्हिंग्स्टनला आता आपला अंत जवळ आला आहे हे समजून चुकले.




**लिव्हिंग्स्टनची भ्रमंती व स्टॅन्लेने त्याचा लावलेला शोध**

लिव्हिंग्स्टन आफ्रिकेच्या अंतर्भागात बेपत्ता झाला आहे अशा बातम्या युरोपात व अमेरिकेत पसरल्या होत्या. त्याला शोधून काढण्यासाठी 'न्यूयॉर्क हेरॉल्ड' या वृत्तपत्राने हेन्री स्टॅन्ले या वार्ताहराला पाठवले होते. उजीजी जवळच्या एका खेडयात

स्टॅन्लेने लिव्हिंगस्टनला गाठले. ते दोघेजण एकमेकांकडे पाहात काही वेळ स्तब्ध उभे राहिले आणि मग स्टॅनलेने इतिहासात प्रसिद्ध झालेले आपले वाक्य उच्चारले, ' मला वाटतं आपणच डॉ. लिव्हिंगस्टन ! ' स्टॅलनलेच्या या भेटीमुळे लिव्हिंगस्टनला काही काळ नवजीवन मिळाले. स्टॅन्लेच्या वाट्याला प्रचंड कीर्ती आली कारण गेल्या पाच वर्षांत एकही युरोपियन व्यक्ती लिव्हिंगस्टनला भेटली नव्हती आणि या थोर संशोधकाच्या मृत्यूच्या बातम्या अनेकदा उठल्या होत्या.

ते दोघेजण चार महिने एकत्र राहिले. टांगनिका सरोवरात त्यांनी नौकानयन केले. पण लिव्हिंगस्टनने त्यांची आवडती वन्य आफ्रिका सोडून सुसंस्कृत जगात परतायला नकार दिला. निरुपाय झाल्याने स्टॅन्ले परत गेला. तो झांजिबारहून भरपूर शिधा सामुग्री व हमाल पाठविणार होता. त्यांची वाट पाहत लिव्हिंग्स्टन उजीजीला काही काळ थांबला आणि ती पोचल्यावर बंगवेलू सरोवराच्या दिशेने त्याने पुन्हा आपली भ्रमंती सुरू केली. त्यांच्या आयुष्याचे हे शेवटचे वर्ष होते. या भ्रमंतीतच चिताम्बो खेड्यात १ मे १८७३ रोजी प्रार्थना करीत असतानाच त्याला मृत्यू आला. एक चिरंतन प्रवास संपला होता. मृत्युपर्यंत लिव्हिंगस्टनने अफ्रिकेत ५८ हजार किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला होता.


स्टॅन्लेला कीर्तीचा मोह होता. तो विसाव्या वर्षापर्यंत उनाडच होता. घरगडी म्हणून त्याने सुरुवातीला काम केले होते. १८७४ पर्यंत तो लेखक आणि पत्रकार म्हणून उदयाला आला होता. पण या काळानंतरच तो आफ्रिकन संशोधक म्हणून गाजला. कांगो नदीच्या संशोधनाचे श्रेय त्याच्याकडेच जाते.



**आफ्रिका संशोधक स्टॅन्ले**

लिव्हिंग्स्टनची भेट झाल्यानंतर थोड्याच काळात स्टॅन्लेने टांगानिका आणि व्हिक्टोरिया सरोवराच्या प्रदेशात एक प्रचंड संशोधन मोहीम काढली. त्याने तीन गोरे सहकारी व दोनशे आफ्रिकन हमाल बरोबर घेतले होते. या मोहिमेतच त्याने युगांडाचा राजा कबाका याच्या बाजूने स्थानिक युद्धात भाग घेतला नंतर दक्षिणेकडे जाऊन टांगानिका सरोवरात होडी चालविली व संपूर्ण प्रदक्षिणा घातली.

त्यानंतर ऑगस्ट १८७६ मध्ये तो कांगो नदीच्या रोखाने पश्चिमेकडे निघाला. स्टॅनलेपूर्वीच काही दिवस कमांडर व्हर्ने




**स्टॅन्लेचा प्रवासमार्ग**

कॅमेरॉन या इंग्लिश संशोधकाने आफ्रिका खंड पूर्वेकडून पश्चिमेकडे ओलांडले होते. त्याने कांगो झाम्बेझी जलरेषेचा त्यातल्या त्यात सुरक्षित मार्ग पत्करला होता. पण स्टॅन्ले विषुवृत्तावरल्या घनदाट जंगलातून जाणार होता. या मार्गात खूपच धोके होते. त्याने टिपू-टिबला गाठले व मोहिमेत सामील होण्यासाठी पाच हजार डॉलर दिले. पण टिपू-टिब मधूनच परत फिरला. या मोहिमेत स्टॅन्लेला स्थानिक जमातींशी नेहमीच युद्ध करावे

लागले. कांगो नदी व आरुमविमी नदी या नद्यांच्या संगमावर त्याला सर्वांत भीषण लढाई द्यावी लागली. या लढाईचे वर्णन त्याने लिहून ठेवले आहे, 'आमच्यावर चालून येणाऱ्या प्रचंड सैन्यदलाचे निरीक्षण करायला आम्हाला भरपूर वेळ मिळाला. त्यांच्या होड्या आम्ही मोजल्या. त्या एकंदर चौपन्न होत्या. सर्वांत मोठी होडी अग्रभागी होती. त्या नंतर दोनदोनाच्या रांगा करून त्या येत होत्या. प्रत्येक होडीच्या एका एका बाजूला चाळीस लोक वल्ही मारत होते. रणवाद्य म्हणून ते ढोल वाजवत होते. पण त्या घनगंभीर आवाजामुळे आमचे धैर्य ढळले नाही.' त्या-नंतर स्टॅन्लेच्या सैनिकांनी बंदुकीतून जोराचा गोळीबार केला आणि त्या नरभक्षक टोळ्यांना माघार घ्यावी लागली. लढत लढत स्टॅन्ले व त्याचे सैनिक किनाऱ्यावर पोचले, आणि त्यांना पुष्कळ लूट मिळाली. त्यात विपुल प्रमाणात हस्तिदंतही होते.

या सर्व प्रवासास स्टॅन्लेला एक वर्ष लागले. या वर्षात त्याने बत्तीस लढाया दिल्या. आणि वीस गावे नष्ट केली. त्याला कांगो नदीमध्ये बावन्न धबधबे व उतार पार करावे लागले. या प्रवासात त्याने अनेकदा उघडपणे स्वतःला मृत्यू यावा म्हणून प्रार्थना केली तर अनेकदा आपल्या नोकराचाकरांना चाबकाने बडवून काढले. प्रवास संपत आला असताना त्याचा शेवटचा गोरा सहकारी पोकाक बुडून मेला. पण शेवटी ९ ऑगस्ट १८७७ या रोजी स्टॅन्ले अटलांटिक महासागावरील बोमा या व्यापारी ठाण्यावर पोचला.

बेल्जिअमचा राजा किंग लिओपोल्ड– दुसरा याने आफ्रिकन भूमीच्या संशोधनामध्ये खूपच रस घेतला होता. पण त्याने आफ्रिकेच्या भूमीवर कधीच पाऊल ठेवले नाही. तो राणी व्हिक्टो-

रियाचा नातेवाईक होता. त्यांच्या वडिलांना बेल्जिअमने आपले साम्राज्य स्थापावे असे वाटत असे. वडिलांचे हे स्वप्न दुसऱ्या लिओपोल्डला पुरे करावयाचे होते. दुसरीकडे साम्राज्य पसरवायला बेल्जियमला वाव नव्हता. साहजिकच त्याची दृष्टी पूर्व आफ्रिकेकडे वळली. बेल्जियमच्या संरक्षणाखाली तेथील एखादा मोठा प्रदेश घ्यायचे त्याने ठरविले. पण बेल्जियम त्या मानाने चिमुकले राष्ट्र होते. प्रचंड साम्राज्य मिळविलेल्या फ्रान्स, जर्मनी, इंग्लंडसारख्या दादा राष्ट्रांचा त्याला धाक वाटत होता. तेव्हा त्याने मोठ्या चातुर्याने डाव टाकला. त्याने खाजगीरित्या ब्रुसेल्स येथे सप्टेंबर १८७६ मध्ये भौगोलिक परिषद बोलविली. या परिषदेला इंग्लंड, फ्रान्स, रशिया, जर्मनी आणि इटली ही राष्ट्रे हजर होती. लिओपोल्ड या परिषदेचा अध्यक्ष बनला. त्याने जाहीर केले की, 'आफ्रिकन जनता अंधःकारात वेढलेली आहे त्यांची प्रगती करण्यासाठी सुसंस्कृत राष्ट्रांनी धर्मयुद्धाप्रमाणे प्रयत्न करून त्यांना संरक्षण दिले पाहिजे.' हे तत्त्व डोळ्यापुढे ठेऊनच्च 'इंटरनॅशनल आफ्रिकन असोशिएशनची' स्थापना झाली आणि यापुढे संशोधन मोहिमांच्या नावाखाली आफ्रिकाखंडाचे लचके तोडायला युरोपियन राष्ट्रांनी प्रारंभ केला. परिषदेचे यजमानपद स्वीकारणारे बेल्जियम राष्ट्र यात सर्वात पुढे होते. पुढच्या सहा वर्षात बेल्जियमने आफ्रिका खंडात पाच मोहिमा काढल्या.

'आफ्रिकन असोसिएशन'ची स्थापना झाल्यानंतर थोड्याच दिवसात स्टॅन्लेने आपला कांगो नदीतील प्रवास पूर्ण केला होता. दुसऱ्या लिओपोल्डने स्टॅन्लेच्या प्रवासाची ही हकीगत ऐकली. त्याच्या धूर्त व चाणाक्ष बुद्धीला स्टॅन्लेच्या शोधाचे महत्त्व पटले.

त्याने पूर्व आफ्रिकेत घुसण्याचा विचार ताबडतोब सोडून दिला. स्टॅन्‌ले जानेवारी १८७८ मध्ये प्रवास संपवून फ्रान्समधील मार्सेलिस बंदरात उतरला तेव्हा लिओपोल्डचे दोन प्रतिनिधी त्याच्यासाठी तिष्ठत उभे होते. पण स्टॅन्‌लेने त्या वेळी त्यांचे निमंत्रण धुडकवून लावले. सहा महिन्यांनंतर त्याची व दुसऱ्या लिओपोल्ड राजाची भेट झाली. त्या वेळी मात्र त्याने पुन्हा कांगो नदीच्या खोऱ्यात जायचे मान्य केले. तो लिओपोल्ड राजाचा मुख्य प्रतिनिधी म्हणून तेथे जाणार होता. त्याशिवाय कांगोतील धबधबे टाळून व्यापारासाठी रस्ता शोधायचे कामही त्याने स्वीकारले होते. स्टॅन्‌लेने आता संशोधकाची भूमिका सोडून दिली होती आणि तो साम्राज्यसंस्थापक बनू लागला होता. दुसऱ्या लिओपोल्डशी नेहमीच तो एकनिष्ठ राहिला. अर्थात दुसरा लिओपोल्ड स्टॅन्‌लेची नेहमीच स्तुती करत असे. स्टॅन्‌ले-सारखे असामान्य धैर्य व कर्तृत्व फारच दुर्मिळ असते हे खरे.

स्टॅन्‌लेने लिओपोल्डच्यावतीने प्रमुख प्रतिनिधी म्हणून कांगोच्या खोऱ्यात पाच वर्षं काम केले. या काळात त्याने स्थानिक टोळीप्रमुखांशी तहनामे केले. अशा तहनाम्यानुसार तेथील भूमी-वरचा सार्वभौमत्वाचा हक्क त्याने लिओपोल्ड राजाला दिलेला असे. असे त्याने ४५० तहनामे घडवून आणले. बेल्जियमचा राजा दुसरा लिओपोल्ड याच्या खाजगी मालमत्तेखाली हा सर्व प्रदेश आला. 'कांगो फ्री स्टेट' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या सर्व प्रदेशाचे क्षेत्रफळ २५ लाख, ९० हजार चौरस किलोमीटर होते. म्हणजे तीन चतुर्थांश भारताएवढा हा प्रदेश होता. स्टॅन्‌लेने प्रथम कांगोनदीच्या उत्तरेकडील प्रदेशावरही हक्क सांगितला होता. पण तेथील फ्रेंच संशोधक 'कौंट द ब्राझा' याने त्याला

विरोध केला. त्यामुळे तेथे स्टॅन्लेचे चालले नाही.

पण कांगो नदीच्या दक्षिणेकडे स्टॅन्लेला कोणतीच अडचण आली नाही. थोड्याच वर्षांत त्याने चाळीस व्यापारी केन्द्रे स्थापन केली. आफ्रिकन लोकांनी स्टॅन्लेला 'दगडफोड्या' असे नाव दिले होते. कारण त्याने चिकाटीने प्रचंड लांबीचे रस्ते तयार केले. त्याच्या पूर्वीच्या योजनेप्रमाणे त्याने टिपू-टिबला बोलावून घेतले आणि कांगो नदीच्या उगमाकडील प्रदेशाचा राज्यपाल नेमले.

आफ्रिकेच्या जनतेला संस्कृतीचा हा डोस फार महाग पडला. विकासासाठी रस्ते बांधताना किंवा व्यापार करताना बेल्जियन लोकांनी पशूवत् वर्तन केले. थोड्याच काळात बेल्जियन लोकांचा क्रूरपणा लोकांना माहीत झाला. बेल्जियनांनी अनेकदा नरभक्षकांच्या टोळ्या आपल्या कामासाठी वापरल्या व तेथील एक कोटी प्रजेत दहशत निर्माण केली. त्यांच्या या क्रूरपणाचे सविस्तर वर्णन पोलंडमध्ये जन्मलेल्या जोसेफ कॉनरॉड या लेखकाने आपल्या 'द हार्ट ऑफ डार्कनेस' या कादंबरीत केले आहे.

लिओपोल्डने कांगो फ्री स्टेटची स्थापना केल्यामुळे युरोपात खळबळ माजली. कार्ल पिटर्स या तरुण जर्मन संशोधकाने १८८४ मध्ये आफ्रिकेत वसाहती मिळविण्यासाठी एक असोसिएशन स्थापन केली. तो पूर्व आफ्रिकेत गुप्तपणे गेला आणि त्याने स्टॅन्लेच्या धर्तीवर टोळीप्रमुखांशी तहनामे करावयास सुरुवात केली. जर्मन संशोधक १८६१ पासूनच पूर्व आफ्रिकेत फिरत होते. कौंट व्हॉन डर डेकन याने १८६१ मध्येच किलिमांजारो पर्वताच्या भागात संशोधन केले होते. १८८४ मधील कार्ल पिटरच्या प्रयत्नांना तत्कालीन जर्मन प्रधानमंत्री बिस्मार्क याने उचलून धरले. पूर्व आफ्रिकेच्या किनारपट्टीवर झांजिबारचा

सुलतान हक्क सांगत असे. म्हणून बिस्मार्कने मोठे आरमार झांजिबार बेटाकडे पाठवले आणि पिटरने टोळीप्रमुखांशी केलेल्या तहांना मान्यता देण्याबद्दल निर्वाणीचा खलिता पाठवला. शेवटी पूर्व आफ्रिकेची फाळणी जर्मन व इंग्लंड यांनी केली. टांगानिका चा प्रदेश जर्मनीने बळकावला आणि इंग्लंडच्या मनात नसतानाही त्यांना केनिया व युगांडा आपल्याकडे घ्यावा लागला.

एकोणिसाव्या शतकाचा शेवट जवळ आला होता. आता आफ्रिका खंडाचे लचके तोडण्यासाठी युरोपियन सत्तांची स्पर्धा सुरू झाली. सुदानच्या एका दक्षिणेकडील एका प्रांतात ‘ अमीन पाशा ’ नाव



‘ अमीन पाशा ’

धारण करणारा युरोपियन, जनरल गॉर्डनचा १८८५ मध्ये खून झाल्यापासून अडकून पडला होता. सुदान प्रांतात महादीचे उत्थान झाले होते, त्यामुळे अमीनपाशाला सोडवायला तेथून जाता येत नव्हते. ही कामगिरी अर्थातच ‘ दगडफोडचा ’ किंवा स्टॅन्लेच्या गळ्यात पडली.

अमीनपाशा हा युरोपातील कोणत्या राष्ट्राचा आहे व त्याचे नाव काय आहे हेही स्टॅन्लेला माहित नव्हते. तो शेवटी एडचुअर्ड सिनिट्झर या नावाचा जर्मन ज्यू डॉक्टर निघाला. त्याने मुसलमान धर्म स्वीकारला होता. जनरल गॉर्डनने त्याला डॉक्टर म्हणून नेमले होते. नंतर त्याने त्याची विषुववृत्तीय प्रदेशाचा राज्यपाल नेमणूक केली. खार्टूम महादीच्या हातात पडल्यानंतर त्याचे प्राण धोक्यात आले. म्हणून तो नाईल नदीच्या उगमाकडच्या दुर्गम प्रदेशात शिरला. तो त्या भागात कर गोळा करत असे. कर म्हणून तो हस्तिदंत स्वीकारत असे.

स्टॅन्लेने त्याच्या शोधासाठी एक जंगी मोहीमच काढली. त्याने पाचशे रायफली व दारूगोळ्याच्या शेकडो पेट्या बरोबर घेतल्या. पाच युरोपियन साहाय्यक घेतले. त्यातले तीन लष्करी अधिकारी होते. आणि या सर्वांसह तो झांजिबारला पोचला. तेथे त्याने टिपू-टिबला पुष्कळ पैसे देऊन मदतीला घेतले. त्याने चारशे हमाल जमवले आणि हे लहानसे सैन्य कांगो नदीच्या रोखाने निघाले. कांगो नदीच्या उगमाकडे जायचे आणि तेथून अमीन पाशा राहत असलेल्या उत्तर पूर्वेच्या प्रदेशात घुसायचे अशी स्टॅन्लेची योजना होती. स्टॅन्लेने आपल्या काही लोकांना मागे ठेवले आणि तो इटूरिच्या दमट जंगलात शिरला. तेथे त्याला कित्येक आठवडे भयंकर संकटांशी सामना द्यावा लागला.

अनेकदा वादळे झाली. पिग्मी लोकांनी त्याच्यावर हल्ला केला. याच्याजवळचे सत्तर हमाल मेले. त्याच्याजवळचा अन्नपुरवठा संपला आणि झाडांची पाने उकडून खाऊन त्याला राहावे लागले. पण शेवटी त्याने अमीन पाशाला गाठले. पण स्टॅन्लेपेक्षा अमीन पाशा खूपच चांगल्या परिस्थितीत होता ! अजूनही तो कर गोळा करत होता. आणि कित्येक हजार लोकांवर त्याचे स्वामित्व होते.

शेवटी हे दोघेजण दोन निरनिराळे जथे घेऊन पूर्व किनाऱ्याकडे निघाले. पुन्हा एकदा स्टॅनलेवर संकटांचा वर्षाव झाला. त्याचे सर्व गोरे सहकारी मृत्यू पावले. परतल्यावर त्याने 'इन द डार्केस्ट आफ्रिका' हे हजार पानी पुस्तक पन्नास दिवसांत लिहिले. व अकरा भाषांत ते प्रसिद्ध केले. या पुस्तकात त्याने आफ्रिकेच्या प्रवासातील रोमहर्षक अनुभवांचे वर्णन केले होते.

□

प्रकरण नववे

## विसाव्या शतकातील आफ्रिका

मध्य आफ्रिकेचे संशोधन चालू होते त्याच वेळी दक्षिण आफ्रिकेमध्येसुद्धा युरोपियन सर्वत्र अंतर्भागात घुसू लागले होते. लिव्हिंग्स्टनने झांबेझी नदी व व्हिक्टोरिया धबधब्याचा शोध लावला व त्यानंतर त्या भागात युरोपियन लोकांची वर्दळ वाढू लागली. लिव्हिंग्स्टनचा सासरा रॉबर्ट मोफाट याने १८५९ मधेच सध्याच्या -होडेशिया देशात मताबेले या युद्धखोर जमातीच्या परिसरात मिशनरी केंद्र स्थापन केले. थोडाच काळात व्यापारी लोक लिंपोपो नदी ओलांडून पलीकडे जाऊ लागले. डच शेतकऱ्यांपैकी (बोअर्स) दोन शिकारी पीएट जेकब्स् आणि जॉन व्हिल्जोएन जवळच्या अज्ञात प्रदेशातील जंगलात खोलवर घुसले व येताना ५ हजार किलोग्रॅम हस्तिदंत घेऊन आले. मॉच या संशोधकाने आफ्रिकेच्या दक्षिण भागात सोने सापडते हे सिद्ध केल्यावर सोने शोधणाऱ्यांचा लोंढाच तेथे गेला. या लोंढ्यातच थॉमस बेन्स हा कलाकार सामील झाला होता. दहा वर्षापूर्वी त्याने लिव्हिंग्स्टन-बरोबर न्यासा सरोवराच्या मोहिमेत भाग घेतला होता. मताबेले जमातीचा प्रमुख लोबेनगुला याने थॉमस बेन्सला सोने काढण्याचा परवाना दिला. त्याची राजधानी बुलवायो येथे होती.

पश्चिमेकडे प्रॉटेस्टंट मिशनरी कार्य करीत होते. तेथे बरोटसे ही हिंस्त्र जमात होती. या जमातीनेच लिव्हिंग्स्टनचे १८५५ मध्ये स्वागत करणाऱ्या माकोलोलो जमातीची कत्तल केली होती. या भागात फ्रॉंकाईस कोलीयार्ड या मिशनऱ्याने हस्तिदंत गोळा करणारा शिकारी जॉर्ज वेस्टबीच याच्या साह्याने १८७९ मध्ये मिशनरी कार्य सुरू केले. कोलीयॉर्डच्या अस्तित्वामुळेच झाम्बेझी नदीच्या उगमाकडला प्रदेश पोर्तुगीजांच्या हातात पडला नाही. कोलीयॉर्ड ज्या प्रदेशात कार्य करीत होता तेथून जवळच 'इला' जमातीचे युद्धखोर लोक होते. त्या भागात प्रवास करणाऱ्या एमिल होलूब आणि फ्रेडरिक सेलस या दोघा संशोधकांना त्यांच्या क्रूर हल्ल्याला तोंड द्यावे लागले.



आफ्रिका : सेसिल ऱ्होडस्
ऱ्होडेशियाचा संस्थापक

१९ व्या शतकाच्या अखेरीस जे आफ्रिकेचा कब्जा मिळविण्याचे प्रयत्न झाले त्यात सेसिल ऱ्होडस्चा प्रयत्न महत्त्वाचा होता. सोने व इतर खनिज मिळविण्याच्या हेतूने त्याने १८८९ 'ब्रिटिश साऊथ आफ्रिका' कंपनी स्थापन केली आणि सनदही मिळविली. नंतर त्याच्या प्रतिनिधींनी मताबेले जमातीचा प्रमुख लोबेनगुला याचेकडून खनिज काढायचा परवाना मिळविला. त्यानंतर कित्येक महिन्यांनी २०० सैनिकांच्या एका तुकडीने लिंपोपो नदी ओलांडून उत्तरेकडे आक्रमण केले. जुने प्राचीन शहर मोनोमोटापाजवळ त्यांनी आपल्या गाड्या सोडल्या व

मुक्काम केला. तेथेच आजचे सॅलस्‌बरी शहर वसले आहे.

सेसिल ऱ्होडसने १८९० मध्ये लिंपोपो आणि झाम्बेझी या नद्यांमधील प्रदेशावर कब्जा केला. याच प्रदेशाला पुढे ऱ्होडसच्या नावाने ऱ्होडेशिया असे नाव पडले. त्याचे दोन भाग होऊन उत्तर ऱ्होडेशियाला स्वातंत्र्य मिळाले व तो देश आता झांबिया या नावाने ओळखला जातो. पण दक्षिण ऱ्होडेशिया अजूनही (१९७७) अल्पसंख्यांक गोऱ्या लोकांच्या हातात राहिला असून त्या देशाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आंतरराष्ट्रीय राजकारणात गाजत आहे.

त्यानंतर ऱ्होडसचे लक्ष उत्तरेकडे वळले. टांगानिका सरोवरापर्यंतचा प्रदेश अजून कोणाच्या ताब्यात नव्हता. त्या भागातील बरोटसे जमातीचा राजा लेवानिका याच्याबरोबर तहनामा करण्यासाठी ऱ्होडसने फ्रॅंक लॉकनेर या सैनिकी अधिकाऱ्याला पाठवले. अनेक महिने परिश्रम केल्यानंतर मिशनरी कोलीयॉर्डच्या मदतीने त्याला तह करून घेण्याच्या कामात यश मिळाले.

या प्रदेशाच्या जवळच कटांगा जमातीचा मुलूख होता. तेथे मिसरी नावाच्या स्थानिक व्यापाऱ्याचे वर्चस्व होते. ऱ्होडसने ठरविले की हा सर्व प्रदेश तहनामे करून ताब्यात घ्यायचा. तेव्हा त्याने जोसेफ थॉम्सन या संशोधकाला ही कामगिरी भरपूर मोबदला घेऊन सोपविली. थॉम्सनने पूर्वेकडून या प्रदेशात प्रवेश करावयाचा होता आणि जितक्या स्थानिक टोळीप्रमुखांशी तह करता येतील तितक्यांशी तह करावयाचे होते. पण एकटा थॉम्सन पुरा पडणार नाही या कल्पनेने ऱ्होडसने आल्फ्रेड शार्पला अशाच कामगिरीवर त्याच प्रदेशात पाठविले. अर्थात त्या दोघांनी दोन वेगवेगळ्या मार्गांनी कटांगात प्रवेश केला. थॉम्सनने १४५

हमाल व दोन युरोपियन सहकारी बरोबर घेतले होते. आफ्रिके-मधील सततच्या प्रवासामुळे थॉम्सन आधीच थकला होता. मोहिमेला सुरुवातीलाच अपशकून झाला. देवीची साथ आली आणि त्यात १/३ हमाल मेले. थॉम्सनही आजारी पडला. सध्याच्या झांबियामध्ये जेथे तांब्याच्या खाणी एकवटल्या आहेत त्या प्रदेशा-पर्यंतच थॉम्सन घुटमळत राहिला. शेवटी नाइलाजाने तो परत फिरला. परतताना सध्याच्या झाम्बिया व मालावी राष्ट्रांच्या सीमेजवळ त्याच्या जथ्यावर नगोनी जमातीच्या टोळीने हल्ला चढविला. लढाई देत देत ते कसेतरी निसटले. पण नंतर थोडयाच दिवसांत थॉम्सन मृत्यू पावला.

इकडे आल्फ्रेड शार्प लुंडा जमातीचा प्रमुख कझाम्बे याच्या राजधानीला पोचला. लिव्हिंग्स्टनने वीस वर्षांपूर्वी या राजधानीला भेट दिली होती. पण शार्प प्रवासाच्या श्रमाने थकला होता. आणि त्याचे बहुतेक हमाल पळून गेले होते. शेवटी त्याने तेथे वर्चस्व असलेल्या मसेरी या व्यापाऱ्याला गाठले. पण त्याने तहनामा करण्यास नकार दिला. थोडयाच दिवसांत कॅनेडियन नागरिक कॅप्टन विल्यम स्टेअर्स याच्या नेतृत्वाखाली बेल्जियमची एक मोहीम कटांगात पोहचली. त्याच्या जथ्यातील बॉडसन नावाच्या माणसाने मसिरीला पिस्तूल झाडून ठार केले. पण नंतरच्या चकमकीत तोही मारला गेला. कटांगात बेल्जियमचे निशाण फडकविण्यात आले. विल्यम स्टेअर्स किनाऱ्याकडे परत गेला आणि तेथेच ताप येऊन मृत्यू पावला.

एकोणिसावे वे शतक संपत आले होते तरी मध्य आफ्रिकेतील हिंसाचार व कत्तली थांबल्या नव्हत्या ! १८९६ मध्ये ऱ्होडेशियात मताबेले जमातीने बंड केले. त्या वेळी सेसिल ऱ्होडसने मोटापोस

टेकड्यांच्या प्रदेशात स्वतः प्रवेश केला आणि शस्त्रसंधी घडवून आणला.

सन १८९० मध्ये काही धाडशी प्रवाशांनी आफ्रिकाखंड पूर्वेकडून पश्चिमेकडे ओलांडले. हा प्रवास त्यांनी पायी केला आणि लिव्हिंग्स्टन ज्या मार्गाने गेला होता, त्याच मार्गाने त्यांनी प्रवास केला. एक पोर्तुगीज अधिकारी सेर्पा पिंटो, लोबिटो येथून १८७७ साली निघाला आणि दोन वर्षांनी दक्षिणेकडच्या दरबान शहरी पोचला. या सुमारास जर्मन संशोधक हर्मान व्हॉन व्हिझमान याने आफ्रिका खंड दोनदा ओलांडले. तरीही आफ्रिका खंडाचा मध्यभाग रानटी आणि गूढच राहिला होता. या अंतर्भागात अनेक संशोधक नाहीसे झाले आणि त्यांचे पुढे काय झाले हे कधीच कळले नाही!

आफ्रिकेतील प्रवासात असे प्राणभय होते तरी अनेक धाडसी प्रवासी व संशोधक आफ्रिकेत जातच राहिले. अशा अनेक प्रवाशांच्यापैकी डॉ. जेम्स जॉस्टन यांची हकीगत उदाहरण म्हणून सांगण्यासारखी आहे. तो जन्माने स्कॉट होता व प्रकृतीसाठी जमेका येथे जाऊन राहिला होता. ख्रिश्चन धर्माचा प्रचार करण्यासाठी त्याने आफ्रिकेत जाण्याचे ठरविले. त्यांच्याबरोबर अनेक पूर्वीचे निग्रो असलेले जमेकन लोकही जाण्यास निघाले. आपल्या पूर्वजांच्या मायभूमीत ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्याचे ध्येय जमेकन निग्रोंपुढे होते.

जॉस्टन लोबिटे येथे उतरला आणि तेथून पूर्वेकडे निघाला. त्याच्याबरोबर पायांत घोटाळणारा त्याचा पाळीव कुत्रा होता आणि खांद्यावर बंदूक होती. एक दिवशी रात्री चालता चालता जनावरे पकडायला खोदलेल्या खड्ड्यात तो पडला. तेथे एक जनावर आधीच येऊन अडकले होते. ते जनावर जॉस्टनच्या खांद्यावर

चढून वर गेले आणि निसटले ! जॉस्टनने आपल्याबरोबर कारोनेट हे वाद्य बाळगले होते. ते वाजवून तो आपल्या हमालांना बोलवी आणि रस्त्यातील खेडूतांची करमणूक करी. जॉस्टनबरोबरच्या जमेकन लोकांना आफ्रिकेचा लवकरच कंटाळा आला. आणि त्यांना परतायची घाई झाली. जॉस्टनने फ्रेडरिक अर्नाट आणि इतर मिशनऱ्यांनी अंगोलामध्ये स्थापलेल्या मिशनरी केंद्राला भेट दिली. मिशनऱ्यांचे वर्तन त्याला आवडले नाही. नंतर त्याने मिशनऱ्यां-वरील टीका प्रसिद्ध केली त्यामुळे मिशनऱ्यांविरुद्ध मोठाच प्रक्षोभ निर्माण झाला.

आपला प्रवास संपवताना जॉस्टन झाम्बेझी नदीच्या खोऱ्यात शिरला. तेथील वैराण प्रदेशात पोर्तुगीज सैनिक आणि शेवटचे गुलामपकडे व्यापारी यांच्या झटापटी चालू होत्या. शेवटी तो फ्राँकाईस कोलीयॉर्डच्या बरोटसे जमातीमधील मिशनमध्ये पोचला. येथे त्याचे वैद्यकीय ज्ञान उपयोगी पडले आणि तो खूपच लोकप्रिय झाला. तिथला स्थानिक टोळीप्रमुख त्याला जाऊच देईना. शेवटी त्याने आपली रायफल त्या टोळीप्रमुखाला बक्षीस दिली तेव्हा कोठे त्यांनी परवानगी दिली !

इंग्लंडला परतल्यावर त्याने ‘रिॲलिटी व्हर्सेस रोमान्स इन साऊथ सेन्ट्रल आफ्रिका’ या नावाने एक पुस्तक लिहिले. आणि नंतर तो जमेकाला निघून गेला.

एकोणीसाव्या शतकाच्या शेवटी सध्याच्या आफ्रिकाखंडातील राजकीय सीमा निश्चित झाल्या होत्या. या शतकाच्या शेवटच्या पन्नास वर्षात जे संशोधन झाले, त्याचा हा परिपाक होता. निर-निराळ्या संशोधकांनी आपल्या मायभूमीसाठी वर्चस्वाची क्षेत्रे निर्माण केली. आपल्या मिशनऱ्यांचे संरक्षण करण्याचा बहाणा

करून काही राष्ट्रांनी सैन्य पाठवून मोठे प्रदेश ताब्यात घेतले. हॉलंड, स्वीडन आणि नॉर्वे या तीन युरोपीय राष्ट्रांखेरीज सर्व युरोपियन राष्ट्रांनी आफ्रिकाखंडाचे लचके तोडले आणि प्रदेशाची आपापसात वाटणी करून घेतली. या चढाओढीत इटालियन राष्ट्र उशीरा उतरले. त्यांनी १८८५ मध्ये तांबड्या समुद्रावरील मसावा हे प्राचीन बंदर हस्तगत केले. पण इटालियनांचा आडोवाच्या लढाईत इथोपियाचा राजा दुसरा मेनेलिक याने १८९६ मध्ये पराभव केला. तेव्हा इथोपिया जिंकण्याचे इटालियनांचे स्वप्न विरून गेले.

आफ्रिकाखंडाचे तुकडे पडताना तेथील जमातींच्या हद्दीचा कधीच विचार केला गेला नाही. नकाशावर हद्दी आखताना अक्षांश-रेखांशाचा विचार होई. किंवा नद्यांचे जलाग्रह क्षेत्र किंवा जलरेषा यांना धरून सीमा आखली जाई त्यामुळे एक जमात फाळणी होऊन दोन राष्ट्रांत वाटली जाई. एकाच जमातीला दोन निरनिराळ्या युरोपियन भाषा शिकाव्या लागत. वसाहत-वादी राष्ट्रे अनेकदा सरहद्दीबाबत तंटे उपस्थित करत व ते मिट-वायला त्रयस्थ मध्यस्थ नेमत. मध्य आफ्रिकेमध्ये पोर्तुगीज आणि ब्रिटिश यांच्यामधील सीमातंटा इटलीच्या राजाने नकाशावर एक रेघ ओढून मिटवला. त्या वेळी तेथील स्थानिक टोळीप्रमुख कळवळून सांगत होता की ' माझी जमात दोन राष्ट्रांत तोडली जात आहे. तेव्हा असे करू नका. ' पण त्याच्याकडे लक्ष देतो कोण ?

एकोणीसाव्या शतकाच्या शेवटी शेवटी काही थोड्या वर्षांतच युरोपियन राष्ट्रांचे धोरण एकदम बदलले आणि आजपर्यंत वन्य जीवन जगणाऱ्या आफ्रिकाखंडाचा ताबा आपल्या वसाहती म्हणून

युरोपियन राष्ट्रांनी घ्यायला सुरुवात केली. पण आफ्रिकेतील वन्य जमातींनी अनेक ठिकाणी याला विरोधही केला. टांगानिकामध्ये जर्मनांना चांगलाच विरोध झाला. १९०७ मध्ये मेझीमेझी नावाचे बंडही झाले. पण रक्तपात करून ते दडपून टाकण्यात आले. पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावर त्यातल्या त्यात सुसंघटित राज्य-व्यवस्था होती. त्यांनी सहजासहजी शरणागती दिली नाही. 'अशांटी' ही वसाहत म्हणून जाहीर करण्यासाठी इंग्रजांना १९०१ पर्यंत थांबावे लागले. दोहोमीमधील टोळीप्रमुख खुपच सुधारलेले होते. त्यांच्यावर अधिराज्य मिळवायला फ्रेंचांना पन्नास वर्षे लागली. त्यातील एका स्थानिक राजाने युरोपियनांची भाषाही नको म्हणून आपल्या बोलीभाषेसाठी नवीन लिपीही शोधून काढली होती ! परंतु वन्य आफ्रिकनांचा सर्व विरोध निष्फळ होणार हे ठरलेले होते. युरोपियनांचे शस्त्र सर्वश्रेष्ठ होते. आफ्रिकनांची शस्त्रे अश्मयुगीन काळातील होती. अशा परि-स्थितीत युरोपियनांचा जय होणार हे ठरलेलेच होते.

युरोपियन राष्ट्रांनी आफ्रिकेवर राज्य करताना आपापल्या कल्पनेप्रमाणे निरनिराळ्या पद्धती वापरल्या. फ्रेंचानी सामिली-करणाचे धोरण स्वीकारले. फ्रेंच वसाहतीतील सर्व प्रजाजन फ्रान्सचे नागरिक मानले जात. फ्रान्सबद्दल निष्ठा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाई. तेथे समाजरचना टोळ्यांची होती. फ्रान्सने ती बदलण्याचा प्रयत्न केला. टोळीप्रमुखाला काहीच महत्त्व न देता युरोपियन पद्धतीवर समाजरचना तयार केली. इंग्रजांनी अगदी निराळीच पद्धत अनुसरली. अप्रत्यक्ष राज्यकारभार हे इंग्रजांचे तत्त्व होते. इंग्रजांनी टोळीप्रमुख कायम ठेवले व त्यांच्या-द्वारेच राजकाभार चालविला. अप्रत्यक्ष राजकारभाराचे हे तत्त्व

लॉर्ड लुगार्ड याने पुरस्कारले आणि अंमलात आणले. लुगार्डने आपले आयुष्य आफ्रिकेतच घालविले होते. मालावी सरोवरापाशी गुलामपकडच्या व्यापाऱ्यांचा बंदोबस्त त्याने केला होता. शेवटी तो नायजेरियाचा गव्हर्नर जनरल झाला. त्या वेळी त्या वसाहतीच्या उत्तरेकडे प्रबळ सुलतान व अमीर यांना कह्यात कसे आणायचे हा प्रश्न त्याच्यासमोर होता. त्या वेळी त्याने अप्रत्यक्ष राज्यकारभाराचे तत्त्व अनुसरले.

राज्यकारभाराची पद्धत कशीही असो, युरोपियन आणि वन्य आफ्रिकन यांचे संबंध वाढू लागले. युरोपियन मानववंशशास्त्रज्ञांनी आफ्रिकन समाज व त्याच्या चालीरिती यांचा सखोल अभ्यास चालू केला. यांउलट आफ्रिकनांचाही संबंध राज्यकर्त्या गोऱ्या लोकांशी येऊ लागला. पूर्वीच्या जुलमी अरबांपेक्षा हे राज्यकर्ते अगदी निराळे होते. आफ्रिकन लोकांच्यापैकी हुषार मुलांना युरोपात उच्च शिक्षण मिळू लागले. मुक्त केलेले गुलाम युरोपातील राजधान्यांत १७५० पासून दिसत असतच. पण आता विश्वविद्यालयांतून तुरळक आफ्रिकन दिसू लागले. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी स्थानिक राजे व टोळीप्रमुख यांना महत्त्वाच्या समारंभाला निमंत्रणे देण्याची पद्धत सुरू केली. १९०२ मध्ये झालेल्या सातव्या एडवर्डच्या राज्यारोहण समारंभास आफ्रिकेमधील अनेक लहान राजे व टोळीप्रमुख हजर होते.

आफ्रिकेमध्ये लिव्हिंग्स्टन, स्टॅनले, बार्थ वगैरेंनी संशोधन मोहिमा पूर्ण केल्यानंतर कित्येक वर्षे लोटली तरी धाडशी प्रवाशांचे आफ्रिकेविषयीचे आकर्षण कमी होत नव्हते. अजूनही आफ्रिकाखंड म्हणजे एक आव्हान आहे असे या प्रवाशांना वाटे. कैरोपासून केपटाऊनचा पहिला प्रवास एवार्ट ग्रोगन या केंब्रिज

विश्वविद्यालयाच्या प्राध्यापकाने केला. त्याने नंतर या प्रवासाचे पुस्तक लिहिले. पण त्या पुस्तकात त्याच्या उद्धट स्वभावाचे दर्शन होते. ग्रोगन हा उत्तम शिकारी होता. त्याच्या पुस्तकाच्या प्रत्येक पानावर आपण शिकार कशी केली, मग त्या प्राण्याचे कातडे कसे काढले व डोके कसे कापून घेतले याचे तपशीलवार वर्णन आहे. आपल्या उद्धटपणामुळे ग्रोगन आफ्रिकन टोळयांच्या तडाख्यात सापडला नसता तर नवल झाले असते! प्रत्येक ठिकाणी तो भांडला. एकदा तर तो मरता मरता वाचला. एका टोळीवाल्याने त्याच्या डोक्यात सोटा मारला व त्याच्या कांगोमधील आफ्रिकन मदतनीसास ठार केले. शिकारीसाठी वापरायच्या डमडम गोळ्या झाडून त्याने तीन आफ्रिकनांना ठार केले. शेवटी ग्रॉगनला नाईल नदीवर मासेमारी करणारा ब्रिटिश अधिकारी भेटला. तेव्हा त्याचा प्रवास संपला. त्या ब्रिटिश अधिकाऱ्याला त्याने विचारलेच, 'काय, जवळपास शिकारबिकार आहे का कोठे?' ग्रॉगनच्या या धाडसामुळे सेसिल ऱ्होडस् फार प्रभावित झाला. केपटाऊनपासून कैरोपर्यंत रेल्वे लाईन बांधण्याचे स्वप्न सेसिल ऱ्होडस् पाहात असे. त्याने बुलवायो येथून ग्रोगनच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली. ते पुस्तक १९०० साली प्रसिद्ध झाले.

१९२० च्या सुमारास रोझिटा फोर्बस् या स्त्रीने सहारा वाळवंटात संशोधन मोहीम काढली. तिच्यापूर्वी आफ्रिकन स्त्री संशोधिका गेल्या नाहीत असे नाही. उदाहरणार्थ, मेरी किंग्जले हिने प्राणीशास्त्रज्ञ नात्याने पश्चिम आफ्रिकेत काम केले होते. पण रोझिटा फोर्बस्‌ने लिबियाच्या वाळवंटातील धोक्याच्या प्रदेशात मोहीम काढली. तिने बेदुईन अरबांचा पोषाख धारण केला आणि अंतर्भागातील कुफारा ओयासिसकडे ती निघाली. या

प्रवासात तहानेली होऊन ती मरता मरता वाचली. सहारा वाळवंटाच्या अमर्याद विस्तारात हरवून जाऊन भुकेने व तहानेने बळी पडलेल्या माणसांचे आणि उंटाचे अनेक सांगाडे तिने पाहिले. कुफारा ओयासिस येथे पोचण्यापूर्वी स्थानिक टोळीवाल्यांनी तिला एकदा कैदही केले होते.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून नील नाईलचा आठशे किलोमीटर लांबीचा संपूर्ण प्रवाह संशोधण्याचे अनेक प्रयत्न झाले. नील नाईल अबिसिनियातील ताना सरोवरात उगम पावते व शुभ्र नाईलला सुदानमध्ये मिळते. नील नाईलला प्रथम जेम्स ब्रुस या इंग्रज संशोधकाने सन १७७१ मध्ये भेट दिली होती. डब्ल्यू. एम्. मॅकमिलन या अमेरिकन श्रीमंत शिकाऱ्याने पोलादी होड्या बनवून त्यातून नील नाईल उगमापासून संगमापर्यंत पार करण्याचा १९०२ मध्ये प्रयत्न केला. पण त्याची बोट धबधब्यात आपटून फुटली. १९६२ मध्ये सहा संशोधकांची एक तुकडी नील नाईलच्या संशोधनासाठी आली होती. पण त्यांच्यावर दरोडेखोरांनी हल्ला केला आणि दोघा संशोधकांना जीवे मारले. १९६८ मध्ये सत्तर ब्रिटिश शास्त्रज्ञांनी नील नाईलचे संपूर्ण शास्त्रीय सर्वेक्षण करण्यासाठी मोठी मोहीम काढली व यशस्वी केली.

दुसऱ्या महायुद्धामध्ये उत्तर सहाराचे वाळवंट ही युद्धभूमी बनली होती. जर्मन सेनापती रोमेल आणि इंग्रज यांच्या येथील लढाया इतिहासप्रसिद्ध झाल्या आहेत. मध्ये काहीच नसल्याने या लढाईत एका ओयासिसपासून दुसऱ्या ओयासिसपर्यंत शेकडो किलोमीटरच्या चढाया व माघारी होत असत. सहाराच्या दक्षिणे-

कडे चाड सरोवराजवळच्या फोर्ट लामी येथून स्वातंत्र्ययोद्धचा फ्रेंच तुकड्यांनी फेजान येथील इटालियनांवर धाडसी छापे घातले आणि त्यांना नेस्तनाबूत केले. वीस वर्षांपूर्वी रोझिटा फोर्बस् हिने भेट दिलेल्या कुफारा ओयासिस येथील किल्यावर फ्रेंच स्वातंत्र्य योद्धयांनी हल्ला चढविला. त्यासाठी त्यांना २५०० किलोमीटरचे वाळवंट तुडवावे लागले.

एकोणिसाव्या शतकापासून फ्रेंच लोक सहारा वाळवंट ओलांडणारी रेल्वेलाईन बांधण्याच्या योजना करीत होते. पण रेल्वे कशी न्यावी याची पाहणी करतानाच अनेकजण मृत्यूमुखी पडले! सहारा वाळवंट ओलांडणारी रेल्वे लाईन बांधली गेली नाही. पण पाहणीसाठी जे प्रयत्न केले त्यातून सहारा वाळवंटाची पूर्ण माहिती झाली. १९६२ मध्ये त्रिपोलीतानियापासून सेबा ओयासिस पर्यंत आणि तेथून अल्जेरियाच्या सरहद्दीजवळील 'घाट' गावा-पर्यंत मोटाररस्ता सुरू झाला. सहारा वाळवंटात खनिज तेल सापडल्यामुळे आता हा भाग समृद्ध होऊ लागला आहे. वाळवंटाच्या निर्जन अंतर्भागातून समुद्रकाठच्या बंदरापर्यंत तेल आणण्यासाठी लांबच लांब पाईपलाईन आता टाकण्यात आली आहे. या नळातून हजारो टन तेल दररोज बंदरापर्यंत पोचते. १९६० पर्यंत लिबिया हा जगातील एक दरिद्री देश होता. पण आता तेथे खनिजतेल सापडले आहे आणि त्या राष्ट्राला इतका पैसा मिळाला आहे की त्याचा काय उपयोग करावयाचा हे त्यांना समजत नाही. अल्जेरिया व टचुनिशिया येथील वाळवंटातही खनिज तेलाचे मोठे साठे सापडले आहेत. पश्चिमेकडे मोराटानिया या लहान देशात वाळवंटामध्ये तांब्याचे अमाप साठे सापडले आहेत.

पण सहारा वाळवंटातील स्थानिक जमातींच्या आयुष्यात फारसा फरक पडलेला नाही. वाहतुकीसाठी प्रमुख साधन म्हणून

अजून उंटच वापरला जातो. सहारामधील तौरेग जमातीचे लोक १८२० साली क्लॉपर्टनने जसे पाहिले तसेच आजही दिसतील. त्यांची राहणी व जीवनपद्धती शेकडो वर्षांपूर्वी होती तशीच आजही आढळेल. आफ्रिकाखंडातील अनेक जमातींनी सुसंस्कृत जगाशीं व नव्या सुधारणांशी जमवून घ्यायचे आजही नाकारले आहे. पूर्व आफ्रिकेतील युद्धखोर मसाई जमातीचे लोक त्यांच्या गुरांचे रक्त काढतात आणि दुधात मिसळून पितात. कलहारी वाळवंटात शिल्लक राहिलेले बुशमेन लोक विसाव्या शतकातही अश्मयुगीन जीवन जगत आहेत, आणि एका पाणवठ्यापासून दुसऱ्या पाणवठ्यापर्यंत भटकत फिरत आहेत, पण हे सर्व लवकरच संपेल.

आता जेट विमाने जगाच्या कुठल्याही भागातून आफ्रिकन राष्ट्रांच्या राजधानीत काही तासांत पोचतात. फक्त १०० वर्षांपर्वी संशोधकाना तिथपर्यंत पोचायला महिनोगणती वेळ लागे व मृत्यूशी सामना द्यावा लागे. पाचशे वर्षांपूर्वी अरब सुलतान जेथून राज्य करीत त्या उद्ध्वस्त किल्ल्यांच्या परिसरात टांझानिया आता नाईट क्लब व करमणूक केंद्रे स्थापण्याच्या विचारात आहे! थॉम्सन व त्याच्या सहकाऱ्यांनी तपशिलवार वर्णन केलेले प्राणी आजही पूर्व आफ्रिकेत आहेतच पण ते पाहण्याचे सुख मिळविण्यासाठी आता जीव धोक्यात घालायला नको. आता तेथे अभयारण्ये व संरक्षित जंगले आहेत. आणि त्या जंगलात उत्तम हॉटेले आहेत. तेथे बसून किंवा संरक्षित मोटारीत जाऊन सिंह, हत्ती, जिराफ, हरणे यांचे थवे बघण्याचा मनमुराद आनंद कोणालाही मिळविता येतो.

भौगोलिक संशोधनामधील सहारा वाळवंटाचा मोठाच अडथळा वाटत असे, पण त्या सहारा वाळवंटात खनिज तेलाचे व नैसर्गिक

वायूचे प्रचंड साठे सापडले आहेत. पश्चिम आफ्रिकेचा किनारा गुलामाच्या व्यापारासाठी कित्येक शतके प्रसिद्ध होता. आता त्या किनाऱ्यावरून कोको, भुईमुगाच्या शेंगा, रबर, आणि कापूस यांची मोठी निर्यात होते. झाम्बेझी नदीवरील कोब्रा बासा येथील जो धबझबा पाहून नौकानयनाबद्दल लिव्हिंग्स्टनची निराशा झाली तोच प्रदेश प्रचंड जलविद्यूत योजनेचे केंद्र बनला आहे.

आता आफ्रिका काळे खंड राहिले नाही. जुना काळ इतिहास-जमा झाला आहे. संगीत, कला आणि साहित्य यांमध्येही आफ्रिकन लोक आपला ठसा उमटवू लागले आहेत. उदाहरणार्थ, सेनेगल राष्ट्राचे राष्ट्राध्यक्ष लिओपोल्ड सेनघोर हे फ्रेंच भाषेतील श्रेष्ठ दर्जाचे कवी आहेत.

पण अजून आफ्रिकेमधील संशोधनही संपलेले नाही. अनेक दिशांनी आणि अनेक तऱ्हांनी हे नवजागृत खंड संस्कृतीच्या उंबरठ्या-वर उभे आहे. अश्मयुगीन संस्कृतीतून आफ्रिकेने सुसंस्कृत अवकाश-युगात घेतलेली ही झेप मानवजातीच्या इतिहासात अपूर्वच म्हटली पाहिजे! आफ्रिकेत पुराणवस्तू संशोधनाचे कार्य आत्ताच कुठे सुरू होत आहे. पण पूर्व आफ्रिकेच्या ओल्डूवाई खोऱ्यात डॉ. लिके यांना जो पुरावा सापडला आहे. त्यावरून पृथ्वीवरचा पहिला मानव आफ्रिकेत जन्मला असे सिद्ध होण्याचा संभव दिसतो.